E-BOOK

# सुपर डुपर हिट्स्

- दिलीप ठाकूर



"ई साहित्य प्रतिष्ठान"
सादर करीत आहे

# "सुपर डुपर हिट्स"

(भाग २)

## श्री. दिलीप ठाकूर

"सुपर डुपर हिट्स" (भाग २) © दिलीप ठाकूर

# "ई साहित्य प्रतिष्ठान"
# सादर करीत आहे
# "श्री. दिलीप ठाकूर" लिखित
# "सुपर डुपर हिट्स" (भाग २)



**© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)**
glam.thakurdilip@gmail.com 9870616216

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर
**For all 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on**
**https://www.esahity.com**
**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**
**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**
**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !**

# "सुपर डुपर हिट्स" (भाग २)

© लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाशन : १५ मार्च, २०२५

© esahity Pratishthan®2025

**प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर  तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.

## ♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

दिलीप ठाकूर
(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
जन्म २० एप्रिल १९६०

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत  नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ

जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी विविध नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा

वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे. ऐंशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात विविध टोपणनावाने चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी

म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या शिट्ट्या', 'यश हेच चलनी नाणे' अशी अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या अनघा प्रकाशन ( ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर

विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर

यांनी केली आहे. विशेष म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच  फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर  दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार, मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद

पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स ॲवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे.        ९४२२३०१७३३
♥



## "मनोगत"

## "शो हाऊसफुल्ल आहे... "

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२ साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू केली. मी

मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण

जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती येते. त्याला इमेज मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, आजही मिळतोय.

त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून  सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला मी कायमच उत्साह दाखवला. चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि

**त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!**

**दिलीप ठाकूर**

**(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)**

♥




**<u>सादर करीत आहे.. "श्री. दिलीप ठाकूर" लिखित "सुपर डुपर हिट्स" (भाग २)</u>**

♥

# अनुक्रमणिका


१६. रझिया सुलतान (१८)
१७. हकिकत (२९)
१८. अभिनेत्री "बबिता" (४०)
१९. आप की कसम (५३)
२०. आविष्कार (६३)
२१. संगम (७२)
२२. निशांत (८८)
२३. रोटी कपडा और मकान (९७)
२४. आंधळा मारतो डोळा (११२)
२५. रफ्तार (१२५)
२६. चुपके चुपके (१३५)
२७. बाजी (१४४)
२८. ज्युली (१५१)
२९. अपने रंग हजार (१५९)
३०. दिल ही दिल में (१६६)
३१. पांडू हवालदार (१७४)
३२. धर्मात्मा (१८६)
३३. खेल खेल में (२००)
३४. जान हाजिर हैं (२१०)
३५. राजा (२२५)
३६. एक गाँव की कहानी (२३२)
३७. जोश (२३८)
३८. खुशबू (२५३)

# लेख क्र. १६

## बेचाळीस वर्षांनंतरही "रझिया सुलतान" च्या 'फ्लॉप'चा आवाज भारी!




पिक्चर्स काय पडत नाहीत का?

ते तर कायमस्वरुपी भलं मोठं सत्य आहे.

'टॉपच्या स्टारचे पडद्यावर आल्या आल्या पडल्याचे चित्रपट' सांगायचे तर, 'दास्तान' (दिलीपकुमार), 'मेरा नाम जोकर' (राज कपूर), 'इश्क इश्क इश्क' (देव आनंद), 'कागज के फूल' (गुरुदत्त), 'तलाश' (राजेंद्रकुमार), 'चिराग' (सुनील

"सुपर डुपर हिट्स" (भाग २) © दिलीप ठाकूर

दत्त), 'दिल का राजा' (राजकुमार), 'जाने अन्जाने' (शम्मी कपूर), 'मेहबूब की मेहंदी' (राजेश खन्ना), 'क्लर्क' (मनोजकुमार), 'सुहाना सफर' (शशी कपूर), 'शालिमार' (धर्मेंद्र), 'विश्वासघात' (संजीव कुमार), 'दीदार-ए-यार' (जितेंद्र), 'फरेबी' (विनोद खन्ना), 'मिलाप' (शत्रुघ्न सिन्हा), 'रुप की रानी चोरों का राजा' (अनिल कपूर).... ही 'रिल स्टोरी आणि रियल स्टोरी' कधीच न संपणारी! 'फॅन' (शाहरुख खान), 'ट्यूबलाईट' (सलमान खान), 'लालसिंग चढ्ढा' (आमिर खान), 'राम सेतू' (अक्षयकुमार) अशी पुढे सुरु आहेच. आणि यांचे आणखीनही काही चित्रपट रसिकांनी नाकारलेत. (तुमच्यासाठी उपरोल्लेखित सर्व चित्रपटांच्या "लिंक्स" दिल्या आहेत त्यावर "क्लिक" करा..! आणि थेट तुमच्या "स्मार्ट टीव्हीवर" नक्की पहा!)

त्यात कमाल अमरोही निर्मित व दिग्दर्शित 'रझिया सुलतान' (रिलीज १६ सप्टेंबर १९८३) चे फ्लॉप होणे म्हटलतं तर अद्वितीय! त्याच्या पडण्याचा आवाज आजही म्हणजे तब्बल बेचाळीस वर्षांनंतरही येतोय असं गंमतीत म्हटलं जाते व एकदा का पिक्चर पडला की किती किस्से, कथा, दंतकथा, गॉसिप्स काही विचारुच नका!

'रझिया सुलतान'च्या रिगल थिएटरमधील प्रीमियरच्या वेळचा हा असाच एक किस्सा! तब्बल सात वर्षे आणि सातेक कोटी बजेटचा (आज याची किंमत दसपट नक्कीच आहे) पिक्चर म्हणून त्याच्या आगमनाचे केवढे ढोल, ताशे, नगारे, बॅण्ड बाजा काही विचारुच नका! प्रचंड मिडिया हाईप आणि त्यातच हा प्रीमियर! धडाधड फ्लॅश उडणारा. त्या काळात प्रीमियर शो म्हणजे,

थिएटरच्या पलिकडच्या फूटपाथवरही बघ्यांची सॉलीड गर्दी! त्यातून स्टार आल्याचे कळेपर्यंत तो थिएटरमध्ये शिरला समजा. त्यातही आनंद मिळे! अशातच 'शो' सुरु झाला. आणि पंचवीस एक मिनिटांनी बाल्कनीतील एकजण उभा राहून ओरडू लागला, 'अरे कुछ समझ मे नहीं आ रहा है.. हिंदी मे बोलो हिंदी मे..!' तेवढ्यात धर्मेंद्र शक्य तितका राग आवरत म्हणाला, 'अरे चूप बैठ...!' यावर हेमा मालिनी त्यालाच गप्प करीत म्हणाली, 'आप चूप बैठो जी, मुझे भी कुछ समझ मे नहीं आ रहा है..' हा किस्सा अनेक वर्षे रंगवून खुलवून सांगितला जाई! यात गोम अशी होती की, हा हिंदी चित्रपट असला तरी उर्दूमिश्रित हिंदी आणि काही प्रमाणात पुश्ती भाषा होती. 'थीम'नुसार ही भाषा होती. पण असे 'भाषेचे प्रयोग' प्रत्येक वेळी

जमतील आणि प्रेक्षक स्वीकारतील असे नाही. कधी असे फसतात आणि पिक्चर फ्लॉप होतो. तसा हादेखील झाला!

'रझिया सुलतान'ची गोष्ट अशी, रझिया सुलतानचा जन्म इ.स. १२०५चा बदाऊन, उत्तर प्रदेशातील! रझिया सुलतान ही दिल्लीचा 'सुलतान इल्तुमिश' याची मुलगी होती. त्याने आपल्या पश्चात रझियाला वारसदार म्हणून निवडले होते. रझिया ही मध्ययुगीन काळात दिल्लीच्या सिंहासनावर बसलेली बहुधा एकमेव मुस्लिम महिला असावी. राज्यकर्ती म्हणून गादीवर आल्यावर तिला अनेक बंडांना तोंड द्यावे लागले. न डगमगता शौर्य आणि कौशल्याच्या जोरावर तिने सर्व बंडे मोडून काढून दिल्ली सलतनतवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. रझियाची वाढती शक्ती तसेच पडदा पद्धत न

पाळता दरबारात वावरणे काही मुस्लिम सरदारांना मान्य नसतानाही रझियाने त्यांची पर्वा केली नाही. ती शिकारसुद्धा करायची तसेच युद्धामध्ये तिच्या सेनेच नेतृत्व करायची. राजपुतांना काबूत आणण्यासाठी रझियाने रणंथंभोरच्या विरुद युद्धमोहीम आखली होती. तिच्या संपूर्ण राज्यात तिने उत्तम कानूनव्यवस्था प्रस्थापित केली होती, रझियाचे वाढते सामर्थ्य आपल्या हिताआड येत आहे हे पाहून काही तुर्की सरदारांनी तिचा शेवट केला अशी या चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना! मल्टी स्टार-कास्ट आणि सात गाणी यांनी ही अतिशय भव्य दिव्य दिमाखदार कलाकृती सजवली! पण तात्कालिक समीक्षकांच्या मते हे नाट्य अपेक्षेनुसार खुलले, रंगले नाही! सगळा मामला दिखाऊ अथवा

वरवरचा राहिला! हेमा मालिनीच्या सौंदर्याने आणि चकाचक सेटसनी ['रझिया सुलतान'] आकर्षक ठरली. पण चित्रपट रंगायला तेवढी एकच गोष्ट पुरेशी नसतेच. (केवळ 'नेपथ्य' चांगले आहे म्हणून 'नाटक' पहायला रसिक प्रेक्षक गर्दी करत नसतात!) धर्मेंद्र (याकूत जमालुद्दीन), विजयेन्द्र घाटगे (अमिल अथुनिया), परवीन बाबी (खातून), प्रदीपकुमार (सुलतान अल्मश), अजित (अमील बलवान), वीणा शहा (नुर खान), सोहराब मोदी (वझिर-ए-आझम) अशी स्टार कास्ट थीमनुसार काळ, वातावरण, वेशभूषा, केशभूषा, भाषा यावर भरपूर मेहनत व खर्च दिसत होता! त्यात कोणतीही कपात वा टंचाई नाही! कैफी आझमी, जाँ निसार अख्तर आणि निदा फाजली यांच्या गीतांना खय्याम यांचे शास्त्रीय वळणाचे संगीत! ['ख्वाब]

बनकर कोई आयेगा..' (लता मंगेशकर), 'ऐ दिल-ए-नादान..' (लता मंगेशकर), 'हरियाला बन्ना आये रे..' (आशा भोसले) ही गाणी लोकप्रिय ठरली! एन. बी. कुलकर्णी यांचे कला दिग्दर्शन, आर. डी. माथूर यांचे छायाचित्रण आणि बी. एस. ग्लाड यांचे संकलन अशी जबरदस्त तांत्रिक बाजू! कशात कपात ती नाही! बरेचसे चित्रीकरण अफगाणिस्तानात तर इनडोअर शूटिंग मुंबईत कमालीस्तान स्टुडिओत! तो कमाल अमरोही यांचाच स्टुडिओ! दिवस न मोजता काम! 'पिक्चर पैसे से नहीं, दिलसे बनती है!' अशी भावना! तरी चित्रपट उंची गाठू शकला नाही!

कमाल अमरोही यांचेच लेखन होते. त्यांचे दिग्दर्शक म्हणून प्रगती पुस्तक अतिशय अनुभवी व लक्षवेधक होते. 'महल' (१९४९), 'दायरा'

(१९५३), 'पाकिजा' (१९७२) हे उल्लेखनीय चित्रपट! राजेश खन्नाने त्यांना आपल्या निर्मितीत 'मजनू' (१९७९)च्या भव्य महत्वाकांक्षी चित्रपटा साठी साईन केले! (निळ्या रंगातील मजकूर या "लिंक्स" आहेत बरं!) या प्रेमपटात राजेश खन्ना व राखी यांच्या रोमॅन्टीक भूमिका! वांद्र्यातील मेहबूब स्टुडिओत अतिशय भव्य आणि कायमच लक्षात राहील असा मुहूर्त झाला. पण पिक्चर तेथेच बंद पडला. अन्यथा 'रझिया सुलतान' नंतरचा कमाल अमरोही यांचा चित्रपट 'मजनू' असता....अमर प्रेम कथा!

धर्मेंद्र- हेमा मालिनी सत्तरच्या दशकातील फिट्ट नि हिट्ट जोडी. त्यांचे 'तुम हंसी मै जवा', 'नया जमाना', 'सीता और गीता', 'राजा जानी', 'जुगनू', 'प्रतिज्ञा', 'शोले', 'आझाद', 'माँ' इत्यादी चित्रपट

सुपर हिट! तर 'ड्रीम गर्ल', 'पत्थर और पायल', 'बगावत', 'आस पास', 'रजपूत' इत्यादी फ्लॉप देखील! 'रझिया सुलतान' ची भव्यता, व्हिजन असलेला दिग्दर्शक पाहता हाही हिट व्हायला हवा होता. पण चित्रपटाचे यशापयश पब्लिकच्या हाती असते! त्यांचा कौल फायनल टेक! नो रिटेक!!

'रझिया सुलतान' ची एक लक्षात राहणारी गोष्ट, मराठा मंदिर चित्रपटगृहावरील त्याचे अतिशय उत्तम व पाहतच रहावे असे डेकोरेशन! (आम्ही बच्चेकंपनी आणि अनेक वयोगटातील सिनेरसिक ते खास डेकोरेशन पहायला नक्कीच 'मराठा मंदिरला' गर्दी करायचो!) चित्रपटातील अनेक दृश्य आणि त्यात एक भव्य गरुड असे ते होते! ते पाह्यला जेवढी आणि जशी सातत्याने गर्दी

झाली तेवढी या चित्रपटाला झाली असती तरी पिक्चर सुपर हिट ठरला असता!

चालायचंच, काही चित्रपट मनात घर करतात, काहींचे डेकोरेशन डोळ्यासमोर येत राहते. फ्लॉप चित्रपटाला तेवढाच दिलासा. पिक्चर फ्लॉपने किती कोटीचे नुकसान झाले यापेक्षा त्यात किती मेहनत, स्वप्ने, आशा, अपेक्षा धुळीस मिळाल्या याची गणती नसते.  दुर्दैवाने 'रझिया सुलतान' ला रिपीट रन, मॅटीनी शो, चॅनेल अशी कुठेच कधी संधीच मिळाली नाही. म्हणून तर त्याच्या फ्लॉपचा आवाज कायम राहीलाय...सुपर हिट पिक्चरच्या गोष्टी नेहमीच होतात. कधी फ्लॉपच्याही व्हाव्यात. तेवढेच दुःख हलके!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर-रविवार लेख)

♥

# लेख क्र. १७

## कॅमेऱ्याच्या आगे मागे - हकिकत @६१
## हिंदीतील सर्वोत्कृष्ट युध्दपट ... विलक्षण थरार!




...... 'अब तुम्हारे हवाले वतन साथियो....!'

चित्रपटाच्या 'क्लायमॅक्सला' हे गाणे पडद्यावर येते आणि चित्रपटगृहातील प्रेक्षक भावनाविवश होत असतानाच त्यांच्यातील देशभक्तीची भावना विलक्षण जागी होते!

चित्रपटाचा योग्य असा परिणाम झालेला

दिसत असतो!

असा एकाद्या चित्रपटाचा गाण्याने शेवट करायचा अशी पूर्वी कल्पनाच सुचणे अवघड होते! पण तसे झाले आणि चेतन आनंद दिग्दर्शित 'हकिकत' (मुंबईत रिलीज २० एप्रिल १९६४. मेन थिएटर रॉक्सी)च्या विलक्षण प्रभावाने प्रेक्षक अंतर्मुख झाले! हिंदी चित्रपटसृष्टीतील हा पहिला युध्दपट. त्याला साठ वर्षे पूर्ण झालेली असूनही त्या चित्रपटाचा ठसा कायम आहे! हा एक क्लासिक चित्रपट म्हणून ओळखला जातो. १९६२ साली भारत आणि चीन यांच्यातील युध्दावर आधारित हा चित्रपट आहे! आपण यावर चित्रपट निर्माण करावा असे चेतन आनंदना वाटले. पण युध्दासारख्या वास्तव घटनांवर आधारित चित्रपट निर्माण करायचा तर शासनाची परवानगी हवी आणि

युध्दपट निर्माण करायचा तर तसे बजेट हवे! सुदैवाने चेतन आनंदना दोन्हीत प्रयत्नपूर्वक का होईना पण यश प्राप्त झाले. तेव्हाच्या पंजाब सरकारकडून आर्थिक मदत झाली तर केन्द्र शासनाकडून लडाख येथे चित्रिकरणाला परवानगी मिळाली. या चित्रपटासाठी चेतन आनंदने आपली 'हिमालय फिल्म' ही चित्रपट निर्मिती संस्था स्थापन केली. एका चित्रपट निर्मितीत असे अनेक लहान मोठे घटक असतात. तोपर्यंत चेतन आनंद यांनी 'नीचा नगर' (१९५६), 'अफसर' (१९५०), 'आँधिया' (१९५२), 'टॅक्सी ड्रायव्हर' (१९५४), 'फंटूश' (१९५६), 'अर्पण' (१९५७), 'किनारे किनारे' (१९६३) या चित्रपटांचे दिग्दर्शन करताना विषयाची विविधता जपली होती. चित्रपट माध्यमाची उत्तम जाण व सामाजिक

भान असलेले दिग्दर्शक ही त्यांची ओळख होती.

कलाकारांची निवड ही महत्वाची गोष्ट. या चित्रपटासाठी विजय आनंद कास्टिंग दिग्दर्शक होता. तोपर्यंत त्याने स्वतंत्रपणे दिग्दर्शित केलेले 'नौ दो ग्यारह' (१९५७), 'काला बाजार' (१९६०), 'तेरे घर के सामने' (१९६३) प्रदर्शित झाले होते. आणि कलाकारांच्या निवडीत विजय आनंद फार हुशार होते! (या तीनही चित्रपटात देव आनंद नायक असला तरी अन्य कलाकार व देव आनंदची व्यक्तिरेखा यात विजय आनंद टच दिसतो!). चेतन आनंद व विजय आनंदने 'हकिकत' चे कलाकार निश्चित केले. बलराज साहनी, जयंत असे अनुभवी, धर्मेंद्रसारखा तोपर्यंत चित्रपटसृष्टीत हळूहळू जम बसवत असलेला कलाकार, खुद्द विजय आनंद याबरोबरच नवखा संजय खान, सुधीर, भूपैंद्र,

इंद्राणी मुखर्जी यांच्यासह प्रिया राजवंश! तेव्हा ती इंग्लंडची रहिवाशी होती, तिकडे Royal Academy of Dramatic Art यात कार्यरत होती, अभिनयाची आवड होती आणि आपणास हिंदी चित्रपटात काम करायचयं असे तिने चेतन आनंद वगैरेना पत्र लिहिले होते. चेतन आनंदनी तिला प्रतिसाद दिला आणि ती मुंबईत आली!

शूटिंगची तयारी, कलाकारांची निवड हे होत असतानाच कैफी आझमी यांच्या गीतांना मदन मोहनचे संगीत, गाण्याचे रेकॉर्डिंग हे सगळे झाले. मदन मोहननी दिल्लीत एका हॉटेलमध्ये भूपिंदर सिंगला गिटार वाजवताना पाहिले! त्याला मुंबईत मोहम्मद रफींसोबत 'हो के मजबूर मुझे..' हे गाणे गायला बोलावले! पण चारच ओळींची संधी मिळाल्याने तो नाखूष होता. चित्रपटातही त्याला

छोटीशी भूमिका मिळाली.

'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन'च्या कलाकारांनी या चित्रपटात मानधनाशिवाय काम करायचे ठरवले! चेतन आनंद याचवेळी नवकेतन फिल्मच्या "गाईड"वरही काम करीत होते. दोन्ही चित्रपट भिन्न स्वरुपाचे. आवाका वेगळा! हे लक्षात घेऊन त्यांनी 'गाईड' चे दिग्दर्शन सोडले आणि आपले सगळे लक्ष 'हकिकत' वर केन्द्रित केले. ते झाले ते अतिशय चांगलेच झाले.

चित्रपट पूर्ण होत असतानाच 'अब तुम्हारे हवाले वतन साथियों..' हे गाणे चित्रपटात नेमके कुठे असावे हा प्रश्न होता! युध्दपट असला तरी त्यात गीत संगीतासाठी योग्य जागा असे हे पटकथाकार व दिग्दर्शकाचे कसब व कौशल्य! या चित्रपटात जवानांना असलेली घराची ओढ, घरुन येणारे पत्र

अशा काही जागा होत्याच. पण 'अब तुम्हारे....' गाणे चित्रपटाच्या अगदी शेवटी असावे, अतिशय चांगला परिणाम साध्य होईल असे कैफी आझमीचे म्हणणे होते. चेतन आनंदना ते मान्य नव्हते! हा निर्णय साहसी वाटत होता. तोपर्यंत हिंदी चित्रपट फारशी चौकट मोडत नव्हता. पण हा निर्णय योग्य ठरला. या चित्रपटाला या गाण्याने अधिकच उंचीवर नेले. आणि तेव्हापासून हे 'राष्ट्रभक्तीने प्रेरीत गाणे' म्हणून ओळखले जाते. प्रत्येक राष्ट्रीय सणाला लाऊडस्पीकरवर हे गाणे हमखास लावले जाऊ लागले. अशा भारावलेपणाने चित्रपटगृहातून बाहेर पडलेल्या रसिकांनी या चित्रपटाचे विलक्षण कौतुक केले. माऊथ पब्लिसिटीवर हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचत राहिला यात आश्चर्य नाही! इतकेच नव्हे तर या चित्रपटावर

त्यानंतर वारंवार मुद्रित माध्यमातून लिहिले गेले, याची गाणी रेडिओवर ऐकायला मिळत राहिली त्यामुळे हा चित्रपट पुढील पिढीतही जात राहिला! मी स्वतः सत्तरच्या दशकात मॅटीनी शोला, गल्ली चित्रपटात पुन:पुन्हा पाहिला. या चित्रपटाचे मेकिंगच भारावून टाकणारे आहे. हा चित्रपट 'कृष्ण धवल' (अर्थात ब्लॅक अँड व्हाईट) स्वरुपात असून या चित्रपटात तो रंग काही वेगळाच अनुभव देणारा ठरतो. विशेषतः युध्दाचे प्रसंग थरारक अनुभव देतात.

हा एक उत्तम आदर्श युध्दपट म्हणून गणला जातो. साठच्या दशकातील सामाजिक, सांस्कृतिक वातावरणात हा चित्रपट रसिकांना जवळचा वाटला. तात्कालिक पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांना हा चित्रपट अर्पण

करण्यात आला होता! या चित्रपटात बलराज साहनी (मेजर रणजित सिंग), धर्मेंद्र (कॅप्टन बहादूर सिंग), विजय आनंद (मेजर प्रताप सिंग), तसेच प्रिया राजवंश, संजय खान, सुधीर, शेख मुख्तार इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटातील 'जरा सी आहट होती है..' (लता मंगेशकर), 'अब तुम्हारे हवाले वतन साथियो..' (मोहम्मद रफी), 'हो के मजबूर मुझे..' (मोहम्मद रफी, भूपेन्द्र सिंग), 'मै यह सोचकर..' ( मोहम्मद रफी), 'आई अबके साल दिवाली..' (लता मंगेशकर) ही या चित्रपटातील गाणी आजही तेवढीच लोकप्रिय आहेत! अनेक यशस्वी चित्रपट गाण्यांच्या लोकप्रियतेने सतत पुढील पिढीला माहिती होत राहिले त्यात हा युध्दपट विशेष उल्लेखनीय आहे. १९६५ साली या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा दुसऱ्या

क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. तर २०१२ साली आधुनिक तांत्रिक सोपस्काराने हा चित्रपट रंगीत करण्यात आला तरी मूळ ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपट ही त्याची ओळख जास्त प्रभावी आणि पहिला युध्दपट हा ठसा जास्त उल्लेखनीय!

चेतन आनंद यांनी दशकभरानंतर 'हिन्दुस्थान की कसम' (१९७३) हा १९७१ च्या भारत व पाकिस्तान यांच्यातील युध्दावर आधारित युध्दाच्या अधिकाधिक साहसी दृश्यांचा युध्दपट दिग्दर्शित केला. पण तो 'हकिकत' चा दर्जा साध्य करु शकला नाही..."हकिकत" म्हणताक्षणीच या युध्दपटातील अनेक प्रसंग डोळ्यासमोर येतात, काही भावस्पर्षी दृश्यही आठवतात आणि त्यातील गाणी ओठांवर येतात तर मग आणखीन काय हवे!

चित्रपटाला साठ वर्षे पूर्ण झालेली असूनही हे यश कायम आहे...! चेतन आनंद यांनी याशिवाय 'आखरी खत' (१९६६) इत्यादी अनेक चित्रपटांचे दिग्दर्शन केले. 'हकिकत' या सगळ्यात वेगळाच! त्या काळात फारश्या तांत्रिक सुविधा उपलब्ध नसूनही दर्जेदार चित्रपट पडद्यावर येत हे आवर्जून सांगायलाच हवे.

(मी तुमच्यासाठी उपरोल्लेखित सर्व चित्रपटांच्या "लिंक्स" दिल्या आहेत. तसेच.. "हिंदी" आणि "इंग्रजी" भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या "युद्धपटांच्या" दोन खास "प्ले लिस्ट्स" देत आहे. केवळ "क्लिक" करा आणि आपल्या "स्मार्ट टीव्हीवर" आनंद घ्या!)

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

# लेख क्र. १८

## तैमूर व जेहची आजी 'बबिता' @७८



आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला 'बबिता' २० एप्रिल रोजी ७८ वर्षांची झाली असे म्हटलं तर पटकन लक्षात येणार नाही! 'तैमूर' व 'जेह' यांची आजी म्हटलं तर बरेचसे संदर्भ लागत जातील. तैमूरला तर वृत्त वाहिन्यांवर व सोशल मिडियात एकाद्या सेलिब्रिटीजप्रमाणे न्यूजसाठी स्पेस मिळत राहिली. यांचे मम्मी व डॅडी (सैफ अली

खान व करिना कपूर) आपल्या या दोन्ही मुलाना घेऊन घराबाहेर पडताहेत तोच धडाधड फ्लॅश उडत त्याची बातमी होतेय. अशा लहानपणापासूनच 'फोकस' मध्ये असलेल्या मुलांची आजी म्हणजे 'बबिता'!

सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या काळातील चित्रपट रसिकांच्या एका पिढीसाठी ती 'शोमन राज कपूर'ची मोठी सून...मानाचं स्थान!

रणधीर कपूरची ती नायिका, प्रेयसी आणि मग पत्नी..! भूमिकेत सतत बदल. आणि तोही लक्षणीय!

आजच्या 'मल्टीप्लेक्स ओटीटी, ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला' ती 'लोलो' अर्थात करिश्मा आणि 'बेबो' अर्थात करिना यांची आई म्हणून माहित आहे! आई व या दोन मुलींचे नाते

अतिशय जिव्हाळ्याचे आहे हे सोशल मिडियात सतत दिसून येते..! अशात बबिताचेही आपले एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे! ओळख आहे! साठच्या दशकाच्या उत्तरार्धातील एक यशस्वी अभिनेत्री म्हणून ती नावारुपास आली! आपल्या दोन्ही मुलींचे चित्रपटसृष्टीत पाऊल पडताना घेतलेले धाडसी आणि व्यावहारिक दृष्टिकोन. त्यातलं तिचं 'असणं' बरेच अधोरेखित होणारे! दोन्ही मुलींचे करियरची आखणी करताना बबितामधील अनुभव उपयोगात आला!

अशा बबिताच्या वाढदिवसानिमित्त काही खास गोष्टी सांगायलाच हव्यात!

एकदा मला एकेकाळचा 'स्टार फोटोग्राफर'.. 'ज्याचा कॅमेरा बोले' अशा जगदीश माळीने सांगितलेली गोष्ट सांगतो! त्यात बबिताचा

धोरणीपणा आणि आपल्या मुलींना चित्रपटसृष्टीत 'लॉन्च' करण्यातील स्मार्टपणा, व्यावसायिकता लक्षात येईल! कपूर खानदानाची ती सून असल्याचे त्यात अधोरेखित होईल. एका फिल्मी पार्टीत जगदीश माळीची भेट होताच बबिताने त्याला सांगितले, 'लोलो'ला मी फिल्म इंडस्ट्रीत आणतेय! तिचं एक फोटो सेशन कर....तुझ्या शैलीनुसार कर!

ठरल्याप्रमाणे जगदीश माळी वर्सोवा येथील बबिताच्या सोसायटीत शिरला! (रणधीर कपूर व बबिता वेगळे राहत होते तेव्हाचे ते दिवस!) तेव्हा सोसायटीतील विशाल अशा कंपाऊंडमधील स्वीमिंग पूल पाहून त्याने ठरवले. लोलोचं येथेच स्वीमिंग कॉश्चूममध्ये फोटो शूट करुया. त्याची ही कल्पना बबिताला पटली आणि 'लोलो'ही तयार

झाली. जवळपास पस्तीस वर्षांपूर्वी हा 'मॉडर्न विचार' बबिताच्या स्वभावाची कल्पना देतो काळासोबत आपणही बदलायला हवे हा तिचा यातला दृष्टिकोन. कपूर खानदानातील ही खासियत. आधुनिक विचारसरणी असावी.

बबिताच्या सकारात्मक दृष्टिकोनाची आणखीन उदाहरणे.. लोलोचं रुपेरी पदार्पण 'कपूर' आडनावाला/खानदानाला साजेसं व्हावं असे बबिताला वाटणारच! 'शो बिझनेस'मध्ये असेच वागावे लागते. तो खेळ जमायला हवा. तरच पत राहते. फोकस कायम राहतो! लोलोसाठी पहिला चित्रपट स्वीकारला, 'बरसात'! याचा निर्माता धर्मेंद्र! बबिताचा 'कब क्यू और कहा' (१९७१) चा एकेकाळचा हीरो. दिग्दर्शन शेखर कपूरकडे आणि नायक बॉबी देओल! मला

आठवतय, गोरेगावच्या फिल्मीस्थान स्टुडिओत अतिशय दणकेबाज ग्लॅमरस मुहूर्त रंगला! आम्ही अतिशय मनापासून रकानेच्या रकाने लिहिले. पण बरेच दिवस झाले तरी शूटिंगची काहीच खबर नाही. एके दिवशी बातमी आली, शेखर कपूरने हा चित्रपट सोडला. (कितवा बरे?) आणि राजकुमार संतोषी आता दिग्दर्शक आहे! या उलथापालथीत जात असलेला वेळ बबिताला स्वस्थ बसू देईना! तिने लोलोला घेऊन हैदराबाद गाठलं आणि निर्माते डी. रामा नायडू यांची भेट घेऊन लोलोला 'प्रेम कैदी'ची हरिशची नायिका केली. लोलोचा (करिश्मा) हा पहिलाच चित्रपट सुपर हिट! आईला यापेक्षा आणखीन आनंद तो काय हवा? चित्रपटाच्या जगात "यश हेच चलनी नाणे" यावर लक्ष असायलाच हवे!

लोलोचं करियर सुरु झालं आणि काही चित्रपटांनंतर तिने चित्रपट स्वीकारला, दीपक आनंद दिग्दर्शित 'लख्त-ए-जिगर'. तिचा काका ऋषि कपूर या चित्रपटातही काकाच! आणि या दोघांवर काही महत्वाची दृश्ये चित्रीत होत असतानाच आम्हा सिनेपत्रकारांना जुहूच्या मयूर महल या बंगल्यात शूटिंग रिपोर्टींगसाठी बोलावले. ते दिवसच वेगळे होते. काही वेगळं पाह्यला मिळेल आणि म्हणूनच काही एक्स्युझिव्हज लिहायला मिळेल म्हणून थोडं लवकर गेलो (ते अनुभव आता सांगायला मिळताहेत!) तेव्हा काहीसा आडोसा पकडून चक्क बबिता, बेबोला घेऊन आपल्या दीर व मुलीचे शूटिंग पाहत असल्याचे दिसले. 'क्या सीन है..' असंच म्हणावसं वाटलं! बेबो तेव्हा शाळकरी वयातील वाटली! गंमत म्हणजे, तेव्हा शूटिंग

रिपोर्टींगमध्ये हेच लिहिलं! हा चित्रपट याच पहिल्याच शेड्युलनंतर डब्यात गेला. असं तर अनेकदा होते. या खेळाचाच एक भाग!

...पुढचं पाऊल वेळीच टाकायला हवे ही बबिताची खुबी! हुशारी!

बेबोच्या वेळीही अशीच 'बदलाची खेळी' रंगली. ह्रतिक रोशनची पहिली नायिका म्हणून राकेश रोशन दिग्दर्शित 'कहो...ना प्यार है' स्वीकारला! महालक्ष्मीच्या फेमस स्टुडिओत पहिले चित्रीकरण सत्रही पार पडतेय तोच 'बीग बी' पुत्र अभिषेक चित्रपटसृष्टीत आला! क्या टायमिंग है....एकदम बीग शॉट! बेबोचा हा पहिला हीरो असायलाच हवा असे बबिताला वाटले आणि तिने चक्क तशी सकारात्मक पावलेही टाकली. आणि राकेश रोशनला सांगत 'कहो ना.. प्यार है' सोडला

आणि दिग्दर्शक जे. पी. दत्ताची भेट घेत 'रिफ्यूजी'त बेबो अभिषेकची नायिका झाली..! आपल्या मुलींच्या कारकिर्दीच्या आखणीत इतकी काळजी कोणी घेतली असेल हो? बबिताचे वेगळेपण हेच. महत्वाकांक्षी व धोरणी!

बबिताची रुपेरी पडद्यावरील करियर चित्रपटाच्या संख्येत फार नाही. तरी तिचा इम्पॅक्ट भारी. राजेश खन्नाची ती पहिली नायिका. (जी. पी. सिप्पी निर्मित व भास्कर दवे दिग्दर्शित 'राज' चित्रपट १९६६!). एका रिॲलिटी शोमध्ये बबिता व लोलो असताना लोलोचं आपल्या आईबद्दलचं फिल्मी ज्ञान जाणून घेण्यासाठी प्रश्न होता, बबिताचा पहिला चित्रपट कोणता? यावर लोलो काहीशी गोंधळली आणि म्हणाली, काकाजी (राजेश खन्ना) के साथ 'राज' और संजय खानजी के

साथ 'दस लाख'..! तिचं उत्तर बरोबर होते, कारण बबिताने एकाच वेळेस हे दोन चित्रपट स्वीकारले. तात्पर्य चित्रपटसृष्टीत तिचे स्वागत झाले होते!

बबिताने हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले त्याच सुमारास इंद्राणी मुखर्जी, लीना चंदावरकर, हेमा मालिनी, जया भादुरी, रेखा, राखी, योगिता बाली आल्या, म्हणजे स्पर्धा तगडी होती! बबिता एकेकाळी असंख्य कॉलेज गर्लची "फॅशन आयकॉन" होती! तिचा टाइट चुडीदार कुर्ता, हूप इअर रिंग्स आणि गो-गो आय ग्लासेस त्या काळातील युवती आजही विसरलेल्या नाहीत! त्यांनी जमेल तेवढी ती केली. बबिताने अभिनयाच्या क्षेत्रात पाऊल टाकले तेव्हा अभिनय येणे वा असणे याला 'छान दिसणे' असा पर्याय एस्टॅब्लिश होत होता. बबिताचे वडिल हरी

शिवदासानी असून ते सिंधी होते आणि आई फ्रेंच महिला होती. साधना आणि बबिता ह्या दोघी चुलत बहिणी.

बबिताने 'डोली', 'किस्मत', 'फर्ज', 'तुमसे अच्छा कौन है', 'हसीना मान जाएगी' , 'एक श्रीमान एक श्रीमती', 'अन्जाना', 'कब क्यो और कहां', 'पहचान', 'अनमोल मोती', 'बनफूल', 'सोने की लंका', 'एक हसिना दो दीवाने'.. अशा अनेक चित्रपटात भूमिका साकारताना राजेंद्रकुमार, मनोजकुमार, शम्मी कपूर, शशी कपूर, जितेंद्र यांची नायिका बनण्यात यश मिळवत आपली स्पेस निर्माण केली! यातील काही पिक्चर्सच्या सुपर हिटने बबिता नावाला ग्लॅमर आलं...!!

अशा चढत्या भाजणीत आर. के. फिल्मच्या रणधीर कपूर दिग्दर्शित 'कल आज और कल' मध्ये कपूर

खानदानातील तीन पिढीसोबत (पृथ्वीराज कपूर, राज कपूर व रणधीर कपूर) एकाच वेळेस काम करण्याची संधी मिळताच बबिताची किस्मत आणखीन उघडली. तेच ते सही टायमिंग! रणधीरला लाडाने/प्रेमाने 'डब्बू' असं म्हणता म्हणता तोच तिच्या प्रेमात पडला! कधी कधी प्रेम असेच होत असते! पिक्चर पूर्ण होता होता ती कपूर खानदानाची सूनही झाली आणि संसारातही रमली! काही वर्षातच दोन मुलींचा जन्म झाला! पण कशावरुन तरी या संसारात कुरबूर, कटकटी, भांडणे, गैरसमज वाढत वाढत गेले आणि बबिता आपल्या दोन मुलींना घेऊन चेंबूरच्या आर. के. कॉटेजमधून बाहेर पडली आणि वर्सोव्यात वेगळी राहू लागली. गॉसिप्स मॅगझिनमधून काहीबाही लिहून आले! भरपूर खमंग मसाला मिळत गेला.

त्यात तथ्य किती हे तेच जाणोत. ही 'स्टोरी' एव्हाना 'मागील रिळा'त राहिलीय! काळ पुढे सरकायला लागलाय आणि ते आता पुन्हा एकत्र आलेत! काही का असेना, दुरावलेली नाती पुन्हा जुळायला हवीतच. मग ती कपूर खानदानातील का ना असत? बबिताला वयाच्या पंचाहत्तरीत ही छानशी भेटच! एक गोष्ट महत्वाची, नटी म्हणून आपलं करियर फार नसले तरी आपल्या दोन्ही मुलींना यशस्वी स्टार ॲक्ट्रेस म्हणून बबिताने घडवले. तैमूर व जेह यांच्या आजीची गोष्ट खूपच कलरफुल आहे. मोठाच फ्लॅशबॅक असणारी आहे!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. १९

### "आप की कसम"@५१
### फिल्मी अड्ड्यावरील चर्चेतील फिल्म!




नातं मैत्रीचे असो, रक्ताचे असो, सख्ख्या शेजाऱ्यांशी असो वा पती पत्नीचे असो! कोणत्याही प्रकारचा संशय म्हणजे मोठ्याच संकटांना आमंत्रण! तो एक प्रकारचा राक्षसच! सगळं नातचं विस्कटून टाकणारा!

कमल भटनागर (राजेश खन्ना) आणि सुनीता (मुमताज) यांच्या अतिशय आनंदी, सुखकारक, मनमुराद अशा प्रेम विवाहातील

संसारात असाच एक संशय निर्माण होतो. आपली पत्नी आणि आपल्या शेजारच्या बंगल्यात राहणारा मोहन (संजीवकुमार) यांच्यातील नाते हे निखळ मैत्रीचे नसून त्यात काही मर्यादा ओलांडल्यात असा कमलला आलेला संशय दिवसेंदिवस बळावतो! छोट्या छोट्या गोष्टींतून तो वेगळे अर्थ, गैरसमज काढतो..एका कौटुंबिक पार्टीत सुनीता 'चोरी चोरी चुपके चुपके...' गाते तेव्हा मोहन सतार वादनातून तिला साथ देतो तेव्हा तर कमलची खात्रीच पटते की आपण कामानिमित्त घराबाहेर असल्यावर मोहन सुनीताला भेटायला घरी येतो! एकदा रात्री त्याला आपल्या बंगल्याबाहेरुन कोणी पळून गेल्याचेही दिसते. त्याच्या मनात "संशयाचे भूत" घट्ट होते. तो यावरुन सुनीताशी वादही घालतो! एकदा तो असाच बंगल्याबाहेर

पडणाऱ्याला (रणजीत) पकडतो तेव्हा तो सांगतो, मी मोहनच्या बायकोला चोरुन भेटायला येतो! मोहन व सुनिता यांचे नाते भावा बहिणीसारखे आहे. तू उगाच संशय घेतोस.....एव्हाना बराच उशीर झालेला असतो..!!

जे. ओम प्रकाश निर्मित व दिग्दर्शित "आप की कसम" (मुंबईत रिलीज ३ मे १९७४!)च्या मुंबईतील प्रदर्शनास बावन्न वर्षे पूर्ण झाली आहेत! (गुगलवरची १७ एप्रिल १९७४ ही तारीख दिल्लीतील रिलीजची! कारण त्या काळात टप्प्याटप्प्यावर चित्रपट प्रदर्शित होत असत!)

आजच्या काळात हीच कथा कदाचित वेगळे वळण घेईल. (चारित्र्याच्या संशयावरुन पतीने पत्नीचा खून केला अथवा प्रियकराच्या मदतीने पतीचा खून. अशा बातम्या आपण अधूनमधून

वाचतो/पाहतो!) बावन्न वर्षांपूर्वी अशी 'संशयाची गोष्ट' रुपेरी पडद्यावर साकारणे हे विशेषच होते! जे. ओम प्रकाश हे साठच्या दशकापासूनच निर्माते म्हणून कार्यरत! 'आस का पंछी', 'आई मिलन की बेला', 'आया सावन झुम के', 'आंखो आंखो मे' इत्यादी चित्रपटांची निर्मिती केल्यावर ते "आप की कसम" पासून चित्रपट दिग्दर्शनात उतरले आणि पहिल्याच चित्रपटात धाडसी थीम साकारली! एका मल्याळम चित्रपटावर आधारित या चित्रपटाची गोष्ट रमेश पंत यांची तर कसदार पटकथा राम केळकर यांची! छायाचित्रणकार बी. बाबासाहेब यांचे तर संकलन प्रताप दवे यांचे. कला दिग्दर्शन सुधेन्दु रॉय यांचे! गाण्यांसाठी कश्मीरला भरपूर पसंती दिलीय आणि त्या सौंदर्यात राजेश खन्ना व मुमताज छान खुललेत. गाणी कधीही पहावीत!

राजेश खन्ना व मुमताज सुपरहिट जोडी! 'बंधन', 'अपना देश', 'सच्चा झूठा', 'दुश्मन', 'रोटी', 'प्रेम कहानी', 'आप की कसम', 'आईना' या चित्रपटात ही जोडी जमली आणि शोभली! राज खोसला दिग्दर्शित 'दो रास्ते' आणि मनमोहन देसाई दिग्दर्शित 'सच्चा झूठा' हे चित्रपट सुरुवातीस शशी कपूरला ऑफर झाले होते पण मुमताज ही खरतऱ 'सी' ग्रेडची अभिनेत्री म्हणून त्याने ते नाकारले! अशोक रॉय दिग्दर्शित 'चोर मचाये शोर' च्या वेळेस मुमताजने स्वतःचे स्थान निर्माण केल्याने शशी कपूरने होकार दिला! 'दो रास्ते' आणि 'सच्चा झूठा' सेटवर गेले तोपर्यंत राजेश खन्ना सुपर स्टार झाला नव्हता! आणि शूटिंगच्या रिकाम्या वेळेत त्याचे व मुमताजचे सूर

छान जमले. यातूनच त्यांची रुपेरी पडद्यावरील रोमॅन्टीक दृश्य छान खुलत. 'आप की कसम' मध्ये तर विशेषच! 'करवटे बदलती रहे सारी..' (लता मंगेशकर व किशोरकुमार), 'पास नही आना..' (लता मंगेशकर व किशोर), 'सुनो हा कहो!.' (लता व किशोरकुमार), 'जय जय शिव शंकर..' (लता व किशोरकुमार) या गाण्यात ते फारच दिसते हो! अर्थात या नात्यात विश्वास होता, आपलेपण होते! चित्रपटातील 'चोरी चोरी चुपके चुपके..' (लता मंगेशकर) व 'जिंदगी के सफर मे..' (किशोरकुमार) ही गाणीदेखील लोकप्रिय! आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत! त्या काळात एकाच चित्रपटातील सर्वच्या सर्व गाणी लोकप्रिय हे अनेकदा घडे! आणि ती गाणी पाहण्यासाठी चित्रपटगृहात पुन्हा पुन्हा जावेसे वाटे! 'आप की

कसम' ला मुंबईतील मेन थिएटर 'नाझ'मध्ये रौप्य महोत्सवी यश! "आप की कसम" चा मुहूर्त धर्मेंद्रच्या हस्ते झाला होता!

संजीवकुमारही भाव खाऊन गेला. त्याला कोणतीही व्यक्तीरेखा द्यावी. नाणे खणखणीत! अन्य भूमिकेत रहमान, दीना पाठक, ए. के. हनगल, जयश्री टी., मुराद, ज्यु. मेहमूद, सत्येन कप्पू, केश्तो मुखर्जी, सुंदर इत्यादी! चित्रपटाच्या क्लायमॅक्स कमल व सुनिता यांच्या आता वयात आलेल्या मुलीचे लग्न आहे. त्यात बरेच नाट्य आहे! एव्हाना कमल, सुनीता व मोहन वृध्द झालेत. या मुलीची भूमिका प्रियदर्शनी हिने साकारलीय. तिचे खरे नाव प्रिया वालावलकर. (दादर पोस्ट ऑफिसजवळ राह्यची). या चित्रपटाची आणखीन एक वेगळी आठवण!

बीबीसीने त्या काळात राजेश खन्नाच्या अफाट लोकप्रियतेवर (क्रेझवर) एक माहितीपट तयार केला! (त्याच्या प्रतिनिधीला राजेश खन्नाने बराच काळ ताटकळत ठेवला. तारखा रद्द केल्या यावरुन बरेच गॉसिप्स रंगले!) त्यात कश्मीरमधील याच "आप की कसम"च्या 'सुनो कहो..' या गाण्याच्या शूटिंगच्या वेळच्या राजेश खन्ना व मुमताजच्या मुलाखती आहेत!

"आप की कसम" एका रसिक पिढीचे वेड होते. फिल्मी अड्ड्यावर, कॉलेज कट्ट्यावर, इराणी हॉटेलमधील पानी कम चहासोबत त्या काळातील चित्रपटांच्या गप्पा रंगताना त्यात "आप की कसम" थीमपासून गाण्यापर्यंत चर्चेत! जे. ओम प्रकाश यांचा दिग्दर्शनातील विश्वास वाढला आणि त्यानंतर त्यांनी 'आशा', 'आशिक हू बहारों का', 'आखिर

क्यू?' इ. चित्रपटांचे दिग्दर्शन केले. आणि गुलजार दिग्दर्शित "आंधी" चित्रपटाची निर्मिती केली..!




त्या काळात गोष्टीला महत्व असे आणि ती मनोरंजनाच्या माध्यमातून पडद्यावर रंगवली जाई. "आप की कसम" म्हणूनच एकावन्न वर्षांनंतरही तसे व लोकप्रिय! (निळ्या रंगातील मजकुर या 'लिंक्स' आहेत. 'क्लिक' करा!)

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. २०

# पती व पत्नी संबंधावरील "आविष्कार"ची पन्नाशी वैशिष्ट्यपूर्ण!




पती व पत्नी यांच्या नातेसंबंधांवर लेख, कथा, कादंबरी, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरिज अशा सगळ्याच माध्यमातून अनेक वर्षे सतत लिहिले /बोलले /सांगितले /ऐकले /दाखवले/वा पाहिले जातेय. कधी त्यात 'वो' देखील येतो, असतो/असते! म्हणजे पतीची मैत्रिण वा पत्नीचा मित्र. कधी विवाहबाह्य संबंध तर कधी 'कॉन्ट्रॅक्ट

मॅरेज' अशी उपकथानके! त्यातच घटस्फोट, दुसरं लग्न असे आणखीन काही प्रकार!

दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांची 'पती व पत्नी' यांच्या नातेसंबंधांवरील "चित्रपट-त्रयी" (ट्रायोलॉजी) यात विशेष उल्लेखनीय.

अमर आणि मानसी हे त्यांच्या या 'चित्रपट-त्रयीतील "पती व पत्नी"!

'अनुभव' (१९७१) या चित्रपटात अमर (संजीवकुमार), मानसी ( तनुजा) हे पती पत्नी आणि तिचा मित्र शशी भूषण ( दिनेश ठाकूर)!



'आविष्कार' (मुंबईत रिलीज १४ जून १९७४) या चित्रपटात अमर (राजेश खन्ना), मानसी (शर्मिला टागोर) हे पती पत्नी व अमरची कार्यालयातील मैत्रिण रिहा (मिन्ना जोहर), मानसीचा परिचित सुनील (देवेंद्र खंडेलवाल) यांच्याभोवती कथाआशय!

'गृहप्रवेश' (१९७९) मध्ये अमर (संजीव कुमार) व मानसी (शर्मिला टागोर) हे पती पत्नी आणि अमरची मैत्रिण सपना (सारीका) यांच्याभोवती कथाआशय!



'आविष्कार 'च्या मुंबईतील प्रदर्शनास पन्नास वर्षे केव्हाच पूर्ण झाली आहेत हे विशेष!

या चित्रपटाची बासू भट्टाचार्य यांनी पूर्वतयारी सुरु केली तेव्हा मानसीच्या भूमिकेसाठी शर्मिला टागोरला घ्यावे असे थीमनुसार निश्चित केले. आणि त्यानुसार ते "दाग"( १९७३) च्या सेटवर शर्मिला टागोरला भेटायला गेले. तेव्हा त्यांनी अमरच्या भूमिकेसाठी राजेश खन्ना योग्य ठरेल असे म्हणताच शर्मिला टागोरने त्यांना म्हटलं, तो तर याच सेटवर आहे. त्यानुसार ते राजेश खन्नाला भेटले. त्याने अतिशय आवडीने हा चित्रपट साईन केला आणि आपल्या अतिशय बिझी शेड्युलमधून (त्याची डायरी वर्षे दीड वर्षे फुल्ल आहे, सगळ्याच तारखा दिल्या गेल्यात हे त्या काळातील हुकमी वाक्य. सुपर स्टार होता हो तो!). राजेश खन्नाने या

चित्रपटाला जास्त महत्व दिल्याचे चित्रपटसृष्टीत अनेकांच्या लक्षात आले आणि आश्चर्यही वाटले! त्याच वेळेस राजेश खन्ना आपले मित्र निर्माता व दिग्दर्शक शक्ती सामंता यांच्या 'अजनबी', मनमोहन देसाई दिग्दर्शित 'रोटी', जे. ओम प्रकाश दिग्दर्शित 'आप की कसम' या चित्रपटातही काम करत होता! शक्ती सामंता असेच एके दिवशी राजेश खन्नाला भेटण्यासाठी "आविष्कार"च्या सेटवर गेले, तेव्हा तो नेहमीपेक्षा जास्त प्रसन्न मूडमध्ये दिसला. यावर तो म्हणाला, नेहमीच्या रोमॅन्टीक भूमिका, मसालेदार मनोरंजन यापेक्षा काही वेगळे करावे म्हणून मी या चित्रपटात काम करतोय. मला काही बदल हवाय आणि तोच मला हा चित्रपट देतोय. राजेश खन्नामधील "कलावंता"ची गरज शक्ती सामंता यांनी जाणली

आणि त्यांची ही भेट त्या काळात चित्रपट मिडियात खूप चर्चेत होती!

"आविष्कार" मध्ये पती व पत्नीत विनाकारण तणाव आहे. अमर एका जाहिरात एजन्सीत काम करतोय आणि नवीनच नोकरीला आलेल्या रिटाच्या सहवासात तो सुखावलाय! पण त्यात कसलाही हेतू नाही. मानसीने रिटासारखं असावे ही त्याची अपेक्षा! त्याला उगाच वाटत असते की मानसी व सुनीलमध्ये काही विशेष नाते निर्माण झालेय. या सगळ्यातून अमर व मानसीत अंतर निर्माण झालेय, तणाव आहे! आपल्या लग्नाचा वाढदिवसही ते या सगळ्यात साजरा करतात. एके दिवशी दूधवाला आला म्हणून मानसी दरवाजा उघडते तेव्हा तिला दरवाजाबाहेर अतिशय छानसा पुष्पगुच्छ दिसतो. अमरने तो ठेवून आपल्या

नात्यातील तणाव कमी करण्याचा त्याचा हेतू असतो...

राजेश खन्नासाठी ही अगदी वेगळीच भूमिका होती. एका दृश्यात तो व मानसी आपल्यात अंतर राखून बेडवर पडलेत. अमर सिगारेटच्या धुराच्या धुक्यातून शून्य नजरेने पाहतोय... या दृश्याचे तात्कालिक समीक्षकांनी विशेष कौतुक केले. गंभीर मुद्रेतील राजेश खन्ना हे विशेष होते. राजेश खन्नाने आपल्या कारकिर्दीत असित सेन दिग्दर्शित 'खामोशी' व 'सफर', शक्ती सामंता दिग्दर्शित 'अमर प्रेम', यश चोप्रा दिग्दर्शित 'इत्तेफाक', ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' व 'बावर्ची' आणि बासू भट्टाचार्य दिग्दर्शित 'आविष्कार' या चित्रपटात 'नॉन ग्लॅमरस' अशा वेगळ्या भूमिका साकारत आपल्यातील कसदार,

अष्टपैलू अभिनेत्याचा प्रत्यय दिला!

"आविष्कार" साठी त्याने आपल्या नेहमीच्या मार्केट प्राईजपेक्षा कमी पैशात काम केल्याचेही खूप गाजले! (एका अर्थपूर्ण भूमिकेसाठी त्याने तसे केले हो! त्यात त्याचे अभिनयावरचे प्रेम दिसते.)

"आविष्कार"ची गीते कपिल कुमार व ज्ञानदेव अग्निहोत्री यांची तर संगीत कनू रॉय यांचे. 'हंसने की चाह ने कितना मुझे..' (मन्ना डे), 'बाबुल मोरा नैहर छुटो..' हे पारंपरिक गीत (जगजितसिंह व चित्रा सिंह), 'नैना है प्यासे मेरे..' (आशा भोसले), 'माँ को पुकार के पुछा बच्चेने..' (मन्ना डे) यांच्यासह राजेश खन्नाने गद्यात सादर केलेले 'महाशून्य के महान विस्तार मे' याचा समावेश आहे! या चित्रपटाचे संवाद ज्ञानदेव अग्निहोत्री यांचे,

छायाचित्रण  नंदो भट्टाचार्य यांचे तर संकलन एस. के. चक्रवर्ती यांचे!

राजेश खन्ना व शर्मिला टागोर ही त्या काळातील रसिकप्रिय जोडी! शक्ती सामंता दिग्दर्शित "आराधना" (१९६९) पासून छान जमली, शोभली, रसिकांना आवडली! त्यानंतर ही जोडी 'अमर प्रेम', 'सफर', 'त्याग', 'मालिक', 'छोटी बहू', 'राजा रानी' व 'दाग' या चित्रपटात एकत्र आली. 'बदनाम फरिश्ते' व 'नसिब'मध्ये ते पाहुणे कलाकार म्हणून होते! शक्ती सामंता दिग्दर्शित 'कटी पतंग' मध्येही हीच जोडी असती पण शर्मिला टागोर  गरोदर असल्यानेच तिने नकार दिला! (सैफ अली खानचा जन्म तेव्हाचा). 'छोटी बहू'मध्ये अगोदर सायरा बानू होती. पहिल्या शेड्युलनंतर तिच्या जागी शर्मिला टागोर आली. (यामुळेच

राजेश खन्ना व सायरा बानू या जोडीचा 'छोटी बहू'मधला फोटो एक्स्युझिव्हज ठरला!).

'आविष्कार' या जोडीचा अगदी वेगळाच चित्रपट. मुंबईत मेन थिएटर रिगल व नॉव्हेल्टी असा तो प्रदर्शित झाला. खुद्द राजेश खन्नाला आपल्या कामाचे भरपूर समाधान मिळाले हे जास्त महत्वाचे..! बासू भट्टाचार्य यांच्या चित्रपट दिग्दर्शनाचे प्रगती पुस्तक 'तिसरी कसम' (१९६६), 'आस्था' (१९९७) वगैरे चित्रपटांनी भरले आहे, 'आविष्कार' त्यात वेगळ्याच वळणावरचा! (निळ्या रंगातील मजकुर या 'लिंक्स' आहेत. 'क्लिक' करा! आपल्या 'स्मार्ट टीव्ही' वर अवश्य आस्वाद घ्या)

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

# लेख क्र. २१

## "संगम "@६०
## चक्क दोन मध्यंतर.. रसिकांना आवडली!




'राज कपूरचे तुमचे सर्वात आवडते रुप कोणते?' असे कोणी विचारताक्षणीच मी उत्तर देतो... 'दिग्दर्शक राज कपूर!' समोरच्याच्या चेहऱ्यावरचा आश्चर्याचा भाव लपत नाही! 'अभिनेता' राज कपूर असं मी म्हणेन अशी त्याची अपेक्षा असते! सर्वप्रथम त्याच्यातील दिग्दर्शक महत्वाचा, त्याच्यातील दिग्दर्शकाच्या मनात कथा-

आशय निश्चित होत जाताना त्याच्यातील निर्माता, थीमनुसार कलाकारांची निवड, तंत्रज्ञांची निवड अशा अनेक गोष्टींसह तो कार्यरत होणे अगदी स्वाभाविक! राज कपूरचा शोध कधीच न संपणारा आणि ग्लॅमर व गॉसिप्सपेक्षाही खूपच मोठा "अभ्यासाचा विषय" आहे..! आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीही अभ्यासाच्या खूप गोष्टी आहेत. असाच त्याचा दिग्दर्शक म्हणून अभ्यासावा असा चित्रपट "संगम"! निर्माता राज कपूरच्या आर. के. फिल्म बॅनरखालील आर. के. स्टुडिओचा हा पहिला रंगीत चित्रपट! आणि दिग्दर्शक राज कपूरने हा चित्रपट चक्क दोन मध्यंतरसह पडद्यावर साकारला! चित्रपट रसिकांनी हे दोन मध्यंतर स्वीकारले! पण तेही एकदाच हेही सांगायला हवेच. चित्रपटाच्या जगातील एक..

**वेगळाच भन्नाट विक्रम!**

राज कपूर निर्मित, दिग्दर्शित, संकलित आणि अभिनित 'संगम' (रिलीज १८ जून १९६४) आणि 'मेरा नाम जोकर' (रिलीज १८ डिसेंबर १९७०) आणि सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन' (रिलीज ५ ऑगस्ट १९९४). हे तीन.. 'दोन' मध्यंतरांचे चित्रपट! तुम्ही हे तीनही चित्रपट पाहिले असणार! "संगम" यशस्वी प्रदर्शनास साठ वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणून हा फोकस! ('लिंक्स' देतोय. सिनेमे नक्की पहा !)

आणि यापैकी फक्त आणि फक्त 'संगम' फस्ट रनला रौप्यमहोत्सवी यशाच्या आठवड्या पर्यंत दोन मध्यंतरचा चित्रपट म्हणूनच रसिकांनी एन्जॉय केला! मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर अप्सरा होते. खरं तर मूळ लॅमिन्टन थिएटर (ते

इंग्रजकालीन होते!) ते पाडून त्या जागी उभे राहिलेल्या अप्सराचे 'संगम' च्या राज कपूर 'शोमनशीप स्टाईल' प्रीमियरने भव्य उदघाटन झाले. तात्कालिक चित्रपट समीक्षकांना 'फर्स्ट डे फर्स्ट शो'ला खास आमंत्रित केले असता पुरण पोळीचे जेवण होते असे त्या काळातील सिनेपत्रकार जिभेवर गोड चव ठेवून सांगत!

त्या काळात मोठ्या चित्रपटांच्या प्रीमियरच्या वेळी थिएटरबाहेर आणि अगदी पलीकडच्या फुटपाथवरही 'फिल्म-दीवाने' आपल्या आवडत्या स्टारचे दूरुन का होईना पण दर्शन घडावे म्हणून पोलिसांची लाठी खावूनही खचाखच गर्दी करीत! चित्रपट फॅन्सच्या अशाच अफाट क्रेझवर आपल्या देशात चित्रपट.. समाजाच्या अगदी खालच्या माणसापर्यंत

पोहचला!

राज कपूर, वैजयंतीमाला आणि राजेंद्रकुमार या तीन स्टारभोवतीचा प्रेमाचा श्रवणीय गीत-संगीतमय उत्कट आणि असोशीने भरलेला त्रिकोण आणि त्यातच युरोपचे दिलखुलास आणि भरभरून दर्शन हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य! एकूण चोवीस रिळांचा चित्रपट आहे. म्हणजे २३८ मिनिटे! पडद्यावर पहिल्या मध्यंतराला आले, First Intermission आणि नंतरच्या मध्यंतराला आले, Second Intermission. दोन मध्यंतरामुळे थिएटरचे कॅन्टीन अधिक फायद्यात राहिले असेल, थिएटरबाहेरचा वडा-पाववाला अधिक सुखावला असेल असा काही निष्कर्ष तुम्ही काढलात तरी चालेल. याचे कारण म्हणजे, चालणारा चित्रपट अशा आजूबाजूच्या लहान मोठ्या उद्योगानाही

**जगवतो. त्या काळात याच 'सिंगल-स्क्रीन' थिएटर्समधील वेफर किती महाग यावर चर्चा होत नसे! (काही वर्षांपूर्वी पॉपकॉर्नची झाली म्हणून म्हटलं!) चित्रपटावर भरभरून बोलण्याचे ते युग होते! अप्सरा थिएटरमध्ये 'संगम'चे दिवसा 'तीन' खेळ होत आणि त्याच्या वेळा होत्या, सकाळी अकरा वाजता, दुपारी साडेतीन आणि रात्री आठ वाजता. तर लालबागच्या जयहिंद चित्रपटगृहात 'संगम' साठी वेळा होत्या, सकाळी पावणेआठ, दुपारी बारा, संध्याकाळी सव्वाचार आणि रात्री साडेआठ! पारंपरिक वेळेपेक्षा वेगळ्याच! पण पिक्चर हिट होताच स्वीकारल्या गेल्या! मुंबईत तेव्हा "सातच्या आत घरात" अशी संस्कृती होती! मुंबईची सीमा प्रामुख्याने वांद्रयापर्यंत होती! अंधेरीत मोठ्याच प्रमाणावर म्हशींचे गोठे होते.**

गोरेगाव तर जणू गाव वाटे. ठाणे अगदीच दूरवरचे वाटे! शहरात संध्याकाळी दिवे लावण्यासाठी व सकाळी बंद करण्यासाठी कर्मचारी येई! ट्राम बंद होत होती. ॲम्बॅसेडर टॅक्सी, घोडागाडी, बेस्ट बस मोठ्याच प्रमाणावर असे.. घरात जावू देत संपूर्ण चाळीत एक दूरध्वनी अर्थात फोन हे श्रीमंतीचे मानले जात असे. सरळ, शांत, साधे व आदर्शवादी असे जगणे होते! "संगम"ची कथा-विस्तार नाट्यमय असल्याने या चित्रपटाची लांबी बरीच लांबली..! दोन मित्र एक प्रेयसी या प्रेम त्रिकोणात समज, गैरसमज, नाट्य, चढउतार होते! आणि त्यानेच या चित्रपटाचा मोठा प्रवास सुखकर केला! (हा चित्रपट मूलतः साने गुरूजींच्या 'तीन मुले' या कादंबरीवर आधारित असावा असे काहींचे म्हणणे आहे!) या चित्रपटाचे लेखन इंदर राज

आनंद यांचे तर गीते शैलेन्द्र आणि हसरत जयपुरी यांची असून संगीत शंकर-जयकिशन यांचे आहे! प्रत्येक गाणे कथेत नाट्य निर्माण करते! 'हर दिल जो प्यार करेगा..' (लतादीदी व रफी यांच्यात अबोला!) 'बोल राधा बोल..', 'ये मेरा प्रेमपत्र पढकर..', 'ओ मेरे सनम..', 'मै क्या करु राम..', 'दोस्त दोस्त ना रहा..' ही या चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत! 'मै क्या करु राम..' (हे गाणं ज्याप्रकारे चित्रित झाले आहे त्यावर लतादीदी खूपच नाराज झाल्या होत्या, असे ऐकिवात आले आहे! चक्क अबोला धरला होता!)

'संगम' निर्मितच्या काळात राज कपूरमधला रोमॅन्टीझम वैजयंतीमालाच्या छान सहवासात अधिकच खुलला, फुलला! तो तिच्या प्रेमात पडला आणि ही "ब्रेकिंग न्यूज" समजताच राज कपूरची

पत्नी कृष्णा कपूर आपल्या तीनही मुलांना (रणधीर, ऋषि व राजीव) घेऊन मरीन ड्राईव्हवरील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये राह्यला गेली हे गॉसिप्स भारी हॉट ठरले! तीन चार दिवसानंतर तिचा राग मावळला! राज कपूरही नरमला (खरंच की काय?!). 'संगम ' म्हटलं की ही गोष्टदेखील सांगावी लागतेच! हेही राज कपूरचे यश? सुरुवातीस या चित्रपटाचे नाव 'घरोंदा' होते आणि आपल्या मित्राच्या भूमिकेसाठी राज कपूरने दिलीपकुमारला ऑफर दिली. काही कारणास्तव जमलं नाही म्हणून त्या जागी राजेंद्रकुमार!

या यशानंतर 'चोवीस तास सिनेमा'मय असलेले व्यक्तिमत्व म्हणजे राज कपूर असे कौतुकाने म्हटले जाते त्याच राज कपूरने 'मेरा नाम जोकर' घडवला. पुन्हा थीमनुसार (की सर्कसमुळे)

लांबी अबब म्हणावी अशी खूप मोठी आणि त्यामुळे पुन्हा दोन मध्यंतरचा चित्रपट! 'जोकर' त्याचा खूप महत्वाकांक्षी चित्रपट आणि चित्रपटाच्या थीममध्ये सर्कसला भरपूर फूटेज, (जणू पडद्यावर सर्कस दाखवण्यासाठीच हा चित्रपट आहे!) जोडीला एकाच चित्रपटात तीन प्रेमकथा (एक शालेय वयातील, ती भूमिका ऋषि कपूरने साकारलीय!) इतके सगळे असल्यावर चित्रपटाची लांबी खूप वाढणारच! सुरुवातीला या चित्रपटाची लांबी ४ तास आणि ४३ मिनिटे (दोन मध्यंतर!) अशी होती. हा चित्रपट प्रदर्शित करताना तो ४ तास १६ मिनिटे (दोन मध्यंतर!) अशा अवधीने पडद्यावर आला. 'फर्स्ट डे फर्स्ट' शोपासूनच तो पडला पडला अशी जोरदार आवई उठली! आणि त्याची लांबी कमी करुन ती १७८

मिनिटे (एक मध्यंतर) अशी करण्यात आली. मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर नॉव्हेल्टी होते. असो! ('यू-ट्युब'वर मूळचा चार तास सोळा मिनीटे! याची ही 'लिंक'! आपल्या स्मार्ट टीव्हीवर मस्त एन्जॉय करा! (मला ठळकपणे आठवतंय! "संगम" आणि "मेरा नाम जोकर" जेव्हां "व्हिडिओ कॅसेट्स" वर प्रदर्शित झाले, तेव्हां ते "दोन VHS" वर उपलब्ध झाले होते! ("शेमारू")! महाग पडायचं हो! "पायरेटेड" म्हणा किंवा "कॅमेरा प्रिंट" मिळायची पण "क्वालिटी" अगदी रद्दड असायची!)



'हम आपके है कौन' आम्हा समीक्षकांना लिबर्टी थिएटरमध्ये पब्लिकसोबतच 'फर्स्ट डे फर्स्ट शो' दाखविला! राजश्री प्रॉडक्सन्सचा चित्रपट असल्याने फॅमिली क्राऊड खूप होता! वातावरणात उत्साह होता! नवीन चित्रपटाच्या पहिल्या दिवशीचे 'फिल गुड' वातावरण खूप महत्त्वाचे असते! त्यातून 'पिक्चर' बद्दल रसिकांना कितपत उत्सुकता आहे याचे कळत नकळतपणे उत्तर मिळते. राजश्री प्रॉडक्सन्सच्या वतीने सुरुवातीला प्रत्येक शहरात एकाच थिएटरमध्ये सिनेमा रिलीज केला होता! ही सकारात्मक बिझनेस टॅक्टीज होती. सिनेमा सुरु होताना सेन्सॉर प्रमाणपत्रावर सवयीनुसार नजर टाकली आणि २३ रिळे असे वाचून आश्चर्य वाटलं. दिग्दर्शक सूरजकुमार बडजात्या याने इतके काय बरे

मांडलय हा प्रश्न कुतूहल वाढवणारा होता! आणि तासाभराने पडद्यावर आले ते First Intermission यावरुन ओळखले या चित्रपटाला दोन मध्यंतर आहेत! म्हणजे प्रॉडक्शन्सकडून आम्हा मिडियाला दोनदा नाश्ता मिळणार! चित्रपटाला 'फस्ट डे फर्स्ट शो' पासूनच हायफाय अथवा नवश्रीमंत रसिकांची पसंती मिळाली आणि सिनेमा सुपर-हिट झाला. पण लांबी जरा जास्त आहे हे लक्षात आले आणि थोडे एडिटींग करुन काही दिवसातच चित्रपट एका मध्यंतरचा करण्यात आला! हा चित्रपट जाणीवपूर्वक ३ तास २६ मिनिटांचा करण्यात आला, याचे कारण म्हणजे, व्हिडिओ कॅसेटमध्ये सामावू शकत नाही अशीही एक चर्चा रंगली! म्हणजे हा चित्रपट व्हिडिओ चोरीला गेला तरी तो सेफ राहिल, असे

व्यावसायिक गणित! म्हणजे, एकेका सिनेमामागे किती गोष्टींचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विचार केलेला असतो हे बघा आणि तेच खरे सिनेमाचे जग आहे!

'संगम' काही वर्षांनी सेकंड रनला अथवा मॅटीनी शोला रिलीज होताना मात्र त्यातील काही भाग कापून एका मध्यंतरचा करण्यात आला होता! आणि एकदा यशस्वी ठरलेला चित्रपट कायमस्वरुपी लोकप्रिय असतोच. 'जोकर' ला काही वर्षांनी पुन्हा पुन्हा रिलीज होताना अतिशय चांगली गर्दी होऊ लागली. 'हीना' (१९९१) च्या निमित्ताने रणधीर कपूरच्या मुलाखतीचा योग आला असता त्याने 'जोकर' ने नंतरच्या काळात रिलीज होताना उत्तम व्यावसायिक यश मिळवले असे मला अगदी उत्साहात सांगितल्याचे आठवतेय. 'हम आपके है कौन' चा काळ चॅनलच्या

जगाची हळूहळू वाढ होत असतानाचा होता. अनेकदा तरी तो चॅनलवर येत असताना त्याचा टीआरपी भारी असतोच...!

या तीन चित्रपटात एक कॉमन गोष्ट आहे हे तुमच्या लक्षात आले का? तीनही चित्रपटात गीत संगीत व नृत्याला भरपूर स्कोप आहे (हम आपके... तर संगीत की भाषा में बोलो चित्रपट आहे! पटकथेत गाण्यांना विशेष स्थान आहे!) या




लोकप्रिय गाण्यांनी हे एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्या ओलांडूनही फोकसमध्ये

ठेवलेत...! आजच्या गतिमान युगात आपण 'दोन मध्यंतरचा चित्रपट' अशी कल्पना तरी करु शकतो का? त्यापेक्षा दोन भागात तो चित्रपट पाहण्याची तयारी आपण ठेवू ("गॅन्स ऑफ वासेपूर" तसाच तर होता.) राज कपूरच्या दिग्दर्शन व संकलनात विलक्षण आत्मविश्वास व ताकद होती म्हणूनच "दोन मध्यंतर"चा "संगम" करायचे त्याला जमले, झेपले व पेलले. राज कपूर एकच असतो, एकदाचा जन्माला येतो आणि असा कायमचाच ठसा उमटवतो. तब्बल साठ वर्षांनंतरही "संगम" ची जादू कायम आहे यात बरेच काही आलेच...!

(निळ्या रंगातील मजकुर 'लिंक्स' आहेत.)

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. २२

### "निशांत" चक्क पन्नाशीपार....!?




"शोले" (मुंबईत रिलीज १५ ऑगस्ट १९७५) हे वादळ एकिकडे घोंघावू लागले होते! मुंबईनंतर देशातील विविध राज्यांत आता टप्प्याटप्प्याने "शोले" प्रदर्शित होत होत सामाजिक सांस्कृतिक वातावरणात उत्साह निर्माण होत होता! सगळीकडेच थिएटर्सवर हाऊसफुल्लचा फलक मुक्काम करण्यासाठीच लागत होता आणि अशातच श्याम बेनेगल दिग्दर्शित "निशांत"

(मुंबईत रिलीज ५ सप्टेंबर १९७५!) दाखल झाला! म्हणजेच या चित्रपटाच्या प्रदर्शनास आत्ता चक्क पन्नाशीपार झाली आहे!

"शोले" च्या अक्राळविक्राळ लाटेसमोर "निशांत"चा निभाव लागणे कठीण! पण "निशांत" हा नवसंकल्पनेतील एक नवचित्रपट (समांतर/न्यू व्हेव/कलात्मक) या पठडीतील बौद्धिक समाधान देणारा चित्रपट होता! हे मात्र नक्की!

सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपट कूस बदलत होता. अनेक गोष्टींची घुसळण होत होती! एकिकडे धमाकेदार मसालेदार मनोरंजक चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत थेटरात टाळ्या शिट्यांनी एन्जॉय केले जात होते, त्यातच मृणाल सेन दिग्दर्शित "भुवन शोम" (१९७०) पासून हिंदीत समांतर चित्रपट रुजू लागला! श्याम बेनेगल

दिग्दर्शित "अंकूर" (१९७३) ने त्याला मुख्य प्रवाहात आणले! बासू चटर्जी दिग्दर्शित "रजनीगंधा" (१९७४)ने स्वच्छ मनोरंजक चित्रपट रुजवला! सतराम रोहरा निर्मित "जय संतोषी माँ" (मुंबईत रिलीज ३० मे १९७५!) ने पौराणिक चित्रपटाची क्रेझ वाढवली. मनमोहन देसाई दिग्दर्शित "अमर अकबर ॲन्थनी" (१९७७)ने 'मल्टी स्टार कास्ट' चित्रपटाची जणू 'गरज' निर्माण केली! सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टी भारीच तेजीत होती. त्याचीच फळे आज मिळताहेत!

यात समांतर चित्रपटाला "आपलं अस्तित्व" राखणे आवश्यक होते! आणि त्यातीलच एक चित्रपट "निशांत"! या वास्तववादी चित्रपटाचे सगळे चित्रीकरण हैदराबादजवळील एका गावात झाले! या चित्रपटाची पटकथा विजय तेंडुलकर

यांची असून संवाद सत्यदेव दुबे यांचे आहेत. या चित्रपटाला वनराज भाटीया यांचे पार्श्वसंगीत आहे (हा चित्रपट गीतविरहित आहे! समांतर चित्रपटात गाणी नसत. प्रसंगानुरुप एकादे नृत्य असे! अपवाद श्याम बेनेगल दिग्दर्शित "भूमिका" या चित्रपटाचा! त्यात गीत संगीत व नृत्य आहे! मराठीतील अष्टपैलू अभिनेत्री 'हंसा वाडकर' यांच्या आत्मचरित्रावर आधारित हा चित्रपट आहे!)

"निशांत"चे कथासूत्र असे..! खेड्यातील तीन जमीनदार अण्णा (अमरीश पुरी), अंजैय्या (अनंत नाग), प्रसाद (डॉ. मोहन आगाशे) यांचा काहीसा भाबडा धाकटा भाऊ विश्वम (नसिरुद्दीन शाह) विवाहित असूनही गावच्या शिक्षकाच्या (गिरीश कर्नाड) बायको सुशीलावर (शबाना आझमी) कमालीचा फिदा होतो! त्याचे लाड करत

करत ते जमीनदार भाऊ त्या सुशीलाचे अपहरण करतात! विश्वम आपल्या पत्नी.. रुक्मिणीकडे (स्मिता पाटील) फारसे लक्ष देत नसतो! जमीनदार वृत्तीची दहशत, हिंसा आणि ग्रामीण भागातील गरीब स्त्रीचे शोषण याभोवती हे कथानक आहे! पोलीस पाटील (कुलभूषण खरबंदा) हे प्रकरण हाताळतो ते संशयास्पद ठरते! चित्रपट पाहताना आपण अगदी सुन्न होतो. आणि तीच या चित्रपटाची ताकद आहे. संकलक भानुदास दिवकर यांचाही खास उल्लेख हवाच. दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील टोपीवाला लेनमध्ये ते राहत. काही वर्षांनी त्यांच्या भेटीचा योग आला!

नसिरुद्दीन शाह आणि स्मिता पाटील यांची भूमिका असलेला हा पहिला चित्रपट! नसिरुद्दीन शाहने आपले आत्मचरित्र "And Then one Day!"

मध्ये आपल्या या पहिल्या चित्रपटासाठीची निवड यापासून बरेच काही लिहिले आहे! गिरीश कर्नाड यांनी "झू स्टोरी" मधील काम पाहून श्याम बेनेगल यांना नसिरुद्दीन शाहचे नाव सुचवले! श्याम बेनेगल यांच्या पहिल्या भेटीसाठी नसिरुद्दीन शाह पुण्यावरुन (तेव्हा तो पुण्यातील एफटीआयमध्ये होता.) पहाटेच बसने निघाला आणि पेडर रोडवरील त्यांच्या घरी लवकरच पोहचला! आपल्याला चित्रपटात काम मिळतेय याचा त्यात त्याचा आनंद होता! (दिल्लीत एनएसडीमध्ये असताना अमेरिकन कल्चरल सेंटरच्या नाट्य महोत्सवातील "झू स्टोरी" मध्ये नसिरुद्दीन शाहने भूमिका केली होती!) पंचेचाळीस दिवसांच्या चित्रीकरणात "निशांत" पूर्ण झाला!

"निशांत" आपल्या कारकीर्दीतील एक

सर्वोत्तम कलाकृती असे नसिरुद्दीन शाह मानतो यातच या चित्रपटाचे मोठेपण अधोरेखित होतेय! विशेष म्हणजे, या चित्रपटाच्या शूटिंगच्या निमित्ताने नसिरुद्दीन शाहने आयुष्यात एक विमानतळ पाहिले आणि मुंबई ते हैदराबाद (आणि रिटर्न!) असा पहिल्यांदाच विमान प्रवास केला! त्याच्यासाठी तरी तो विशेष रोमांचित होता!

चित्रपटात गिरीश कर्नाड, अमरिश पुरी, अनंत नाग, स्मिता पाटील, मोहन आगाशे, कुलभूषण खरबंदा, साधु मेहर, सविता बजाज यांच्याही भूमिका! (या चित्रपटाच्या वेळेस गिरीश घाणेकर श्याम बेनेगल यांचे सहाय्यक दिग्दर्शक होते. काही वर्षातच ते "प्रेम करुया खुल्लम खुल्ला" इत्यादी चित्रपटांनी मराठीतील एक यशस्वी दिग्दर्शक म्हणून नावारुपास आले!)

या चित्रपटाला कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७६), लंडन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७६), मेलबॉर्न आणि शिकागो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (१९७७) यात विशेष सन्मानाने गौरविण्यात आले!

'ब्लेझ फिल्म एन्टरप्रायझेस'च्या वतीने हा चित्रपट निर्माण करण्यात आला. या चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात श्याम बेनेगल यांचे कार्यालय ग्रॅन्ड रोड येथील 'ज्योती स्टुडिओ'त होते. (जेथे भारतातील पहिला हिंदी बोलपट अर्देशीर इराणी दिग्दर्शित "आलम आरा"चे चित्रिकरण झाले! १९३१ सालचा हा चित्रपट आहे!)

हिंदीतील समांतर चित्रपट चळवळीतील "निशांत" हा एक उल्लेखनीय चित्रपट! "शोले"च्या वादळातही त्याने आपले अस्तित्व दाखवले!

# कसदार चित्रपट असा आपली जागा निर्माण करीत असतोच असतो...!

## © दिलीप ठाकूर
## (कलाकृती मिडिया)

♥







♥

## लेख क्र. २३

## रोटी कपडा और मकान @५१ वर्षे
## 'बाकी कुछ बचा तो महंगाई मार गयी..!




मनोजकुमारच्या अभिनयावर दिलीप कुमारचा प्रभाव आहे, यात आश्चर्य नाही! दिलीप कुमार अभिनयाचे विद्यापीठ असल्यानेच ते स्वाभाविकच. (अहो, त्याने दिलीपकुमारची कायमच नक्कल केली असे कोणी पटकन तावातावाने बोलेलही!), पण त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील दोन गोष्टी कायमच महत्वाच्या! त्याने

आपल्या चित्रपटातून जपलेले सामाजिक व देशभक्तीचे भान (कोणी त्याला डोस म्हणतात!) आणि त्याचे गाण्याचे बेहतरीन टेकिंग! गाण्याचे व्यक्तिमत्व तो पडदाभर खुलवणार हे हुकमी! (सुभाष घईने कळत नकळतपणे मनोज कुमारचीच गाण्याच्या टेकिंगमध्ये कॉपी केली असे म्हणणारा चित्रपट रसिकांचा एक वर्ग आहे!)

आता हेच गाणे बघा!...

सर्वकालीन स्थिर असलेली एकच गोष्ट म्हणजे, महागाई. टिच्चून टिकून आहे! कमी होण्याचे नावच घेत नाही!

....आणि या सामाजिक, आर्थिक समस्येचे, वस्तुस्थितीचे मनोजकुमारच्या चित्रपटातून प्रतिबिंब पडले नसते तर आश्चर्यच!!

तुम्हालाही माहित्येय! महागाईची झळ जेव्हा

वाढते तेव्हा जनसामान्यांना हमखास आठवणारे गाणे.. 'बाकी कुछ बचा तो महंगाई मार गई, महंगाई मार गई...'

मनोजकुमारच्या 'रोटी कपडा और मकान' (प्रदर्शन १८ ऑक्टोबर १९७४) या चित्रपटातील हे आजही लोकप्रिय असलेले गाणे आहे! नि प्रत्येक काळात हे गाणे हमखास आठवते अशीच महागाईची स्थिर गोष्ट आहे! या चित्रपटाच्या प्रदर्शनास एकावन्न वर्षे पूर्ण झाली आहेत! (१८ ऑक्टोबर १९७४ रोजी मनमोहन देसाई दिग्दर्शित "रोटी" आणि नरेंद्र बेदी दिग्दर्शित "बेनाम" हेदेखील रिलीज झाले. शुक्रवार असावा तर असा!) मनोजकुमार या चित्रपटाचा लेखक, निर्माता, दिग्दर्शक, संकलक आणि नायक आहे. त्याची ती खासियतच. बहुत कुछ मनोजकुमार!

सत्तरच्या दशकाच्या पूर्वार्धात खूपच मोठ्याच प्रमाणावर देशभरात महागाई, साठेबाजी, भेसळीचे धान्य, रॉकेल तसेच 'डालडा' वगैरेसाठी भली मोठी रांग!, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई याबाबत समाजात खूपच मोठ्या प्रमाणावर असंतोष होता! राग धुमसत होता! काही राजकीय पक्ष आंदोलन करीत. (आता तसे तीव्र आंदोलन का करीत नाहीत असा प्रश्न पडतोय. पण उत्तर नाही. तो विषयच वेगळा! आजच्या ग्लोबल युगातील नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्गाला महागाई परवडतही असेल. काय सांगावे?) हे सगळे त्या काळातील चित्रपटातून येणे स्वाभाविक होतेच!

मनोजकुमार अशा गोष्टीत भरत असलेला फिल्मी मनोरंजनाचा रंग चित्रपट रसिकांना आवडत होता! (गोष्टीपेक्षा ते महत्वाचे असे!) जणू

आपल्याच मनातील भावना तो पडद्यावर साकारतोय अशी जनसामान्यांची प्रतिक्रिया! म्हणून तर त्याचे अनेक चित्रपट 'सुपरहिट' ठरले आणि आजही ते चित्रपट (उपकार, पूरब और पश्चिम, शोर, रोटी कपडा और मकान, क्रांती!) त्यातील गाणी आणि देशभक्तीचे संवाद यासाठी चर्चेत असतात. अनेकांच्या आठवणीत आहेत!

"रोटी कपडा और मकान" या नावातच जीवनावश्यक गोष्टी आहेत. (त्यात कालांतराने मोबाईल, ओटाटी, वीकेंड पिकनिक वगैरे आले!). त्यामुळेच हे नाव चित्रपट रसिकांना लगेचच अपिल झाले! आपलेसे वाटले! चित्रपटाच्या नावात बरेच काही असते असे म्हणूनच ते विचारपूर्वक ठेवा असे म्हणतात ते उगीच नाही! या चित्रपटात मनोजकुमार, शशी कपूर, झीनत अमान,

अमिताभ बच्चन, मौशमी चटर्जी, प्रेमनाथ, कामिनी कौशल, धीरजकुमार, अरुणा इराणी, सुलोचनादीदी, मनमोहन, मीना टी., कृष्ण धवन, रजा मुराद, राज मेहरा, मनमोहन, दर्शनलाल, ब्रह्म भारद्वाज, सी. एस. दुबे, इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. सी. एस. दुबे या चित्रपटाने गाजले. याच कारण, त्यांनी साकारलेला स्त्री-लंपट. (तोच तो वाण्याच्या गोडाऊनमध्ये मौशमीवर जबरदस्तीचा प्रयत्न करतो. हा प्रसंग खूपच वादग्रस्त ठरला!)

या चित्रपटातील 'मै ना भूलूंगा..', 'हाय हाय ये मजबूरी..' ( झीनत अमान मुसळधार पावसात चिंब चिंब झाली) , 'और नहीं बस और नही..', 'पंडितजी मेरे मरने के बाद..'! अशी सगळीच गाणी आजही लोकप्रिय! 'महंगाई मार गयी...!' ही कव्वाली तर जास्तच हिट आहे! कारण त्यात फार मोठे

सामाजिक भान आहे! वर्मा मलिक यांच्या या कव्वालीला लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे! हे गाणे लता मंगेशकर, मुकेश, नरेंद्र चंचल आणि जानी बाबू कव्वाल यांनी गायले आहे. विशेष म्हणजे ८ मिनिटे आणि बावन्न सेकंद इतके मोठे हे गाणे असूनही ते पुन्हा पुन्हा पहावेसे आणि ऐकावेसे वाटते! 'मै ना भूलूंगा..' संतोष आनंदचे! मनोजकुमार आपल्या चित्रपटातील गाण्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रभावी अशा रुपेरी पडद्यावरील सादरीकरणाबाबत ओळखला जातो. (पूर्वीच्या चित्रपटातून शिकण्यासारखे बरेच काही आहे हे अशा गोष्टीतही दिसतेय.)

....महागाईची बातमी आपल्या जगण्याचा जणू भाग झाले आहे. आणि त्यासह हमखास गाणे आठवते, 'महंगाई मार गई...'!

मनोजकुमारची मला सर्वात आवडती गोष्ट म्हणजे, त्याचे.. गाण्याचे अतिशय जबरा आणि दृश्य माध्यमाचा उत्तम वापर केलेले टेकिंग! शब्द सौंदर्य व दृश्य सौंदर्याचा रुपेरी मिलाप!

'मेरे देश की धरती..' (उपकार)

'पूरवा सुहानी आयी रे..' (पूरब और पश्चिम)

'भारत का रहने वाला हू..' (पूरब और पश्चिम)

'इक प्यार का  नगमा है...' (शोर)

'पानी रे पानी तेरा रंग कैसा..' (शोर)

..ही त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील त्याचा सर्वोत्तम टच असलेली "टॉप-फाईव्ह" गाणी!

ही 'हिट लिस्ट' आणखीन वाढवता येईल! आपल्याकडील हिंदी असो, मराठी असो वा कोणत्याही प्रादेशिक भाषेतील चित्रपट असो. गीत संगीत नृत्य म्हणूनच महत्त्वपूर्ण. ते त्या चित्रपटाचे

अस्तित्व कायमच दाखवते.

'अभिनेता' मनोजकुमारचे वेगळे मूल्यमापन होते. देशभक्त नायक 'भारतकुमार' अशी प्रतिमा असा तो ग्राफ आहे! त्या काळातील आघाडीच्या अनेक दिग्दर्शकांच्या चित्रपटात तो आहे अथवा होता. त्याच्याबद्दलच्या व्याख्येत चाहत्यांकडून आत्मियता, कौतुक आणि टीकाकारांकडून काहीशी हेटाळणी! तरी यशाचे गमक त्याच देशभक्त नायक याच प्रतिमेत आहे! त्याच्या दिग्दर्शनातील पहिला चित्रपट 'उपकार' (१९६७), नंतरचा 'पूरब और पश्चिम' (१९६९) यातील त्याच्या व्यक्तीरेखेचे नाव 'भारत' असल्याचे रसिकांना आवडले आणि तीच त्याची ओळख व इमेज झाली! म्हटलं तर योगायोग. पण पथ्यावर पडलेला. ही इमेज त्याला केवल कश्यप निर्मित व एस. राम

शर्मा दिग्दर्शित 'शहीद' ( १९६५) च्या यशाने आणि त्याने साकारलेल्या 'भगत सिंग' या व्यक्तिरेखेला रसिकांची दाद मिळाली यातून तयार झाली!

मनोजकुमारच्या एकूणच दिग्दर्शनाचा पट मांडताना 'शोर' बराच वेगळा. आणि त्याचा खास टच असलेला चित्रपट!




विशेष म्हणजे, उपकार, पूरब और पश्चिम, शोर व रोटी कपडा और मकान या चित्रपटांनी मुंबईत ऑपेरा हाऊसला ज्युबिली हिट यश संपादन केले..

'शोर' ची थीम मनोजकुमारच्या देशभक्तीच्या हुकमी फॉर्म्युल्यापेक्षा निश्चित वेगळी. 'रोटी कपडा और मकान' पासून मनोजकुमार फिल्मी झाला! पब्लिकला अमूकतमूक आवडेल असा समज करुन घेऊन देशभक्तीपर संवाद वगैरेवर भर देऊ लागला. त्याचा 'क्रांती' (१९८१) चक्क सलिम जावेदची पटकथा व संवाद असलेला 'पिरियड-सिनेमा'! काही प्रसंग हास्यास्पद! सलिम जावेदकडून हा.. मागणी तसाच पुरवठा! मनोजकुमारच्या भारतकुमार प्रतिमेवर प्रेम असलेल्या त्याच्या हुकमी क्राऊडने पिक्चर हिट केले आणि एकदा जोरात सुरु असलेला चित्रपट मग बरेच आठवडे चालतच राहतो. मुंबईत मेन थिएटर अप्सरामध्ये पन्नास आठवड्यांचा भारी मुक्काम केला, बरं का!?

मनोजकुमार यानंतर आपल्याच देशभक्त नायक या प्रतिमेत अडकला.. आणि थीमपेक्षा हुकमी दृश्ये (नायिका पावसात चिंब भिजणे, एकादा बलात्कार वगैरे) यात गडबडला! याचा परिणाम म्हणजे, त्याच्या दिग्दर्शनातील 'क्लर्क' (१९८९), 'जयहिंद' (१९९६) दणकून आपटले. मला आठवतय, 'जयहिंद'च्या कमालीस्तान स्टुडिओ तील शूटिंग रिपोर्टीसाठी आम्हा काही सिनेपत्रकाराना सेटवर बोलावले असता मनिषा कोईरालाची बराच काळ वाट पाहून मनोजकुमार कातावला होता. असे अनेक दिवस झाल्याने त्याने तेव्हाच 'पुरे झाले दिग्दर्शन' असे ठरवले!

गाण्याचे व्यक्तिमत्व पडद्यावर खुलवणे हे त्याच्या यशस्वी दिग्दर्शनातील सर्वात मोठे वैशिष्ट्य. 'शोर' मधील संतोष आनंद यांनी

लिहिलेली 'एक प्यार का नगमा है..' (लता मंगेशकर व मुकेश), इंद्रजितसिंग तुलसी यांनी लिहिलेली 'जीवन चलने का नाम..' (मन्ना डे, महेंद्र कपूर व श्यामा चित्तार), 'पानी रे पानी तेरा रंग कैसा..' (लता मंगेशकर व मुकेश), वर्मा मलिक लिखित 'शहनाई बजे ना बजे..' (लता मंगेशकर) ही सगळी गाणी सहज ओठांवर येतात आणि गुणगुणत असताना त्यांचे पडद्यावरचे सादरीकरण डोळ्यासमोर येतेच हे मनोजकुमारच्या दिग्दर्शन व संकलनाचे यश आहे. (मनोजकुमारला 'शोर' चित्रपटासाठी संकलनाचा फिल्म फेअर पुरस्कार प्राप्त झाला.) विशेष म्हणजे, पहिल्या दोन चित्रपटाना ('उपकार' आणि 'पूरब और पश्चिम') कल्याणजी आनंदजी यांचे संगीत असूनही आणि गाणी आजही लोकप्रिय असूनही 'शोर' साठी

मनोजकुमारने लक्ष्मीकांत प्यारेलाल यांची निवड केली. त्यांनीही कम्माल केली! सोपी चाल हे त्यांचे वैशिष्ट्य! विशेष म्हणजे 'पानी रे पानी..', 'जीवन चलने का नाम..', 'एक प्यार का नगमा,,' अशा तीन गाण्यात आयुष्याचे तत्वज्ञान आहे आणि ते सोप्या शब्दात व साध्या चालीत आले आहे आणि 'उपकार', 'शोर', 'रोटी कपडा और मकान' हे चित्रपट पन्नास पंचावन्न वर्षांनंतरही आजचे चित्रपट वाटताहेत तर मग आणखीन काय हवे..! असे अनेक चित्रपट थिएटरमधून उतरले तरी रसिकांच्या मनात कायमचे घर करतात!

'रोटी कपडा और मकान'च्या वेळेस चंद्रा बारोट मनोजकुमारचा सहाय्यक दिग्दर्शक होता आणि छायाचित्रणकार होते नरीमन इराणी. आणि या चित्रपटात अमिताभ बच्चनचीही भूमिका

असल्याचे आपणास माहित आहेच. याच चित्रपटाच्या निर्मितीच्या काळात "डॉन" च्या निर्मितीची मुळे रुजली....एक चित्रपट घडत असतानाच त्यात अशा अनेक गोष्टीही आकार घेत असतात!

अरे हो! मनोजकुमार यांनी 'शिरडी के साईबाबा' हा एक उल्लेखनीय असा चित्रपट बनविला होता! त्यांची त्या काळात नेमकी काय मानसिकता होती परमेश्वर जाणे..! पण एक मस्त कलाकृती घडली, हे महत्त्वाचे! (तुम्हाला आश्चर्य वाटेल पण शिरडीतील एका महत्त्वाच्या रस्त्याला मनोजकुमार यांचे नाव सन्मानाने देण्यात आले आहे!)

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. २४

## आंधळा मारतो डोळा @५२
## कधी उषा चव्हाणशिवायही दादा कोंडके सुपरहिट !!




मराठी चित्रपटात ग्रामीण कथानकावरील सर्वात लोकप्रिय जोडी दादा कोंडके आणि उषा चव्हाण! हे सांगायला कोणतेच पंचांग पाह्यची गरज नाही की गुगलवरही जायला नको! 'सोंगाड्या' पासूनच अशी काही जमली की दादा कोंडके यांची अन्य कोणी नायिका असू शकते यावर पब्लिकचा विश्वास नसे. 'यह पब्लिक है पब्लिक' त्यांनीच

आपल्या देशात चित्रपट व क्रिकेट रुजवले, वाढवले, पसरवले. पण अधूनमधून या दोघांचे बिनसायचं देखील (अतिपरिचयात अवज्ञा म्हणायचे काय?) आणि दादा कोंडके कधी अंजना मुमताज तर कधी जयश्री टी. तर कधी मधु कांबीकर यांना आपली नायिका म्हणून संधी देत! कधी हिंदीत स्वप्ना देखील असे. पण जेव्हा ते वेगळे असत तेव्हा दादा काय नि उषा चव्हाण काय एकमेकांचे नावही घेत नसत. नाही म्हणजे नाही! जणू कडक उपवास! एकदा त्यांच्यात केवळ योगायोगानेच एका सिनेपत्रकारामुळे त्यांच्यात 'पॅच-अप' झाले. झालं असं की, मुंबईतील रणजीत स्टुडिओत उषा चव्हाणची मुलाखत घ्यायला एक सिनेपत्रकार गेला असता त्याला तेथून दादांकडे ताडदेवच्या त्यांच्या ऑफिसमध्ये जायचे होते!

म्हणून उषा चव्हाणची मुलाखत झाल्यावर तो सिनेपत्रकार रणजीत स्टुडिओच्या ऑफिसमध्ये दादांना फोन करायला आला. उषा चव्हाणही सोबत होती (त्या काळात स्टुडिओच्या कार्यालयातील फोन कलाकार व पत्रकारांना वापरता येत!) आणि हीच संधी साधत त्या सिनेपत्रकाराने उषा चव्हाणला दादांशी बोलण्याचा केलेला आग्रह उषा चव्हाणने चक्क मान्य केला आणि एक वेळचे त्या दोघांचे भांडण मिटले! या अधूनमधून होत असलेल्या भांडणावर दादा कोंडके यांचे उषा चव्हाणला म्हणणे असे, उषा, माझा जन्म कृष्णाष्टमीचा आणि तुझा कालाष्टमीचा, म्हणूनच आपले सूर जुळतात..!

ही गोष्ट आजच का सांगितली?

कारण दादा कोंडके यांची हुकमी नायिका

उषा चव्हाण त्यांच्यासोबत नसलेला एक चित्रपट आहे. तो म्हणजे, 'आंधळा मारतो डोळा'! हा चित्रपट सर्वप्रथम पुणे शहरातील 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात ३१ ऑगस्ट १९७३ रोजी प्रदर्शित झाला. तेथे हाऊसफुल्ल गर्दीत सुरु असतानाच आता १६ नोव्हेंबर १९७३ रोजी मुंबईत आला रे आला! गिरगावातील सेन्ट्रल, दादरचे कोहिनूर, विलेपार्ले येथील लक्ष्मी, अंधेरीतील नवरंग, गोरेगावातील अनुपम, मालाडचे कस्तुरबा, बोरीवलीत अजंठा, कल्याणचे कृष्ण आणि डोंबिवलीतील गोपी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला! अर्थात 'फर्स्ट शो'पासूनच पिक्चर हिट! आणि मग पश्चिम महाराष्ट्र, खानदेश इत्यादी ठिकाणी टप्प्याटप्प्याने प्रदर्शित होत राहिला. तोपर्यंत लाऊडस्पीकर वरील याची गाणी, रसरंग

साप्ताहिकातून या चित्रपटाची माहिती रसिकां पर्यंत पोहचत होती. त्या काळात माध्यमे कमी असली तरी चित्रपट रसिकांपर्यंत पोहचत होता. आणि आज.... जावू देत! दादा कोंडके निर्मित पहिला चित्रपट 'सोंगाड्या' (पुणे शहरात प्रदर्शित १२ मार्च १९७१), मग दुसरा चित्रपट 'एकटा जीव सदाशिव' (पुणे शहरात अलका टॉकीजला प्रदर्शित ३१ मार्च १९७२) प्रदर्शित झाले.! योगायोगाने 'एकटा जीव सदाशिव' प्रदर्शित झाला त्याच दिवशी पुण्यात चित्रपती व्ही.



शांताराम दिग्दर्शित 'पिंजरा' प्रभातला प्रदर्शित झाला. दोन्ही सुपर हिट! आजही या दोन्ही चित्रपटांची गाणी लोकप्रिय! लोकप्रिय गाण्यांवर चित्रपट कायमच "चालत" असतो. या चित्रपटातील गाण्यांनी तर रेडिओ, लाऊडस्पीकर ते 'यू ट्यूब' चॅनेल असा प्रकार सुरु ठेवलाय!

इजा, बिजानंतर तिजा हवाच! बळकटी देण्यासाठी! पहिल्या दोन्ही चित्रपटांची कथा पटकथा व संवाद वसंत सबनीस यांचे तर दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांचे होते. आता दादांनीच 'आंधळा मारतो'...ची  कथा लिहिली. यशासह आलेला हा आत्मविश्वास म्हणायचा! दादा मुळचे लोककलावंत असल्याने चांगली गोष्ट सुचणे स्वाभाविक होतेच! 'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्यात ते ताज्या विषयावर पंचेस घेत. तसा

विनोदाचा टायमिंग सेन्स त्यांच्याकडे होता. पटकथा जगदीश खेबूडकर यांनी लिहिली. संवाद व दिग्दर्शन दिनेश यांचे. (प्रभाकर पेंढारकर यांचे टोपणनाव 'दिनेश') गीते जगदीश खेबूडकर व दादा कोंडके यांची व संगीत प्रभाकर जोग यांचे. पहिल्या दोन चित्रपटांना राम कदम यांचे संगीत होते. राम कदम यांच्याशी नंतर सूर कधी जुळलेच नाहीत. पडद्यामागच्या गोष्टी काही वेगळ्याच! त्या काळातील मराठी चित्रपटसृष्टीतून त्या फार बाहेर पडत नसत. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल माध्यमातून पूर्वीचे कलाकार मात्र जुन्या आठवणीत जात त्या सांगतात. (दादांचे सगळे सिनमे 'यू- ट्यूब'वर नाहीत, याची खंत वाटते! )

दादा कोंडके यांनी असे बदल केले आणि चित्रपटाचे नाव 'आंधळा मारतो डोळा'. नायिका

म्हणून अंजना मुमताजची निवड! कारण, नायिका शहरी. त्यामुळेच तशी नायिका हवी. (आणि उषा चव्हाण अन्य नायकांसोबत इतर चित्रपटात कार्यरत. तेही आवश्यक असते हो!) धुमाळ, जयशंकर दानवे, गुलाब मोकाशी, भालचंद्र कुलकर्णी, रजनी चव्हाण, सरस्वती बोडस, शांता तांबे, संपत निकम, दामोदर गायकवाड आणि पाहुणी कलाकार अरुणा इराणी!

पिक्चरची थीम अशी, दादा कोंडके यांची धमाल दुहेरी भूमिका! एक दादा कोंडके पब्लिक पसंत करताहेत. आता तर एकाच तिकीटावर दोन दादा कोंडके पाह्यला मिळताहेत! शहरात कृष्णकुमार आणि गावात भीमा! पब्लिकला एकाच तिकीटावर दोन दोन दादा कोंडके ही फुल्ल एन्टरटेन्मेन्ट पर्वणी! भीमाला पिक्चरचं वेडं असते!

त्याला वाटतं आपण मुंबईला जावूया नशीब पालटेल. (मुंबईची ही सर्वकालीन ओळख) कृष्णकुमारला त्याचे काका (जयशंकर दानवे) छळत असतात. त्याला मावशी (सरस्वती बोडस) वाढवते तर त्याचं बहिणीवर (रजनी चव्हाण) प्रेम आहे. कृष्णकुमार नेमका भीमाच्या गावात जातो तेव्हा कृष्णकुमारचे सवंगडी (धुमाळ वगैरे) त्याला भीमा समजतात तर मुंबईत भीमाला कृष्णकुमार समजतात. दिसायला सारखेच असल्यानेच अशी गंमत जंमत होणारच. कृष्णकुमारची प्रेयसीही (अंजना) फसते. यातून होणारी गंमत जंमत, गडबड गोंधळ, अफलातून धुमाकूळ म्हणजेच, 'आंधळा मारतो डोळा'..दादांना आपल्या चित्रपटाची नावे छान सुचत. याला दाद द्यायलाच हवी. दादा कोंडके यांनी यशाची हॅटट्रिक साधली

हे महत्वाचे! दादांचा पिक्चर रिलीज होतो ते पंचवीस आठवडे मुक्काम करण्यासाठीच. कधीही थिएटरवर जावे तर हार घातलेला हाऊसफुल्लचा फलक हुकमी! आणि ब्लॅक मार्केटमध्येही तिकीटाला मागणी. मला आठवतय 'सेन्ट्रल' थिएटरला त्या काळात अप्पर स्टॉलचे तिकीट दर 'दोन रुपये वीस पैसे' असे होते. दादा कोंडके गीतलेखनातही विशिष्ट शैली होती. प्रसंगाचा मूड त्यात ते पकडत आणि त्याच गाण्याच्या पडद्यावरच्या सादरीकरणाचे भान त्यांना असे. 'चल रं शिरपा देवाची किरपा..', 'ऐशी वर्षाची असून म्हातारी सांगतीया..', 'हिल हिल पोरी हिला..', 'नाना पुरे करा हा फाजिलपणा..' ही या चित्रपटातील गाणी दादा कोंडके यांनी लिहिलीत. तर जगदीश खेबूडकर यांची 'जीव भोळा खुळा..',

'अहो कारभारी..' (अरूणा इराणी) ही गाणी आहेत. दादा कोंडके यांना लोकसंगीताचा कान फारच चांगला. म्हणून तर नेहमीच ते गाण्यात भारी ठरत आणि गाणी हिट तर पिक्चरला रिपिट-रन हमखास! त्या काळात गाणी प्रतिभेतून जन्म घेत. ही गाणी आशा भोसले, उषा मंगेशकर व जयवंत कुलकर्णी यांनी गायलीत! चित्रपटाचे छायाचित्रणकार त्यागराज पेंढारकर आणि संकलन दादांचे हुकमी एन. एस. वैद्य. दादा कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओत शूटिंगचा डेरा टाकत. हाही चित्रपट तेथेच चित्रीत झाला. 'हिल हिल पोरी हिला..'चे शूटिंग चेंबूरच्या आशा स्टुडिओत झाले तर चित्रपटातील काही प्रसंग ग्रॅन्ट रोडच्या ज्योती स्टुडिओत चित्रीत झाली. मुंबईतील जुन्या काळातील अनेक स्टुडिओच्या जागी आता

**काही वेगळेच उद्योग आलेत!**

**दादांनी ओळीने तीनही चित्रपट हिटची साधलेली हॅटट्रिक त्यानंतर ते चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकत 'पांडू हवालदार' (१९७५) पासून पुढे कायम राहिली. पहिल्याच दिग्दर्शनात राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार! काही दाद द्याल की नाही? दादा कोंडके**




**यांनी आपले गुरु भालजी पेंढारकर दिग्दर्शित 'तांबडी माती' (१९६९) पासून चित्रपट माध्यम व व्यवसायात अभिनेता म्हणून पाऊल टाकले होते!**

मी मिडियात आल्यावर अर्थातच दादा कोंडके यांच्या अनेक भेटीगाठी, मुलाखती, त्यांच्या चित्रपटाच्या आऊटडोअर्स लोकेशनवर शूटिंग रिपोर्टिंगसाठी जाणे हे सातत्याने अनुभवले! चार दशके मी मिडियात असल्याने मला अशी चंदेरी/ सोनेरी/ रुपेरी संधी मिळत राहिली. आपल्या चित्रपटांचे शूटिंग पूर्ण झाल्यावर दादा मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांना कधी गोवा, तर कधी महाबळेश्वरला फिरायला नेत आणि मग दादांची अखंड/ प्रचंड मनसोक्त मनमुराद "बोलं" दाजी आपण ऐकत राह्यची. भरपूर माहिती व मनोरंजनाचा खुराक हुकमी..!!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. २५

## 'रफ्तार' @५० वर्षे
## विनोद मेहरा- मौशमी चटर्जी जोडी युग!




अभिनेता व अभिनेत्री जोडी कशी जमते?

सुपर हिट चित्रपटातील नायक नायिका यांना नवीन चित्रपटासाठी करारबद्ध करण्यात चित्रपटासाठीचे अर्थपुरवठादार (त्याशिवाय चित्रपट बनेलच कसा?) निर्माते व दिग्दर्शक प्रत्येक काळात इच्छुक असतातच!

आपली चित्रपटसृष्टी अशा अनेक अलिखित

नियमानुसार चालते. आणि तीच तर या क्षेत्राची गंमत आहे. यश हेच येथील चलनी नाणे!.. आणि त्या जमलेल्या जोडीलाही एकमेकांचा सहवास, स्वभाव आवडत जाणे स्वाभाविकच! मुळात तीही आपल्यासारखीच संवेदनशील माणसेच! चेहऱ्यावर रंग लावला, भूमिकेत ते शिरले, दिग्दर्शक लाईट्स कॅमेरा ॲक्शन असे म्हणताच तेच कलाकार भूमिकेत शिरतात! आणि एका यशस्वी चित्रपटानंतर आणखीन एका चित्रपटात, तर कधी एकाच वेळेस चार पाच चित्रपटात एकत्र काम करता करता त्यांच्यात कॅमेऱ्यासमोर सहजता येते, प्रेम दृश्यात आणखीन रंग भरतो! संकोच नसतो. कॅमेऱ्यापलिकडे अथवा कॅमेऱ्या मागे एकमेकांच्या सवयी, आवडीनिवडी माहित होत जातात, त्या जपल्या जातात! या सगळ्याच

गडबडीत गॉसिप्स मॅगझिनमधून त्याच जोडीबद्दल खरं खोटे अथवा वास्तव/आभासी असे प्रसिद्ध होत जाते! हे खरंतर वाईटच!

सत्तरच्या दशकातील अशीच एक लोकप्रिय व बहुचर्चित रुपेरी जोडी 'विनोद मेहरा व मौशमी चटर्जी'! या जोडीच्या दिग्दर्शक दिनेश रमणेश या जोडीच्या "रफ्तार" ( अर्थात 'वेग' वा 'स्पीड'!) या चित्रपटाच्या मुंबईतील प्रदर्शनास केव्हाच पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत! १४ फेब्रुवारी १९७५ रोजी "रफ्तार" मुंबईतील गंगा व अन्य चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. याच दिवशी मुंबईत मेट्रो थिएटर व इतरत्र गुलजार दिग्दर्शित "आंधी" देखील प्रदर्शित झाल्याने प्रसार माध्यम आणि चित्रपट रसिकांचे लक्ष त्याकडे जास्त असले तरी "रफ्तार" कडे दुर्लक्ष झाले नाही, हेही तितकेच महत्त्वाचे!

विनोद मेहरा बालकलाकार म्हणून चित्रसृष्टीत आला आणि मग वयात येताच नायक झाला! एफ. सी. मेहरा निर्मित व के. रमणलाल दिग्दर्शित "एलान" (१९७१) या चित्रपटात रेखासोबत काम करता करता त्यांनी चक्क लग्नदेखील केले, असे ऐकले होते! या लग्नापेक्षा नंतर त्यांची एकमेकांना सोडचिठ्ठी! आणि मग रेखाचा शिळा उपमा खावून केलेला आत्महत्येचा प्रयत्न जास्त गाजला! तिने यावर चक्क पत्रकार परिषद घेऊन आपल्यावरचा फोकस कायम ठेवला! मग दोघेही आपापल्या मार्गाने पुढे निघाले, खाजगी संबंध बाजूला ठेवून त्यांनी माणिक चटर्जी दिग्दर्शित 'घर', सावनकुमार टाक दिग्दर्शित 'प्यार की जीत' इत्यादी चित्रपटात एकत्र काम केले याला व्यावसायिकता म्हणतात! गॉसिप्सवाल्यांनी तेव्हापासून रेखाबद्दल एवढ्या

नि अशा गोष्टी शिजवल्या, रंगवल्या, पिकवल्या की तिच्यातील अतिशय मेहनती आणि अष्टपैलू गुणी कलाकाराकडे त्यांचे बरेचसे दुर्लक्षच झाले!

मौशमी चटर्जीचे कोलकात्यात (तेव्हाचे कलकत्ता) असतानाच संगीतकार व पार्श्वगायक हेमंतकुमार यांचा मुलगा 'रितेश' याच्याशी लग्न झाले आणि मग सासऱ्यांच्या प्रोत्साहन आणि ओळखीतून ती मुंबईतील चित्रपटसृष्टीत आली! आणि तिला सुरुवातीस मिळालेल्या चित्रपटात शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित "अनुराग" (१९७३) हा चित्रपट होता. त्यात अशोककुमार, नूतन, मा. सत्यजित, खास भूमिकेत राजेश खन्ना तसेच विनोद मेहरा व मौशमी चटर्जी यांची रोमॅन्टीक जोडी! मौशमी दृष्टीहीन असून चित्रपटाच्या 'क्लायमॅक्स'ला तिला त्या कुटुंबातील

बालकाच्या कर्करोगाने झालेल्या मृत्यूनंतर त्याचे डोळे दिले जातात व तिला दृष्टी प्राप्त होते! मुंबईत ऑपेरा हाऊस चित्रपटगृहात 'अनुराग' यशस्वी रौप्य महोत्सवी वाटचाल करत असतानाच विनोद




मेहरा व मौशमी चटर्जी जोडीला अनेक निर्माता व दिग्दर्शकांनी करारबद्ध करुन चित्रपटाचे मुहूर्त करुन शूटिंग सुरुदेखील केले! चित्रपटाच्या यशाची हीच तर गंमत असते! ते प्रसार माध्यमांपासून सगळ्यांचेच लक्ष वेधून घेते. "रफ्तार"ची गोष्ट ग्रामीण भागात घडते. त्या

काळात योगायोगानेच खच्चून भरलेल्या गोष्टी रुपेरी पडद्यावर अनेक येत आणि पब्लिकचीही पसंती मिळे! खरं तर त्या काळातील पब्लिक फारसा चौकस नसे! एक साधी गोष्ट आणि त्यात गीत संगीत व नृत्य यांचा तडका इतकीच अपेक्षा असे. तो फसला तर पिक्चर फ्लॉप! जमला तर पिक्चर किमान पन्नास वा शंभर दिवसांचे यश निश्चित! (चित्रपट आकाराला आणण्यात अनेक लोकांचे योगदान असते! आपली कलाकृती नावाजली जावी अशी प्रत्येक घटकाची मनोमन इच्छा असतेच असते!..) त्यानंतर तो काही वर्षातच मॅटीनी शो, गल्ली चित्रपट यातून अशा चित्रपटाचा प्रवास सुरु! चित्रपटात थीमनुसार नायिका रानीचा (मौशमी चटर्जी) नदीत बुडून मृत्यू झाला असा सगळ्यांचाच समज होतो पण तसे नसते! ती त्या

संकटातून बचावते आणि शहरात जाऊन 'रिना' या नावाने नवीन आयुष्य सुरु करते, याभोवतीच्या योगायोगाच्या नाट्यमय गोष्टी म्हणजे "रफ्तार" चित्रपट! राजवंश यांची ही गोष्ट आणि एस. आय. शिवदासानी यांची ही निर्मिती! चित्रपटात डॅनी डेन्झोपा, रणजित (या दोघांची आजही अतिशय उत्तम मैत्री आहे असे मध्यंतरी रणजितने मला एका मुलाखतीच्या निमित्ताने सांगितले!) मदन पुरी, सुंदर, मोहन चोटी, बिरबल, जानकीदास, ललिता कुमारी, अपर्णा चौधरी यांच्या भूमिका! चित्रपटाचे छायाचित्रणकार चमन के. जाजू. तर संकलन गोविंद दलवानी यांचे!

चित्रपटाची गीते वर्मा मलिक, ओमकार वर्मा व अभिलाष यांची तर संगीत 'सोनिक ओमी' यांचे! यातील 'संसार है एक नदीया..' हे मुकेश व आशा

भोसले यांनी गायलेले गाणे लोकप्रिय आहे. या गाण्यातील आशय खूपच महत्वाचा. या गाण्यामुळे "रफ्तार" अनेकांच्या लक्षात आहे! विनोद मेहरा व मौशमी चटर्जी यांनी 'अनुराग', 'रफ्तार', 'सबसे बडा रुपय्या', 'उमर कैद', 'दो झूठ', 'उस पार', 'मजाक', 'जिंदगी' अशा अनेक चित्रपटांत नायक नायिका साकारले. 'स्वर्ग नरक' या चित्रपटात दोघेही होते! पण.. पण मौशमी चटर्जी जितेंद्रची तर शबाना आझमी विनोद मेहराची नायिका होती असेही घडलंय....!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥



## लेख क्र. २६

## चुपके चुपके @५० वर्षे!
## निखळ मनोरंजन, खुसखुशीत विनोदाचा आस्वाद




'बेग़ाम इश्क का मजा ही 'चुपके चुपके' से करने मे है..'

'पती के गुण धीरे धीरे पता चलना चाहिए, उसे प्यार धीरे धीरे बढता है...'

'ऍक्टर क्या है...डायरेक्टर के हाथ की कठपुतली...!'

'जितना बडा जिस्म है, उतना बडा दिल भी दिया है...!'

'क्लायमॅक्स मे पहुंच कर ड्रामा की छुट्टी मत कराव...!'

गुलजार यांच्या खुसखुशीत, चुरचुरीत, मार्मिक, मिश्किल संवादाने अनेक प्रसंग खुलत, रंगत रंगत हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "चुपके चुपके" (मुंबईत प्रदर्शित ११ एप्रिल १९७५) निखळ मनोरंजन करतो! या चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्षे पूर्ण झाली असून आजही त्यातील प्रसंग आठवले तरी पटकन चेहऱ्यावर हास्य उमटते! (त्याचीच आज गरज आहे!) एक स्वच्छ मनोरंजक चित्रपट हे या चित्रपटाचे खास वैशिष्ट्य! अशा कलाकृती कधीच कालबाह्य होत नाहीत. ही मोठीच मिळकत!

हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील १९७५ हे अतिशय महत्वाचे वर्षे! हिंदीत एकाच वेळेस अनेक प्रकारचे चित्रपट पडद्यावर येतात

याचे "प्रगती पुस्तक" या वर्षी अधिकाधिक प्रमाणात दिसले! माझे ते शालेय वय होते आणि गिरगावातील खोताची वाडीत राहत असल्याने दक्षिण मुंबईतील त्या काळात सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहातून "स्टॉलचा पब्लिक" बनून हा विविधतेचा प्रभाव व प्रवास अनुभवत होतो! 'सामना' (पुणे शहरात १० जानेवारी १९७५), मुंबईत 'दीवार' (२४ जानेवारी), 'आँधी' (१४ फेब्रुवारी), 'प्रेम कहानी' (७ मार्च), 'अमानुष' व 'जमीर' (२१ मार्च), 'ज्युली' (१८ एप्रिल), 'धर्मात्मा' व 'पांडू हवालदार' (९ मे या एकाच शुक्रवारी), 'जय संतोषी माँ' (३० मे), 'खुशबू' (२० जून), 'शोले' व 'गरीबी हटावो' (१५ ऑगस्ट या एकाच शुक्रवारी), 'निशांत' (५ सप्टेंबर), 'प्रतिज्ञा' (१९ डिसेंबर) वगैरे! आणि त्यात "चुपके चुपके"!

कधीही कोणत्याही दृश्यापासून पहावा, तीच खुमारी! तीच रंगत! असे हलके फुलके मनोरंजन देणारे चित्रपट म्हणजे जणू जवळचे खास मित्रच! पुन्हा पुन्हा असे चित्रपट पहावेत व फ्रेश व्हावे! पन्नास वर्षांपूर्वी मुंबईत 'न्यू एक्सलसियर' चित्रपटगृहात या चित्रपटाने शंभर दिवसांचे यश संपादन केले, हे विशेष!

उपेंद्रनाथ गांगुली यांच्या "Chhadmabeshi" या बंगाली साहित्यवार आधारित 'छद्मवेशी' या बंगाली चित्रपटाची रिमेक म्हणजे "चुपके चुपके"! गुलजार यांचे लेखन व हृषिकेश मुखर्जी यांचे दिग्दर्शन ही गोष्टच चित्रपटाचा क्लास स्पष्ट करते! चित्रपटाची निर्मिती हृषिकेश मुखर्जी व एन. सी. सिप्पी यांची आहे! त्यांनीच "आनंद" वगैरे अनेक चित्रपट निर्माण केले. "चुपके चुपके"चे

छायाचित्रणकार जयवंत पाठारे आहेत! ह्रषिकेश मुखर्जी व जयवंत पाठारे हीदेखील एक दिग्दर्शक व छायाचित्रणकार अशी जमलेली जोडी! त्या काळातील चित्रपटांचे हेदेखील वैशिष्ट्य. (जयवंत पाठारे आमच्या गिरगावातील 'निकदवारी लेन'चे रहिवाशी.. याचा आम्हाला केवढा अभिमान.)

"चुपके चुपके"च्या चित्रीकरणाचा खास किस्सा आहे! याचे बरेचसे चित्रीकरण निर्माते एन. सी. सिप्पी यांच्या जुहू येथील बंगल्यात झाले यात ही एक विशेष उल्लेखनीय गोष्ट आहेच! याच बंगल्यात 'आनंद', 'नमक हराम', 'चुपके चुपके', 'सत्ते पे सत्ता' या चित्रपटांचे चित्रीकरण झाल्याचा अमिताभ बच्चन यानी गतवर्षी ब्लॉग लिहिला! तोच बंगला अमिताभ बच्चननी खरेदी केल्यावर त्याचे नाव 'मनसा' असे ठेवले होते! काही महिन्यांनी ते

नाव बदलून 'जलसा' असे ठेवले! आणि आता मुंबईत असल्यावर प्रत्येक रविवारी अमिताभ याच बंगल्याबाहेर येत आपल्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्यां चाहत्यांना आजही आपलेपणाने आवर्जून दर्शन देतात! (याच बंगल्यात 'इन्कार' इत्यादीचे चित्रीकरण झाल्याचेही दिग्दर्शक राज एन. सिप्पी यांनी एका भेटीत मला सांगितले होते!)

'चुपके चुपके' तुम्ही नक्कीच एन्जॉय केला असणार! त्यामुळेच प्रोफेसर परिमल त्रिपाठी अर्थात प्यारे मोहन अलाहाबादी (धर्मेंद्र) आणि प्रोफेसर सुकुमार सिन्हा (अमिताभ बच्चन) यांची मजेशीर जुगलबंदी तुम्ही मनसोक्त मनमुराद अनुभवा! (मी संपूर्ण सिनेमाची 'लिंक' दिलीय पहा की राव!) त्यात.. त्यांच्या पत्नी शर्मिला टागोर (धर्मेंद्रची) व जया बच्चन (अमिताभ) यांची साथ

आहेच! याशिवाय ओम प्रकाश, उषा किरण, लीली चक्रवर्ती, असरानी (ह्रषिदांच्या चित्रपटातील तो जणू हुकमी!), डेव्हिड, विशाल देसाई, नयना आपटे असे अनेक कलाकार याच रंजकतेत भर घालतात!

ह्रषिदांच्या चित्रपटातील गीत संगीत हे कायमच उल्लेखनीय राहिले आहे! यात आनंद बक्षी यांच्या गीतांना सचिन देव बर्मन यांचे संगीत. 'चुपके चुपके चल री..' (लता मंगेशकर), 'सारेगामा..' (मोहम्मद रफी व किशोरकुमार), 'बागों मे कैसे ये फूल खिलते है..' (लता मंगेशकर व मुकेश), 'अब के सजन..' (लता मंगेशकर) या गाण्यांचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरण डोळ्यासमोर येतेच. येथेही दिग्दर्शक दिसतो!

'चुपके चुपके' या चित्रपटाच्या निर्मितीची

प्रक्रिया सुरु होताना त्यात विनोद मेहरा, रेखा, रितेशकुमार, मौशमी चटर्जी यांच्या प्रमुख भूमिका आहेत असे वृत्त होते! 'रितेशकुमार' म्हणजे संगीतकार व पार्श्वगायक हेमंतकुमार यांचा मुलगा व मौशमी चटर्जीचा पती!' पण ही केवळ बातमीच राहिली! धर्मेंद्र, शर्मिला टागोर, अमिताभ, जया यांनी ह्रषिकेश मुखर्जी यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातून भूमिका साकारण्याचा तोपर्यंत अनुभव घेतला होता! विशेषत: जया बच्चनवर त्यांचा जास्त विश्वास हे सर्वज्ञात आहे! खरं तर, 'चुपके चुपके' पडद्यावर येईपर्यंत धर्मेंद्र 'ही मॅन' ('मै तेरा खून पी जाऊंगा..') आणि अमिताभ बच्चन 'अॅन्ग्री यंग मॅन' ('कौन है वो माय का लाल..') अशी इमेज झालेली! त्यांनी प्रासंगिक विनोद व शब्द चातुर्याची गंमत असे रसिकांसमोर आणणे व ते

स्वीकारले जाणे हे विशेष उल्लेखनीय!

हृषिदांनी आपल्या दिग्दर्शन कारकिर्दीत केवढी तरी विविधता दाखवली आहे! आणि त्यात एक विशेष गोष्ट! हलके फुलके मनोरंजन. त्यांच्या दिग्दर्शनातील 'बावर्ची', 'सबसे बडा सुख', 'चुपके चुपके', 'गोलमाल', 'खुबसुरत', 'नरम गरम', 'रंग बिरंगी', 'झूठ बोले कौवा कांटे' हे चित्रपट त्या वळणाचे. अंधेरी कुर्ला रोडवरील मोहन स्टुडिओ हृषिदांचा अगदी खास! सत्तरच्या दशकातील आणखीन एक विशेष! त्या दशकातील हृषिकेश मुखर्जी, गुलजार, बासू चटर्जी अशा दिग्दर्शकांचे अनेक चित्रपट तसेच बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'पती पत्नी और वो', 'मेरी बिवी की शादी', रजत रक्षित दिग्दर्शित 'दामाद' अशा स्वच्छ मनोरंजक चित्रपटांमुळे "सर्वांसाठी" (युनिव्हर्सल म्हणजे 'यू' )

व "फक्त प्रौढांसाठी" ('ॲडल्स' म्हणजे 'ए') याबरोबरच दर्जेदार (क्वालिटी म्हणजे 'क्यू') असेही प्रमाणपत्र देण्यात यावे अशीही बरीच चर्चा झाली. पण ती केवळ चर्चाच राहिली. म्हणून काय चित्रपटाचे महत्व कमी होत नाही!

"चुपके चुपके" मधीलच एक संवाद सांगायचा तर, 'जो है वो नही है...और जो नहीं है वो, वो कैसे हो सकता है.'

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥




♥

## लेख क्र. २७

### "बाझी" @३० वर्षे
### "डोले डोले" आमिर खान स्त्री वेषात नाचे नाचे..!




रुपेरी पडद्यावर (वा छोट्या पडद्यावरील एखाद्या विनोदी कार्यक्रमात) अभिनेत्यांनी 'स्त्री रुप' धारण करुन गीत संगीत व नृत्य सादर करण्याची आपली एक परंपरा आहे! त्यात मनोरंजन आहे, तीदेखील एक अभिनव शैली! (पण त्याचे 'हंसे' होवू नये अशी कसोटीही आहे!) मनमोहन देसाई दिग्दर्शित "किस्मत" (१९६८)

मधील 'कजरा मोहब्बतवाला..' या गाण्यावर विश्वजीत स्त्री रुपात नाचला यापासून प्रकाश मेहरा दिग्दर्शित "लावारीस" मध्ये अमिताभ बच्चन 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है..' या गाण्यापर्यंत उदाहरणे अनेक! राजकमल कलामंदिर (युवा विभाग) निर्मित व सचिन पिळगावकर दिग्दर्शित "अशी ही बनवाबनवी" मधील सचिन पिळगांवकर व लक्ष्मीकांत बेर्डे यांची 'स्त्री रुपे' आजही सोशल मिडियात लाईक्स मिळताहेत!

याच लोकप्रिय रुपात आमिर खानही? आणि त्यालाही तीस वर्षे पूर्ण होत आहेत!

सलिम अख्तर निर्मित, आफताब पिक्चर्स बॅनरखालील व आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "बाझी" या चित्रपटात हा फंडा पाह्यला मिळाला! मुंबईत हा चित्रपट १४ एप्रिल १९९५ रोजी प्रदर्शित

झाला! मात्र का कुणास ठाऊक? त्याला 'जेमतेम' यशावर समाधान मानावे लागले!

या चित्रपटात आमिर खानने 'ख्रिश्चन युवतीच्या मॉडर्न फॅशनेबल' रुपात "डोले डोले.." या गाण्यावर भन्नाट क्लब डान्स केला आहे! गाणे ऐकताना/पाहताना 'कम सप्टेंबर' या 'इंग्लिश' गाण्याची 'चाल' आठवेल! पार्श्वगायन कविता कृष्णमूर्तीचे असून संगीत अन्नू मलिकचे आहे!

आमिर खानच्या अनेक गोष्टींतील ही एक रंगतदार गोष्ट. काहीशीच जमलेली! आपला चित्रपट अधिकाधिक मनोरंजक करण्यासाठी आमिर खानने हेदेखील करुन दाखवले! हे गाणे पाहताना 'स्त्री' रुपातील आमिर खान 'रविना टंडन'ची आठवण करून देतो. हे गाणे आणि त्यातील आमिर खानचं रुपडं फारसे गाजले मात्र

नाही! "बाझी"चे लेखन आशुतोष गोवारीकर, नीरज वोरा व नौशिक मेहता यांचे आहे! चित्रपटाचे संवाद संतोष सरोजचे आहेत तर संकलन जावेद सय्यद यांचे आहेत! छायाचित्रण तेजा यांचे आहे! आशुतोष गोवारीकर चित्रपटातून लहान मोठ्या भूमिका साकारत असतानाच "पहला नशा" या चित्रपटाव्दारे दिग्दर्शनात उतरला! त्याचे हे




सकारात्मक पाऊल होते. या चित्रपटाचा यश प्राप्त झाले नाही तरी तो थांबला नाही! त्यानंतरचा त्याचा चित्रपट "बाझी" (नंतरच्या काळात अनेक चित्रपट. काही दर्जेदार तर काही फसलेले!)

आमिर खानने 'ॲक्शन हीरो' साकारलाय! 'इन्स्पेक्टर अमर दामजी राठोड' ही व्यक्तिरेखा त्याने साकारलीय! तोच 'ज्युली ब्रगेन्झा' हे रुप घेतो! ममता कुलकर्णी पत्रकार संजना रॉय या भूमिकेत आहे. यांच्यात प्रेम आहे! परेश रावल मुख्यमंत्री चतुर्वेदी उर्फ चौबे या भूमिकेत आहे. यासह या चित्रपटात आशिष विद्यार्थी, मुकेश रिशी, अवतार गिल, मुश्ताक खान, हैदर अली, रझा मुराद, अपराजिता, सतीश शहा, असरानी, दयाशंकर पांडे, दिनेश आनंद, कुनिका असे बरेच कलाकार आहेत! सर्व प्रकारचा मनोरंजनाचा मसाला भरलेला असा हा "बाजी"! त्याची चर्चा दोन कारणास्तव झाली! (त्यात तथ्य किती हे कधीच स्पष्ट झाले नाही! सिनेमाचे जग म्हणजे कशा ना कशाची कुजबुज होणारच!) आमिर खान.. ममता

कुलकर्णी यांच्यात मैत्री वाढतेय असे फिल्मी किस्से होते! एकत्र काम करताना ते स्वाभाविक होतेच असं मानले जात नाही! आणि दुसरी गाजलेली गोष्ट, आमिर या चित्रपटाच्या संकलनात विशेष रस घेतोय. (या वाक्याचा सूर असा की तो 'हस्तक्षेप' करतोय. आपला चित्रपट चांगला होण्यासाठी तसे तो करत असेल तर त्यात वावगं ते काय?)

"बाझी"च्या निर्मितीतून एक चांगली गोष्ट घडली! आशुतोष गोवारीकर व आमिर खान यांना एकमेकांचे स्वभाव, कामाची पद्धत, चित्रपट या माध्यम व व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याची जाणीव होत होत गेली आणि मग त्यातूनच आमिर खानने 'आमिर खान प्रॉडक्शन्स' या आपल्या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना केली आणि त्या निर्मिती संस्थेचा पहिला चित्रपट "लगान" ( २००१)

पडद्यावर आणला! या क्लासिक मनोरंजक चित्रपटाने ऑस्करच्या विदेशी चित्रपट विभागात नामांकन प्राप्त केले आणि तेव्हापासून आशुतोष गोवारीकर व आमिर खान यांना जवळपास सर्वच




स्तरावर सिरीयसली घेवू लागले, त्यांनी त्यात "बाजी" मारली! आजच्या डिजिटल पिढीला "बाजी" (लिंक) एकदा पाह्यला काहीच हरकत नाही. आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित एक मसाला चित्रपट म्हणून एन्जॉय करता येईल!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

## लेख क्र. २८

### "ज्युली" @५० वर्षे
### 'काळाच्या पुढची प्रेमकथा..!'




आजच्या ग्लोबल युगात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह खूपच मोठ्याच प्रमाणावर होताना आपण पाहतोय. पण पन्नास वर्षांपूर्वीचे सामाजिक, कौटुंबिक वातावरण अशा गोष्टी सहजपणे स्वीकारण्याइतके मोकळे असण्याची शक्यता नव्हतीच! त्यात एकाद्या चित्रपटात अशी गोष्ट असेल तर?

के. एस. सेतुमाधवन दिग्दर्शित "ज्युली"

(मुंबईत प्रदर्शित १८ एप्रिल १९७५. मुख्य चित्रपटगृह मेट्रो) या चित्रपटात ते होते. या चित्रपटाच्या प्रदर्शनास 'पन्नास वर्षे' पूर्ण झाली देखील! कथानक, त्याची धाडसी मांडणी, त्यातील भावनिक गुंतागुंत याबाबत हा चित्रपट काळाच्या खूपच पुढचा होता. पारंपरिक लोकप्रिय मनोरंजक चित्रपटातही काही वेगळी कथानके त्या काळात पाह्यला मिळत. मात्र त्या प्रयत्नांचे म्हणावे तसे कौतुक होत नसे!

शशी भट्टाचार्य (विक्रम) या हिंदू ब्राह्मण युवकाच्या प्रेमात ज्युली (लक्ष्मी) ही ख्रिश्चन ॲन्लो इंडियन युवती पडते! तमिळनाडूतील एका निसर्गरम्य गावात घडणारी ही गोष्ट! दोघांच्या प्रेमसंबंधातील असोशी, ओढ, उत्कटता यात काही मर्यादा ओलांडल्या जातात. अशातच शशी

भट्टाचार्य नोकरीनिमित्त शहरात येतो. आणि नेमक्या त्याच वेळेस 'ज्युली' गरोदर राहते. हा तिला प्रचंड धक्काच असतो! ही गोष्ट ती आपल्या आईला (नादिरा) सांगते. ती एक धाडसी निर्णय घेते.... चित्रपट एक वेगळे वळण घेत घेत क्लायमॅक्सला जातो!

मल्ल्याळी चित्रपट "चट्टाकारी" (१९७४) ची ही रिमेक! मूळ चित्रपटातील लक्ष्मी आणि तिच्या बहिणीच्या भूमिकेतील श्रीदेवी या हिंदी चित्रपटात आल्या. दोघींचाही हा पहिलाच हिंदी चित्रपट! श्रीदेवी तोपर्यंत बालकलाकार ते नायिका असा प्रवास करत होती. "ज्युली"च्या वेळेस ती अकरा वर्षांची होती! तमिळ व तेलगू चित्रपटातून तिचा तो प्रवास सुरु झाला होता. "ज्युली" मध्ये नादिरा, रिता भादुरी, ओम प्रकाश, उत्पल दत्त, जलाल

आगा, अचला सचदेव, राजेंद्रनाथ इत्यादींच्याही भूमिका आहेत. ओम प्रकाश ज्युलीच्या पित्याच्या भूमिकेत आहेत. पिता व मुलगी यांच्या नात्यातील घट्ट  वीण या चित्रपटात अतिशय प्रभावीपणे साकारलीय! त्या काळातील चरित्र कलाकार आपल्या भूमिकेत अधिकाधिक समरस होत. त्यांना तेवढा 'स्कोप'ही मिळे. (आज चित्रीत झालेली किती दृश्य पडद्यावर येतात हा प्रश्नच आहे. आणि यावर कलाकार काही बोलेलच असे नाही!)

"ज्युली" ची पटकथा चक्रपाणी यांची तर संवाद इंदर राज आनंद यांचे. गीत संगीत या प्रेमकथेची खासियत! आनंद बक्षी यांच्या गीतांना राजेश रोशनचे संगीत. 'दिल क्या करे जब किसी..' (किशोरकुमार), 'भूल गया सबकुछ..' (लता मंगेशकर व किशोरकुमार), 'सांचा नाम तेरा तू

श्याम मेरा..' (आशा भोसले व उषा मंगेशकर) या गाण्यांसह 'माय हार्ट इज बिटींग..' या इंग्लिश गाण्याचाही यात समावेश आहे. 'प्रीती सागर'ने हे गाणे गायले आहे. हिंदी चित्रपटातील हे पहिले इंग्लिश गाणे असल्याचे मानले जाते! पण तसे नाही. १९३७ सालच्या प्रभात फिल्म कंपनी या निर्मिती संस्थेच्या दिग्दर्शक व संकलक व्ही. शांताराम यांच्या "कुंकू" या चित्रपटात प्रसिद्ध इंग्रजी कवी लॉन्ग फेलो यांची 'In the world's broad field of battle..' ही कविता होती. या चित्रपटातील नायिका 'शांता आपटे' यांनीच ती गायलीय आणि संगीत केशवराव भोळे यांचे आहे! हा चित्रपट हिंदीत "दुनिया ना माने" या नावाने पडद्यावर आला होता. तर भप्पी सोनी दिग्दर्शित "एक फूल चार कांटे" (१९६०) या चित्रपटात

इंग्लिश गाणे होते. शैलेंद्र लिखित 'ब्युटीफुल बेबी ऑफ ब्रॉडवे..' हे इंग्लिश गाणे 'इक्बाल सिंग' यांनी गायले असून संगीत शंकर जयकिशन यांचे आहे!

"ज्युली" बद्दल त्या काळातील एक गाजलेले गॉसिप्स म्हणजे, "ज्युली"च्या भूमिकेसाठी झीनत अमानला ऑफर होती. पण 'ज्यूली' गरोदर असल्याचे दाखवलयं, त्यातील काही दृश्य साकारणे तिला पटले नाही म्हणून तिने नकार दिला. (झीनत अमानचा रुपेरी पडद्यावरील परफॉर्मन्स पाहता तिने खरंच असा विचार केला असेल का? की फक्त औपचारिक ऑफर होती?) "ज्युली" च्या यशाचा लक्ष्मीला हिंदी चित्रपटसृष्टीत फारसा फायदा झाला नाही. दोन चार हिंदी चित्रपट तिला मिळाले. त्याच वेळेस ती साऊथच्या पिक्चरमध्ये बिझी होती. "ज्युली" नायिकाप्रधान

चित्रपट असल्याने विक्रम दुर्लक्षित राहिला! ऐवीतेवी त्याच्या कारकिर्दीने कधीच आकार घेतला नाही. "सितम" नावाच्या चित्रपटाच्या दिग्दर्शनात तो अनेक वर्षे रेंगाळला! काही चित्रपट सर्वकालीन सदाबहार लोकप्रिय असतात पण त्यातील कलाकारांचे भाग्य उजळत नाही हे दुर्दैव. सिनेमाचे जग अशा अनेक लहान मोठ्या गोष्टींसह आजही वाटचाल करत आहे.

"ज्युली" प्रमाणेच त्या काळात दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांची रिमेक हिंदीत येत असे. "प्रेम नगर" पासून "प्यासा सावन" पर्यंत अनेक उदाहरणे आहेत. प्रसाद प्रॉडक्शन्सचा एल. व्ही. प्रसाद निर्मित व के. बालचंदर दिग्दर्शित "एक दुजे के लिए" या वाटचालीतील सर्वोत्तम उदाहरण! कालांतराने "बाहुबली" पासून साऊथचा

धमाकेदार चित्रपट एकाच वेळेस हिंदीसह अन्य भाषेत डब होऊन जगभरातील अनेक देशांत प्रदर्शित होवू लागला. आजच्या डिजिटल पिढीसमोर हे आजच्या काळातील उदाहरण होते. पण दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत रिमेक करण्यात येण्याचा प्रवास साठच्या दशकापासूनचा. त्यात "ज्युली" हा काळाच्या खूपच पुढचा धाडसी प्रेमपट. त्यातील लोकप्रिय गीत संगीताने रसिकांच्या किमान तीन पिढ्या ओलांडून त्याचा प्रवास सुरु आहे....हेदेखील मनोरंजक चित्रपटाचे यशच!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

# लेख क्र. २९

## "अपने रंग हजार" @५० वर्षे पण..रंगत आली नाही हो...!




'सुपर' नि 'सुपर्ब हिट' पिक्चरचीच नायक नायिका यांची जोडी घेऊन आणखीन एक चित्रपट निर्माण करायचा ही खेळी प्रत्येक वेळी यशस्वी ठरेलच असे नाही! चित्रपट रसिक पडद्यावर कलाकार पाह्यला नव्हे तर चित्रपटाकडून पैसा वसूल मनोरंजनाची अपेक्षा ठेवतात! त्याना गोष्ट

पाह्यची असते. आजच्या ग्लोबल युगात 'कन्टेन्ट' महत्वाचाअसतो!

"अनहोनी" (१९७३) हा रहस्यरंजक म्युझिकल चित्रपट सुपर हिट ठरल्यावर दिग्दर्शक रवि टंडनने त्याच चित्रपटातील संजीवकुमार व लीना चंदावरकर या जोडीला घेऊन आपल्याच




'किंग्ज प्रॉडक्शन्स' या बॅनरखाली "अपने रंग हजार" या चित्रपटाची निर्मिती केली! विशेष उल्लेखनीय गोष्ट, "अनहोनी" मधील कामिनी कौशल (त्यात नायिकेची आई होती, आता नायकाच्या आईच्या भूमिकेत! काही बदल

हवाच!), बिंदू, असरानी, पेंटल, मॅकमोहन, रणवीर राज या चित्रपटात पुन्हा. याशिवाय डॅनी डेन्झोपा, हेलन, गुरबचन सिंग, जानकीदास, सुधीर, सत्येन कप्पू इत्यादी!

संजीवकुमार व लीना चंदावरकर जोडी छान जमलेली. त्यातून काही गॉसिप्सदेखील. त्यांच्या नात्यात जवळीक वाढतेय वगैरे! जोडीचा राजा नवाथे दिग्दर्शित "मनचली" (१९७४) चित्रपटात लोकप्रिय! म्हणून "अपने रंग हजार" चित्रपट रसिकांनी स्वीकारायला हवा असेच काही नाही! चित्रपटात पाहण्यासारखे काही "रंग"तदार हवे ना? त्याचाच या चित्रपटात अभाव!

चित्रपटाच्या पहिल्याच दृश्यात पार्टी! आणि त्यात नायक (संजीवकुमार) नायिकेला (लीना चंदावरकर) सांगत असतो, अनेक युवती माझ्या

सहवासात येतात, पण मला मात्र प्रश्न पडतो, त्या माझ्या श्रीमंतीकडे पाहतात की माझ्याकडे? त्यांना माझा पैसा महत्वाचा वाटतो की मी? तुझ्याकडे पाहून मला वाटते, तू मला समजून घेशील...! आणि मग चित्रपटाची श्रेयनामावली सुरु होते. के. के. शुक्ला यांच्या पटकथेवरील हा नाट्यमय चित्रपट फार रोमांचक ठरत नाही! संजीवकुमार व लीना चंदावरकर जोडीच्या नावावर आणखीन एक फ्लॉप चित्रपट जमा झाला. पद्मनाभ दिग्दर्शित "इमान" हा या जोडीचा एक फसलेला चित्रपट!



"अपने रंग हजार"ची एकच गोष्ट लोकप्रिय ठरली! अंजान यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत! 'मेरी काली कलुटीये के नखरे बडे..' (किशोरकुमार) हे संजीवकुमार लीना चंदावरकरची छेडछाड काढणारे गाणे खूपच लोकप्रिय झाले. दोघांच्या छान जमलेल्या रुपेरी केमिस्ट्रीने गाण्यात रंगत आली. किशोरकुमार अशा उडत्या गाण्यात खूपच मोकळीक घेई. त्यामुळेच त्यात जास्त रंग भरे! 'गंगा मे डूबा ना जमूना मे डूबा..' (लता मंगेशकर) गाण्यात लीना चंदावरकरने प्रेम भावना उत्तम साकारल्या!

दिग्दर्शक रवि टंडनच्या कामाची क्षमता एकदम भारी होती. (रवि टंडन म्हणजे रविना टंडनचे पिता) त्यांचे एकाच वर्षी दोन चित्रपट पडद्यावर आणण्याची क्षमता तर बघा, १९७४

साली 'मजबूर' (अमिताभ बच्चन, परवीन बाबी, प्राण) आणि 'निर्माण' (नवीन निश्चल व अनुपमा). यातील "मजबूर" हा सलिम जावेद यांच्या पटकथेवरील उत्तरोत्तर रंगत आलेला चित्रपट! १९७५ साली 'अपने रंग हजार' व 'खेल खेल मे' (ऋषि कपूर, नीतू सिंग, राकेश रोशन, इफ्तेखार, देवकुमार) . त्यानंतरही आपली ही खासियत त्यांनी कायम ठेवली. आणखीन एक विशेष, 'खेल खेल मे' या रहस्यरंजक म्युझिकल सुपरहिट चित्रपटानंतर त्यातीलच कलाकाराना घेऊन त्यांनी 'झूठा कहीं का' (१९७९) हा चित्रपट पडद्यावर आणला, पण नाही हो, 'खेल खेल मे' चित्रपटाची सर! आपल्या सुपरहिट चित्रपटातील जोडी पुन्हा घेऊन चित्रपट निर्माण करण्याचा मोह रवि टंडन का टाळू शकले नाहीत? येथे दिग्दर्शक दिसतो असे

**मुळीच म्हणता येणार नाही बरं! असे करणारे रवि टंडन एकटेच दिग्दर्शक नाहीत, तर आणखीनही आहेत! जमलेली टीम कायम ठेवावी अशी त्यामागची व्यावसायिक रणनीती असते आणि ती कधी यशस्वीही ठरते..! सगळेच रंग सारखेच नसतात. काही फक्त नावापुरतेच असतात. अपने रंग हजारसारखे. या चित्रपटाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यावर "फोकस" हवाच.... मुंबईत हा चित्रपट २५ एप्रिल १९७५ रोजी प्रदर्शित झाला. मेन थिएटर 'अप्सरा'मधून काही मोजक्याच आठवडय़ात या चित्रपटाचा "रंग" उडाला!**

**© दिलीप ठाकूर**
**(कलाकृती मिडिया)**
♥

## लेख क्र. ३०

## "दिल ही दिल में" @२५ वर्षे!
## 'डिजिटल पिढीतील एका प्रेमाची गोष्ट..!'




फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट! रुपेरी पडद्यावर नायक व नायिका प्रेमात पडले रे पडले की एका झाडामागे जात.. आणि 'कॅमेरा' झाडाच्या वरच्या भागात जात आपल्याला दोन 'फुले' एकमेकांच्या जवळ आलेली दिसत! प्रतिकात्मक असे ते 'प्रेम दृश्य' असे. 'ब्लॅक अँड व्हाईट' अर्थात कृष्ण धवल

काळातील चित्रपट प्रेमगीतांमधून अतिशय मोठ्याच प्रमाणावर प्रेमरस वाहत आला आहे! कथा, कादंबरी, कविता, नाटक या सगळ्यापेक्षा चित्रपटातून (त्यातही हिंदी पिक्चर!) प्रेम, इश्क, लव्ह हे भरपूर प्रमाणात येत राहिले. बदलत्या सामाजिक सांस्कृतिक काळानुसार त्यात बदलही होत गेले. राज कपूर दिग्दर्शित "बॉबी" (१९७३) त्यात 'हम तुम एक कमरे मे बंद हो..' असे अतिशय धाडसी वळण आणले! प्रेमिकांमधील संकोच बाजूला पडत गेला. आदित्य चोप्रा दिग्दर्शित "दिलवाले दुल्हनिया ले जाऐंगे" (१९९५) मध्ये विदेशात (खास करुन युरोपमध्ये!) राहणाऱ्या भारतीय युवक युवतीचे चकाचक प्रेम दिसले! आज तीस वर्षांनंतरही दक्षिण मध्य मुंबईतील 'मराठा मंदिर' चित्रपटगृहात 'डीडीएलजे' मॅटीनी-शोला

दाखवला जातोय. प्रेमपट कधीच कालबाह्य होत नाहीत. ते कायमच चिरतरुण असतात.

काळ बदलत बदलत आजच्या डिजिटल युगापर्यंत आला! आज एका 'क्लिक'वर जगभरातील माहिती व मनोरंजनाचे अफाट दालन आपल्यासमोर सज्ज होत आहे! त्यात तत्थ किती हेही जाणून घेण्यात हेही कोणाला जाणून घेण्यात रस नाही!

या 'इंटरनेट युगात' रुपेरी पडद्यावरील प्रेमपटातही काही नावीन्य यायला हवेच! ए. रत्नम निर्मित व कातिर दिग्दर्शित "दिल ही दिल में" या चित्रपटात ते दिसले! तेही चक्क 'पंचवीस वर्षांपूर्वी'! हा मूळ तमिळ चित्रपट! Kadhalar Dhinam असे त्याचे नाव! १९९९ साली तमिळनाडूसह दक्षिणेकडील अन्य राज्यात प्रदर्शित झाला! तो

हिंदीत आणताना काही भागांचे हिंदीत चित्रीकरण! तर बराचसा भाग 'हिंदीत' डब आणि मग! मुंबईत तो २१ एप्रिल २००० रोजी प्रदर्शित झाल! त्याला पंचवीस वर्षे पूर्ण झाली देखील... आणि आज आपले एकूणच आयुष्य जणू डिजिटलच्या जाळ्यात सापडलेय! आभासी जगात वावरायची जणू सवय झालीय! आणि त्यात 'ऑनलाईन प्रेम' जुळू तर लागलयं. लग्नही होताहेत!

या चित्रपटातही राजा (कुणाल सिंग) व रोजा (सोनाली बेन्द्रे) यांचीही ओळख इंटरनेटवरच होते! ती वाढत वाढत जाते. त्यांच्यात प्रेमाचे धागे विणले जातात. आता 'लाईक्स आणि कॉमेन्टस' यापेक्षा पुढे जायचे ठरवतात आणि एकमेकांना आपले फोटो पाठवून मग प्रत्यक्षात भेटायचेही ठरवतात!

गंमत म्हणजे दोघेही जण आपण विदेशात असतो असे एकमेकांवर इम्प्रेशन मारण्यासाठी सांगतात! प्रत्यक्षात ते चेन्नईतील एकाच महाविद्यालयात शिकत असतात. पहिल्याच भेटीत त्यांच्या ते लक्षात येते, तरी त्यांचा एकमेकांवरचा विश्वास व प्रेम कायम असते. पण हीच गोष्ट पुढे सरकताना दोघांचेही एकमेकांबद्दलचे गैरसमज होत होत जातात! चित्रपटाचा शेवट मात्र गोड! तमिळ भाषेतील चित्रपटात अखेरीस त्यांचे लग्न होते! दोन्ही चित्रपटात नासर, रंभा वगैरे कलाकार कॉमन. तर हिंदीत अनुपम खेर, जॉनी लिव्हर, राजू श्रेष्ठ असे बरेच काही! मेहबूब यांच्या गीतांना 'ए. आर. रहमान' यांचे संगीत!. त्या काळातील असे आणखीन काही तमिळ, तेलगू चित्रपट हिंदीत डब होऊन येताना मूळ चालीतील संगीतावर गाणी

आली. 'रोजा', 'अंजली', 'बॉम्बे', 'अप्पू राजा', 'हिंदुस्थानी' असे अनेक मूळ तमिळ चित्रपट हिंदीत डब होऊन येताना त्यांची गाणीही आली! त्यातील बरीच गाणी लोकप्रियदेखील झाली. 'दिल ही दिल में'ची रोमॅन्टीक गाणी पाह्यला चांगली









आहेत. पण आठवणीत राहणारी नाहीत! त्या काळात मुंबईतील चित्रपटसृष्टीत वावरत असतानाच अनेक कलाकार (विशेषत: अभिनेत्री!) दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटात काम करत! तिकडची कामाची शिस्त व पैसा या गोष्टींचे नेहमीच कौतुक असते. 'सोनाली बेन्द्रे' नेही तमिळ भाषेतील चित्रपटात भूमिका साकारत आपले अनुभव विश्व समृद्ध केले! आणि असे चित्रपट हिंदीत डब होऊन येत असल्याने तर हिंदी चित्रपटांच्या रसिकांसमोर राहता येते. दक्षिणेकडील काही प्रादेशिक भाषेतील चित्रपटांचे मुंबई वा महाराष्ट्रात चित्रीकरण होत असते. म्हणजेच वातावरण ओळखीचे! 'दिल ही दिल में' चित्रपटातील 'इंटरनेट प्रेमाची' गोष्ट हे मात्र त्या काळात बरेच वेगळेपण ठरले! असे काही नवीन

पाह्यला मिळाले तर बरे वाटते! आज 'डिजिटल युगा' नुसार प्रेमपट पाह्यला नक्कीच आवडतील! पण त्यात 'हम प्यार मे जलनेवालों को..' ('जेलर'!) सारखी ओढ नसेल नि 'आप की नजरों ने..' ('अनपढ') सारखी 'उत्कटता' नसेल याचे मात्र दु:ख आहेच! एवढे आपण 'टेक्नोसॅव्ही' झालो आहोत! अरेरे! रुपेरी पडद्यावरील राज कपूर, देव आनंद, दिलीपकुमार, राजेश खन्ना यांनी प्रेयसीवर भरभरुन केलेले प्रेम पाहतांनाच आपणही कोणाच्या तरी प्रेमात पडावे असे हमखास वाटे! आणि नायिकाही त्याच प्रेमाच्या बरसातमध्ये सुखावत, तसे आपल्यावर कोणीतरी प्रेम करावे असे युवतींना वाटे, ते खरे चित्रपटाचे दिवस!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

## लेख क्र. ३१

**'पांडू हवालदार' @५० वर्षे**
**आजही तेच भन्नाट मनोरंजन..!**




"पांडू हवालदार" दादा कोंडके यांच्यासाठी महत्वाचा! ते त्यांचे पहिलेच दिग्दर्शन. "सोंगाड्या" हा त्यांनी निर्माण केलेला पहिलाच चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत माईलस्टोन ठरला! या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांचे होते. "एकटा जीव

सदाशिव"चेही दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांचेच. दादांनी "आंधळा मारतो डोळा" या चित्रपटाच्या दिग्दर्शनातील जबाबदारी दिनेश (त्यांचे खरे नाव 'प्रभाकर पेंढारकर') यांच्यावर सोपवली.

दादांनी आपल्या तीनही चित्रपटांच्या यशाने 'हॅटट्रिक' साध्य केली. त्यांचा स्वतःचा असा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. पहिल्या तीन चित्रपटांच्या निर्मितीच्या अनुभवातून दादांनी आता पुढचे पाऊल टाकले ते चित्रपट दिग्दर्शनात!

मुंबईतील त्या काळातील हवालदार याभोवतीचे कथानक असलेला गमतीदार चित्रपट "पांडू हवालदार". मुंबईत प्रदर्शित २ मे १९७५! मुख्य चित्रपटगृह 'कोहिनूर'. पुणे शहरात तत्पूर्वी म्हणजे गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अलका चित्रपटगृहात "पांडू हवालदार" प्रदर्शित झाला. या

दिवशी गुरुवार होता. आणि फर्स्ट शोपासूनच चित्रपट हाऊसफुल्ल गर्दीत! दादा कोंडके व उषा चव्हाण ही लोकप्रिय जोडी चित्रपटभर फॉर्मात. अशोक सराफही एकदम भारी!

या चित्रपटात अपप्रवृत्तींचे दर्शन घडवणाऱ्या व्यक्तीरेखेची भूमिका कोणाला द्यायची याचा सुरु झालेला शोध अशोक सराफशी पूर्ण झाला! अशोक सराफनी कॉलेजमध्ये असताना आंतर कॉलेज नाट्य स्पर्धा गाजवल्या. याच काळात म्हणजे वयाच्या १७\१८ व्या वर्षी व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल टाकले. पहिलचं नाटक 'ययाती आणि देवयानी'. अशातच १९६८ साली तो स्टेट बॅंकेत नोकरीला लागला. तेथे नट आणि नाटककार रमेश पवार यांची भेट झाली. दोघांनी मिळून 'एकटा' ही एकांकिका सादर केली. अशी

वाटचाल सुरु असतानाच १९७१ साली निर्माता आणि दिग्दर्शक गजानन जहागीरदार यांच्या 'दोन्ही घरचा पाहुणा' या चित्रपटात सॅनेटरी इन्स्पेक्टरची भूमिका मिळाली. ही छोटीशीच भूमिका होती आणि याचा करियरसाठी फारसा फायदा झाला नाही. १९७२ साली 'हिमालयाची सावली' या नाटकाने अशोक सराफ अभिनयाच्या क्षेत्रात स्थिरावत गेला, पण त्यांच्या करियरने मोठा 'टेक-ऑफ' घेतला तो दादा कोंडके यांच्या 'पांडू हवालदार' या चित्रपटातील सखाराम हवालदार या भूमिकेतून! हा चित्रपट सुपर हिट तर ठरलाच पण तेराव्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट विशेष अभिनेत्याचा पुरस्कारही अशोक सराफ यांनी पटकावला! हा चित्रपट अशोक सराफला मिळाला तो नंदकिशोर कलगुटकर

यांच्यामुळे. दादांनी 'सखाराम हवालदार' या भूमिकेसाठी निळू फुले यांना विचारले होते. त्यांनी नकार दिल्यावर दादांनी कलगुटकर यांना या भूमिकेसाठी कलाकाराचा शोध घ्या असे सांगितले. कलगुटकर यांचे बंधु हीराकांत कलगुटकर यांच्या "एकापेक्षा एक सवाई" या नाटकात अशोक सराफची भूमिका होती.

दादांच्या पहिल्या दोन्ही चित्रपटातील गाणी लोकप्रिय तर झालीच पण ती विशिष्ट शैलीतील म्हणूनही ओळखली गेली तरीदेखील त्यानंतर दादा कोंडके आणि संगीतकार राम कदम हे का बरे एकत्र आले नाहीत याचे विलक्षण कुतूहल आजही पन्नास वर्षांनंतर कायम आहे! 'सोंगाड्या'मधील 'माळ्याच्या मळ्यामदी कोण ग उभी..', 'काय ग सखू बोला दाजिबा..', 'असा मी

काय गुन्हा केला..', 'बिब घ्या बिब शिकेकाई..', तर 'एकटा जीव सदाशिव'मधील 'नग चालूस दुडक्या चाली..', 'लबाड लांडगा ढ्वांग करते..', 'काल रातीला सपान पडलं..' हीदेखील गाणी आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात लोकप्रिय आहेत, तरीदेखील दादा कोंडके व राम कदम ही जोडी का पुन्हा एकत्र आली नाहीत? याचं एक कारण असे की, चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित "पिंजरा" मधीलही सगळीच्या सगळी गाणी अशीच अफाट लोकप्रिय झाली आणि याच चित्रपटाची हिंदीत रिमेक करण्याचे ठरले. त्यामुळेच त्या हिंदीतील 'पिंजरा' (हिंदीत "पिंजडा") च्या ध्वनिमुद्रणासाठी अधिक वेळ देता यावा आणि हिंदीतील पिंजरा प्रदर्शित झाल्यावर आपल्याला हिंदी चित्रपट सृष्टीतील अनेक मान्यवर चित्रपट निर्मिती

संस्थांच्या ऑफर येतील या अपेक्षेने राम कदम यांनी त्यावर लक्ष केंद्रित केले! पण हिंदीतील पिंजरा अपयशी ठरला आणि तोपर्यंत दादा कोंडके थांबू शकत नव्हते, त्यामुळे "आंधळा मारतो डोळा" या चित्रपटासाठी संगीतकार प्रभाकर जोग यांना त्यांनी संधी दिली. आणि दादा कोंडके व संगीतकार राम कदम ही जमलेली जोडी फुटली! 'पांडू हवालदार' चित्रपटासाठी दादा कोंडके यांनी राम लक्ष्मण यांना संगीतकार म्हणून पहिली संधी दिली. 'राम लक्ष्मण' म्हणजे सुरेंद्र हेन्द्रे आणि विजय पाटील ही जोडी! हे एका वाद्यवृंदात वादक होते. 'राम लक्ष्मण' हे नामकरण दादा कोंडके यांनीच केले. 'पांडू हवालदार' या चित्रपटातील 'बाई ग केळेवाली..' इत्यादी गाणी लोकप्रिय झाली.

"पांडू हवालदार" या यशस्वी चित्रपटाची 'रिमेक'ही येणे स्वाभाविक होतेच. त्यासाठी मेहमूदने दादाना हा चित्रपट हिंदीत रिमेक करण्याची ऑफर दिली. या चित्रपटाचे नाव 'जनता हवालदार' (१९७९) असेही त्याने निश्चित केले.




स्वतः मेहमूद आणि जोडीला राजेश खन्ना आणि हेमा मालिनी यांच्या प्रमुख भूमिका! पण "कशावरुन तरी" हे जमले नाही आणि मेहमूदने पटकथेत बरेच फेरफार करून हा चित्रपट कसाबसा पूर्ण केला. पण विस्कळीत पटकथेमुळे हा चित्रपट रंगला नाही आणि अर्थातच फ्लॉप

झाला. 'पांडू हवालदार ' या चित्रपटावरुन हिंदीत 'दो हवालदार' (१९७९) या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली. असरानी आणि जगदीप अशी त्यात जोडी होती. केदार कपूर दिग्दर्शित या चित्रपटात झरिना वहाब, फरिदा जलाल, जयश्री टी. यांच्याही भूमिका आहेत. विशेष म्हणजे दादा कोंडके यांची हुकमी आये अर्थात आई असलेल्या रत्नमाला याच या चित्रपटात 'माँ'च्या भूमिकेत आहेत. आणखीन एक विशेष म्हणजे हा चित्रपट रंगतदार करण्यासाठी या चित्रपटात राजेन्द्रनाथ, मोहन चोटी, धुमाळ, ब्रह्मचारी , मारुती आणि के. एन. सिंग हे एक दोन दृश्यांसाठी पाहुणे कलाकार आहेत. या चित्रपटाच्या निर्मात्याने मराठी वस्ती वगळता इतरत्र हा चित्रपट व्यवस्थित रिलीज केला आणि उत्तम यश संपादले. मूळ चित्रपटातील गंमत

तितकीशी आली नव्हती. पण थीममध्ये मनोरंजन होते, त्यामुळे 'दो हवालदार' रंजक ठरला. या चित्रपटाच्या निमित्ताने जगदीपने दादा कोंडके यांची आवर्जून भेट घेऊन आशीर्वाद घेतले हे अगदी आवर्जून सांगायला हवे! तो फोटो त्या काळात खूप गाजला. तर 'पांडू हवालदार' वरुन खुद्द दादा कोंडके यांनी गुजराती भाषेत 'चंदू जमादार' (१९७९) या नावाने रिमेक केली! खुद्द दादा कोंडके आणि जोडीला लक्ष्मी छाया अशी जोडी जमली. मूळ चित्रपटातील पंचेसच्या जागा दादाना चांगल्याच माहित असल्याने हा गुजराती चित्रपटही धमाल मनोरंजक झाला! मेहुलकुमार यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. गुजरातमध्ये हा चित्रपट यशस्वी ठरला. गुजरातीप्रमाणेच दादा कोंडके यांनीच हिंदी चित्रपटाची रिमेक करायला

हवी होती असे त्या काळात अनेक चित्रपट रसिकांचे म्हणणे होते. तसे घडले असते तर दादा कोंडके यांचे हिंदी चित्रपटसृष्टीत खूप लवकर पाऊल पडले असते. पण ते त्यांनी १९८४ साली 'तेरे मेरे बीच मे'च्या वेळी टाकले. ते थोडे लवकर पडायला हवे होते असे आता जरी म्हणता येत असले तरी दादा कोंडके यांचा महाराष्ट्रात हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण झाला होता आणि त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला हमखास यश मिळत होतेच. आणि दादानीच पुन्हा 'दो हवालदार' केल्याने मूळ चित्रपटाशी सतत तुलना होत राहिली असती, त्याचे काय? ते जास्त त्रासदायक झाले असते...

पन्नास वर्षात कितीदाही "पांडू हवालदार" 'एन्जॉय' करावा तोच आनंद, तीच गंमत आणि तीच फुल्ल एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्ट एन्टरटेन्मेन्ट!

आणखीन एक विशेष, "पांडू हवालदार" च्या प्रदर्शनास पंधरा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त म्हणजेच १९९० साली दादा कोंडके व त्यांच्या चित्रपटांची वितरण व्यवस्था अतिशय सकारात्मक दृष्टिकोनातून यशस्वी करणारे विजय कोंडके यांनी दादर येथील ब्रॉडवे मिनी थिएटरमध्ये मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी "पांडू हवालदार" च्या खास खेळाचे आयोजन केले आणि तो खेळ संपल्यावर आम्ही लोणावळ्यात जावून पार्टी केली. ते दिवसच वेगळे होते म्हणा!

भारतमाता चित्रपटगृहात आतापर्यंत "पांडू हवालदार" कितीदा रिपीट रनला प्रदर्शित झाला आणि मागील व पुढील पिढीतील चित्रपट रसिकांनी तो पुन्हा पुन्हा 'एन्जॉय' केला याला

गणतीच नाही. पारंपरिक लोकप्रिय मसालेदार मनोरंजक चित्रपटांचे तेच तर वैशिष्ट्य!!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

**लेख क्र. ३२**

**'धर्मात्मा' @५० वर्षे!**
**" गॉडफादर" शी तुलना तर शक्यच नाही..!**




पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट!

एकाद्या विदेशी चित्रपटावर आधारित एकादा हिंदी चित्रपट येतोय म्हटल्यावर आम्हा त्या

काळातील चित्रपट रसिकांची संमिश्र भावना असायची! विदेशातील चित्रपट रसिकांना आवडलेल्या गोष्टी आपल्याला हिंदी चित्रपटात पाह्यला मिळतील असे एकिकडे वाटत असतानाच त्या गोष्टी आपल्याला रुचलीत, पटतील, आपल्याला आवडतील ना असे केवढे तरी प्रश्न! त्या काळातील 'सिंगल-स्क्रीन' थिएटर्समधील "स्टॉलच्या पब्लिक"ला इंग्लिश चित्रपट (मग तो युरोपीयन असो वा अमेरिकन!) खूपच लांबचा वा परका वाटे! (भाषा कुठे कळायची? शाळेत किंवा अगदी स्नातक असलेल्यांना सुद्धा ते जड जायचे, ही खरी 'फॅक्ट!') तो दक्षिण मुंबईतील हायफाय स्टाईलीश चित्रपटगृहात (इरॉस, स्टर्लिंग, रिगल अशा) प्रदर्शित होतो अथवा मुंबईतील 'श्री', 'रिव्होली' अशाच काही चित्रपटगृहात तो प्रदर्शित

होतो, तो पाह्यला सुटाबुटात जावे लागते, त्यापेक्षा आपला मसालेदार मनोरंजक चित्रपट बरा! टाळ्या नि शिट्ट्यांनी एन्जॉय करता येतो अशी सवय, संस्कृती व आवड होती. त्यांनीच आपल्या देशात चित्रपट रुजवला.

अशातच बहुचर्चित "द गॉडफादर" (१९७२) या चित्रपटावरुन फिरोज खान "धर्मात्मा" अभिनीत, निर्मित व दिग्दर्शित करतोय ही बातमी भारी वाटली! आज डिजिटल युगात एका क्लिक सरशी जगभरातील कोणत्याही विषयावरील



माहिती मिळतेय (त्या उपलब्ध माहितीच्या पलिकडेही खूपच मोठे जग आहे, गोष्टी आहेत!) पन्नास वर्षांपूर्वी मराठी प्रसार माध्यमातून विदेशी चित्रपटांना फारसे महत्व मिळत नसे! तात्पर्य, "द गॉडफादर" किती नि कसा भारी चित्रपट आहे याची तेव्हा पूर्वकल्पना नव्हती! माहित होता, फिरोज खान! हिंदी चित्रपट सृष्टीतील एक स्टायलिश, रुबाबदार, हिकमती कलाकार. अभिनेता म्हणून तो फार ग्रेट वगैरे कधीच ओळखला गेला नाही! नामांकित अभिनेत्री त्याच्यासोबत काम करताहेत म्हणून त्याला "लेडी -किलर" हिरो म्हणत हे जणू त्याचे यश! हळूहळू "द गॉडफादर" चे महत्व समजले! १९७२ सालचा हा बहुचर्चित चित्रपट! मारिओ पुझो यांच्या "द गॉडफादर" या कादंबरीवर आधारित चित्रपट!

दिग्दर्शक फ्रान्सीस फोर्ड कोप्पोला आणि प्रमुख भूमिकेत मार्लिन ब्रान्डो व अल पचिनो! अशा सॉलीड चित्रपटावर आधारित फिरोज खान पिक्चर बनवतोय याचं कौतुक होत! तो हॉलीवूड चित्रपटाचा बेहद्द चाहता. त्यातूनच त्याला हे सुचले असेल. (तुमच्यापैकी.. इंग्रजी चित्रपटांच्या रसिकां साठी एक दोन नव्हे तर तीन तीन प्ले लिस्टस् देतोय..! यात या काळातील सुमारे पंधराशेहून जास्त सिनेमे आहेत! हा तर खजिनाच! दिपून जा! रमून जा! अरे हाय नी नाय काय! एन्जॉय!!)

सुरुवातीस राजेश खन्नाला त्याने नायकाची भूमिका ऑफर केली आणि तो स्वत: डॅनीने साकारलेली भूमिका करणार होता! राजेश खन्ना 'सुपर-स्टार' क्रेझमध्ये उगाच अधिकाधिक चित्रपटात काम करत होता! त्याचे दुष्परिणाम

झालेच! आणि त्यातच काही चित्रपट त्याने नाकारले ("धर्मात्मा" प्रमाणेच मोहनकुमार दिग्दर्शित "अमीर गरीब" ही त्याने नाकारला व देव आनंदने केला!) "धर्मात्मा" चित्रपटात राजेश खन्ना खरच शोभला असता का? याचा विचार आता कशाला? "धर्मात्मा" निर्मितीत रंजक गोष्टी अनेक! अफगाणिस्तानात "काबूल" वगैरे ठिकाणी "धर्मात्मा" चे चित्रीकरण होणार असून तसे होणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट! या गोष्टीने तर भारीच वाटले! तोपर्यंत हिंदी चित्रपटाच्या प्रेक्षकांना प्रामुख्याने हिंदी चित्रपटात युरोप, अमेरिका पाह्यला मिळत होती. सिनेमाच्या एका तिकीटात विदेशवारी याचच अप्रूप होते. युरोप वगैरेच्या वाटेला न जाता चक्क 'अफगाणिस्तान' ही कमालच म्हणायची. प्रचंड वाळवंट आणि

दूरदूरवर वस्ती. प्रचंड उन्हातान्हातील जगणं..! काबूल विमानतळावर फिरोज खान, हेमा मालिनी, डॅनी, रणजित वगैरे कलाकार उतरले तेव्हा त्यांचे अतिशय भव्य स्वागत झाले! विशेष उल्लेखनीय गोष्ट स्थानिक दूरचित्रवाणीवरही हे दाखवले गेले. फिरोज खान व त्याचा भाऊ संजय खान यांचे आखाती देशातील संबंध ही कायमच चर्चेची गोष्ट! आणि त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटात त्याचे अनेकदा दर्शन!

हेमा मालिनीने "धर्मात्मा" हा चित्रपट स्वीकारल्यावर काहींनी तिला "हा निर्णय चुकीचा आहे" असे म्हटल्याचे कालांतराने एका मुलाखतीत तिने सांगितले! एफ. के. प्रॉडक्शन्सचे युनिट विश्वासार्ह नाही! असे काही सांगितले होते. त्याकडे दुर्लक्ष करीत हेमा मालिनीने या चित्रपटात काम

केले. अतिशय उत्साहात केल्याचे पडद्यावर दिसतेय! मात्र तिने फिरोज खानला त्या चुंबन दृश्यात आवश्यक त्या मर्यादांची जाणीव दिल्याचा किस्साही गाजला!

तर, यात हेमा मालिनीसोबत काही दृश्यात काम करण्याची संधी आहे, म्हणून "धर्मात्मा" साईन करीत अफगाणिस्तानला चल, "शोले"त संजीवकुमार, धर्मेंद्र, अमिताभ बच्चन असे तीन नायक असल्याने तुला किती संधी मिळणार? असे फिरोज खानने वारंवार सांगितलेले डॅनी डेन्झोपाला पटले आणि त्याने चक्क गब्बरसिंगची भूमिका नाकारली! (पडद्यामागची ही गोष्ट रणजीतने मला एका मुलाखतीत सांगितली!) "शोले" च्या पहिल्या  सिटींगला डॅनी असल्याचा फोटो आज सोशल मिडियात पाह्यला मिळतोय.

प्रेमनाथने साकारलेल्या भूमिकेसाठी फिरोज खानने एका फिल्मी पार्टीत शम्मी कपूरला विचारले असता तो खवळला, त्याला हे अनपेक्षित होते. पार्टीतच दोघांचे सुरु झालेले भांडण मिटवले गेले त्याची गॉसिप्स मॅगझिनना खबर लागलीच.

रेखासाठी हा मोठ्या सेटअपचा चित्रपट होता. (भूमिका छोटी आहे म्हणत, झीनत अमानने नकार दिल्यावर फिरोज खानने रेखाचा विचार केला.) तिच्या कारकिर्दीचा हा सुरुवातीचा टप्पा! शक्यतो नवीन चित्रपट नाकारु नये अशी परिस्थिती! चित्रपटाचे जग अशा अनेक लहान मोठ्या गोष्टींनी भरलयं. रेखाचंही तसं हो नाही चाललेय. पण फिरोज खान कलाकारांना उच्च दर्जाच्या सुविधा देण्यासाठी 'ख्यातनाम' हेही होकाराचं कारण असू शकते!

अफगाणिस्तानातील मोठ्या चित्रीकरण सत्रानंतर मुंबईतील स्टुडिओत सेट लावून इनडोअर शूटिंग पार पडत पडत "धर्मात्मा" पूर्ण होत आला. चित्रपटात फिरोज खान, हेमा मालिनी, रेखा (विशेष भूमिकेत), रणजीत, डॅनी डेन्झोपा आणि प्रेमनाथ यांच्या प्रमुख भूमिका! त्यासह नादिरा, फरिदा जलाल, हेलन, सुलोचनादीदी, जाहिरा, नाना पळशीकर, मदन पुरी, इम्तियाज खान, मोहन चोटी, दारासिंग, जगदीश राज, सत्येन कप्पू, सुधीर असे अनेक कलाकार! हबिब यानेही "शोले"तील कालिया नाकारुन "धर्मात्मा" स्वीकारला. (ती भूमिका विजू खोटेनी केली!) चित्रपट पूर्ण होत असतानाच चित्रपटाच्या गाण्याची 'ध्वनिमुद्रिका' प्रकाशित झाली. इंदिवर यांच्या गीतांना कल्याणजी आनंदजी यांचे संगीत

आणि चित्रपटातील चारही गाणी श्रोत्यांपर्यंत येताच लोकप्रिय! 'क्या खूब लगती हो..' (मुकेश व कंचन), 'मेरी गलियों से लोगों की..' (लता मंगेशकर व महेन्द्र कपूर), 'तुमने किसीसे कभी प्यार..' (मुकेश व कंचन), 'तेरे चेहरे मे वो जादू है..' (किशोरकुमार). सुपरहिट गाण्यांनी चित्रपट प्रदर्शनाची उत्सुकता विलक्षण वाढते!

....आणि अशातच "धर्मात्मा" मधील काही दृश्यांना सेन्सॉरने कैचीत पकडले! फिरोज खानने मुंबईत चित्रपट प्रदर्शित करण्याची अतिशय जोरदार तयारी केली होती (त्यानंतर टप्प्याटप्प्याने नवी दिल्ली, पूर्व पंजाब, पश्चिम बंगाल, राजस्थान, मध्य प्रदेश असा इतरत्र चित्रपट प्रदर्शित होणार असे नियोजन! त्या काळात असेच होई!) सेन्सॉरने त्यात जणू खो घातला. फिरोज खानने आपले प्रयत्न

सुरु केले. चित्रपटाला काही दृश्यांवर काटछाटसह <u>"फक्त प्रौढांसाठी"</u> प्रमाणपत्र मिळाले. (नंतर ऐंशीच्या दशकात तो गणेशोत्सवात 'गल्ली सिनेमा' म्हणून दाखवला हे अलाहिदा!) असे करत करत अखेर <u>९ मे १९७५</u> रोजी मुंबईत "धर्मात्मा" प्रदर्शित करायचे ठरले. मेन थिएटर 'लिबर्टी'. मुंबईत 'गीता', 'गणेश', 'धरती', 'बरखा', 'रुपम', 'न्यू टॉकीज', 'मिलन', 'चंदन' इत्यादी अनेक चित्रपटगृहात दाखल! अशा धमाकेदार "धर्मात्मा"ला चक्क पन्नास वर्षे पूर्ण झाली देखील! कधी सरला हो इतका काळ?!

<u>"अपराध"</u> (१९७२) च्याच दिग्दर्शनात फिरोज खान हा पाश्चात्य ढंगाचा स्टायलिश चित्रपट हेच आपले वैशिष्ट्य ठरवणार, हाच त्याचा "फोकस" असणार हे अगदी स्पष्ट होते! "धर्मात्मा"

मध्ये त्याने ते जास्त प्रमाणावर अधोरेखित केले! (त्यानंतरही 'कुर्बानी', 'जाँबाझ' वगैरेत आपला तोच ट्रॅक कायम ठेवला! कधी त्यात यश मिळाले, कधी डाव फसला. तरी तो हटला नाही.) स्वतः फिरोज खान 'काऊ-बॉय' रुपात. धिप्पाड शरीरयष्टी, पाश्चात्य स्टाईलचे कपडे, जगावेगळी टोपी अशी स्वतःची देखणी सजावट करुन पडद्यावर वावरणार ही फिरोज खानची खासियत!

चित्रपटात अफगाणिस्तानातील Buzkashi हा थरारक खेळ पाह्यला मिळतो. चित्रपटात अतिरंजितपणा बराच! पण तोच दाखवायचाय अशी जणू मांडणी. अफगाणिस्तान दर्शन भन्नाट नि भरपूर! हिंदीत आपण विदेशी चित्रपट पाहतोय की काय असा फिल! काही समीक्षकांनी मात्र यापेक्षा मूळ चित्रपट "गॉडफादर" बघा! हा चित्रपट

त्याच्या जराही आसपास जात नाही असे म्हटले. पण फिरोज खान अशा गोष्टींकडे कशाला पाहिल? स्वतःच्या चित्रपटावर कायमच खुश असणारा असा फिल्मवाला! (सर्व 'लिंक्स' नक्की पहा!)

चित्रपटाला चांगले यशही मिळाले. गाणीही लोकप्रिय! या गुणांवर काही वर्षांनी 'रिपीट-रन', मॅटीनी शोला धर्मात्मा हमखास गर्दी खेचू लागला!

"धर्मात्मा" चित्रपटाला आपली एक ओळख नक्कीच आहे. आणि तेच फिरोज खानचे मोठेच यश... "गॉडफादर" वर आधारित हिंदीत आणखीन काही चित्रपट आले, पहिला "धर्मात्मा" आला. त्याचे हिंदीकरण जास्त झाले म्हणून तो स्वीकारला गेला! अन्यथा दिग्दर्शनात पाऊल टाकताच शम्मी कपूरने "इर्मा ला डल्स" या विदेशी कलाकृतीवर आधारित "मनोरंजन" बनवला. तो

साफ कोसळला. आजही "धर्मात्मा" चित्रपट फोकसमध्ये आहे. तर मग आणखीन काय हवे?

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

**लेख क्र. ३३**

## 'खेल खेल में' @५० वर्षे!
## ऋषि कपूर/नीतू सिंगमध्ये 'खुल्लम खुल्ला प्यार'!




चित्रपटाच्या रहस्यरंजकतेत एकाद्या कलाकाराच्या प्रतिमेचा (अर्थात इमेज!) 'सही रे सही' उपयोग करुन घेता आल्यास प्रेक्षकांना 'क्लायमॅक्स'पर्यंत खिळवून ठेवण्यात यश मिळते

**आणि मग खरा खुनी कोण हे समजताच 'जोर का धक्का धीरेसे लगे!' असे होवून जाते.. यातही दिग्दर्शक दिसतो! (खरं सांगायचं तर.. 'मराठा मंदिर'वरील पॉस्टर्स पाहून तो एखादा (आम्हां वय वर्षे पंधरा या पिढीला) तो एक प्रेमकहाणी असलेला चित्रपट असेच वाटलेले..! 'इफ्तेखार' हे साठ व सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटातील अतिशय कर्तबगार असे 'पोलीस इन्स्पेक्टर' म्हणून ओळखले जाणारे! कधी त्यांना 'कमिशनर'पदावर बढतीही मिळाली! त्यांचं उलटसुलट प्रश्नांनी जाब विचारणे, रोखून बघणे, विशिष्ट शैलीत हातातील सिगारेट ओढणे हे सगळेच चित्रपट रसिकांना ज्ञात झालेले! त्याच शैलीत ते खुनांचा तपास सुरु करतात. अजय (ऋषि कपूर) व निशा (नीतू सिंग) हे प्रेमिक.. पोलीस इन्स्पेक्टर 'भूपेन्द्र सिंह'**

(इफ्तेखार) यांना सगळा घटनाक्रम सांगतात! अशातच एक उंच धिप्पाड व्यक्ती (देवकुमार!) त्यांचा पिच्छा सोडत नाही. त्याच्यापासून अजय व निशा दूर पळतात! पण... पण चित्रपटाच्या 'क्लायमॅक्स'ला समजते की ही उंच धिप्पाड व्यक्ती म्हणजे 'इन्स्पेक्टर सूद' आहे तर जी व्यक्ती आपण पोलीस इन्स्पेक्टर आहोत हे सांगत असते ते भूपेन्द्र सिंह खुनी असतात..!

दिग्दर्शक रवि टंडन "खेल खेल में" या चित्रपटात असा चकमा देण्यात यशस्वी ठरले आणि हा म्युझिकल रहस्यरंजक चित्रपट सुपर हिट ठरला! १६ मे १९७५ रोजी हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला. मेन थिएटर 'मराठा मंदिर'! १९७५ हे एकाच वेळेस अनेक जॉनरचे चित्रपट यशस्वी ठरल्याचे उल्लेखनीय वर्षे! यश चोप्रा दिग्दर्शित

"दीवार" असो, गुलजार दिग्दर्शित "आँधी" असो, फिरोज खान दिग्दर्शित "धर्मात्मा" असो, सतराम रोहरा दिग्दर्शित "जय संतोषी माँ" असो! (पुढच्या दोनच आठवड्यात "जय संतोषी माँ" चित्रपटाला पन्नास वर्षे पूर्ण देखील झाली की हो!) आणि या सगळ्यावर रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१५ ऑगस्ट २०२५ला प्रदर्शित होणार होता)चा दबदबा असो! राज कपूर दिग्दर्शित "बॉबी" (१९७३) च्या खणखणीत यशाने ऋषि कपूर स्टार झाला तरी दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटाची रिमेक असलेल्या पुत्तन्ना कनागल दिग्दर्शित "जहरिला इन्सान" (१९७४)च्या सुपर फ्लॉपने हिसाब बरोबरीचा झाला! आता ऋषि कपूरला सावरायला एका सुपर हिट चित्रपटाची गरज होती

(हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक अलिखित नियम हे असेच यशापयशाभोवती आहेत!)

"खेल खेल मे"ची ध्वनिमुद्रिका प्रकाशित होताच त्यातील 'युथफुल' गीत-संगीत ऐकता ऐकता एकदम लोकप्रिय झाले! गुलशन बावरा यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे तरुण संगीत होते. 'एक मै और एक तू..' (किशोरकुमार व आशा भोसले), 'खुल्लम खुल्ला प्यार करेंगे..' (किशोरकुमार व आशा भोसले), 'हमने तुमको देखा..' (शैलेंद्रसिंग), 'सपना मेरा टूट गया..' (आशा भोसले), 'आये लो प्यार के दिन..' (किशोरकुमार व आशा भोसले) अशी सर्वच गाणी लोकप्रिय! 'खुल्लम खुल्ला..' गाण्याचे चित्रीकरण काश्मीर मधील पहेलगाम इत्यादी ठिकाणचे! सस्पेन्स पिक्चर असो वा भूतपट असो त्यातील गीत संगीत

एकदम भारी असणारच! ही त्या काळातील खासियत! खऱ्या अर्थाने ते मनोरंजनाचे उत्तम पॅकेज होते. (आजच्या सिनेमावाल्यांना नेमका त्याचाच विसर पडलाय, ते जास्त भर जोरशोर करणाऱ्या पार्श्वसंगीतावर देतात! अनेकदा त्याचीच भीती वाटते.) 'खेल खेल मे' प्रदर्शित सज्ज होईपर्यंत गाण्यांची जबरा क्रेझ निर्माण झालेली! पिक्चर प्रदर्शित होण्यासाठीची ही सकारात्मक सपोर्ट सिस्टीम! आणि तेच घडले! फर्स्ट शोपासूनच पिक्चर हिट! लोकप्रिय संगीत व चकमा देणारा 'क्लायमॅक्स' यांनी चित्रपट सुपर हिट ठरला!

एका महाविद्यालयातील तरुण तरुणींचा एक ग्रुप अभ्यासाबरोबरच धमाल मौज मस्ती मनोरंजन धटिंगणपणा करत कॉलेज लाईफ मस्त एन्जॉय करत असतानाच एकेक खून होत जातो व

रहस्यमय वातावरण निर्माण होते! 'लुई थॉमस' लिखित "गुड चिल्ड्रन डोन्ट किल" या कादंबरीवर आधारित 'खेल खेल मे'ची पटकथा सचिन भौमिक यांची आहे! टर्न व ट्वीस्ट त्यात भरपूर! ('खिलाडी' (१९९२) सुद्धा यावर बेतलेला का?)

'खेल खेल मे' च्याच सेटवर ऋषि कपूर व नीतू सिंग वाढलेली मैत्री आणि त्यांचे प्रेमात झालेले रुपांतर यांचा प्रत्यय चित्रपटात पडद्यावर दिसतोय! विशेषत: रोमॅन्टीक गाण्यात क्या कहने! एकदम कलरफुल आणि मनमोकळी! ऋषि कपूर व राकेश रोशन यांनी एकत्र भूमिका केलेला हा पहिला चित्रपट! तेव्हापासून त्यांची जमलेली आणि त्यात जितेंद्रचा सहभाग ही एक हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुचर्चित 'फ्रेन्डशीप' ठरली! त्यावर स्वतंत्र फोकस टाकता येईल अशा अनेक

झक्कास गोष्टी आहेत! (ही त्यांची खास मैत्री तुम्ही 'हम तो, आप के दीवाने है..' (आप के दीवाने) या त्यांच्या गाण्यातून तर नक्कीच अनुभवा!

'खेल खेल मे' चित्रपटात अरुणा इराणी, जानकीदास, युनुस परवेझ, प्रीती गांगुली, सत्येन कप्पू, ललिता पवार, हरी शिवदासानी, कमल कपूर, चांद उस्मानी इत्यादींच्याही भूमिका. चित्रपटाचे संवादलेखन कादर खानचे आहे! त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील हा चित्रपट. आणि या संवादलेखनाचे त्याला एकवीस हजार रुपये मानधन मिळाले! पन्नास वर्षांपूर्वी ही खूपच मोठी रक्कम होती! गंमत म्हणजे चित्रपटात मिथुन चक्रवर्ती ज्युनियर आर्टिस्ट म्हणून जेमतेम दिसतो! तसा तो आणखीन काही चित्रपटात

जेमतेम दिसला आणि त्यातूनही.. नंतर त्याने मोठी झेप घेतली. सलाम मिथुनदा!

दिग्दर्शक रवि टंडन हे रविना टंडनचे पिता! आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात त्यांनी केवढी तरी विविधता दाखवली. त्यात रहस्यरंजकता ही एक यशस्वी ठरलेली 'पॉवरफुल' गोष्ट! त्यांच्या दिग्दर्शनातील 'अनहोनी' (१९७३), 'मजबूर' (१९७४), 'जवाब' (१९८५) यात ते पाह्यला मिळते! रवि टंडनने 'खेल खेल मे'ची टीम घेऊन "झूठा कही का" (७९) बनवला. त्याचीही गाणी लोकप्रिय!




'खेल खेल मे' चाच मसाला वापरुन दिग्दर्शक अब्बास मुस्तानने "खिलाडी" (१९९२) बनवला आणि अक्षयकुमार स्टार झाला, त्याला "खिलाडी हीरो" अशी उपाधी मिळाली!




'खेल खेल मे'च्या यशाची गोष्ट इतक्यावरच थांबत नाही. ऋषि कपूरने आपल्या आत्मचरित्राला नाव दिले, 'खुल्लम खुल्ला'! एक सुपरड्युपर हिट चित्रपट बरेच काही घडवत असतो ते असे, एकदम खुल्लम खुल्ला!!!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र. ३४

**"जान हाजिर है" @५० वर्षे...**
**'नवकेतन फिल्म'ची पंचवीशी यशाने साजरी!**




'नवकेतन फिल्म' एवढं जरी म्हटलं तरी चित्रपट रसिकांच्या (की व्यसनींच्या) किमान दोन पिढ्यांच्या डोळ्यासमोर 'नौ दो ग्यारह', 'तेरे घर के सामने', 'गाईड', 'ज्वेल थीफ', 'तेरे मेरे सपने' असे अनेक क्लासिक चित्रपट आले असतीलच! विषयांची विविधता, श्रवणीय गीत संगीत, प्रभावी दिग्दर्शन मांडणी ही या चित्रपटांची ताकद! आज 'नवकेतन' फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेच्या

स्थापनेचे पंचाहत्तरावे वर्षे सुरु आहे!

या संस्थेच्या स्थापनेस पंचवीस वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त.. मनोहर नाथ दिग्दर्शित "जान हाजिर है" या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली! (मुंबईत २३ मे १९७५ रोजी प्रदर्शित झाला!) त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली देखील. मुंबईत मेन थिएटर 'जमुना' मध्ये सकाळी साडेअकराचा खेळ म्हणजे 'मॅटीनी शो'ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने चक्क साठ आठवड्यांचा मुक्काम केला! हिरक महोत्सवी आठवड्यापर्यंत मजल! याच 'नवकेतन फिल्म' निर्मिती संस्थेची स्थापना म्हणजे एकाद्या चित्रपटाच्या पटकथेतील हा प्रसंग जणू.

"नीचा नगर" (१९४६) व्यावसायिकदृष्ट्या अपयशी ठरल्याने दिग्दर्शक चेतन आनंद निराश होणे स्वाभाविकच! तो काळ आपल्या चित्रपटाला

रसिकांनी नाकारताच त्यातील कलाकार, निर्माता व दिग्दर्शक विलक्षण उदास होण्याचा होता. कारण चित्रपटात भावनिक गुंतवणूक असे! दुसरीकडे स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद होताच. नवीन उमेद, उत्साह होता. स्वप्ने होती. अशातच देव आनंदची अभिनेता म्हणून प्रभात फिल्मच्या "हम एक है" पासून सुरुवात झाली होती! त्याला आणखीन काही चित्रपट मिळत होते. आणि अशातच त्याने विजय आनंद व बहिणींनाही गुरदासपुरवरुन मुंबईत बोलावून घेतले!

चेतन आनंदला पुन्हा उभारी देण्यासाठी काय करता येईल या विचारात असतानाच देव आनंदने "आपली चित्रपट निर्मिती संस्था" निर्माण करायचे ठरवले. काही "नव" (नया) करायचे त्याच्या मनात आले आणि तेव्हाच चेतन आनंदची

**पत्नी उमा हिने मुलाला जन्म दिला. त्याचे नाव "केतन "!**

**...आणि मग "नवकेतन फिल्म" या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना झाली. ती वैशिष्ट्यपूर्ण ठरली. 'कंदिल दिवा' हे नवकेतनचे बोधचिन्ह! याचं कारण, पंजाबमधील गुरदासपुरच्या गावातील घरी बालपणात असलेला रस्ता आणि तेथे अंधुक प्रकाश देत असलेले दिवे! त्यातून जाताना हाती कंदिल ठरलेला! नवकेतनचे कार्यालय महालक्ष्मीच्या फेमस स्टुडिओत १४७ नंबरचे! आणि पहिला चित्रपट चेतन आनंद दिग्दर्शित "अफसर"! देव आनंद व सुरय्या यांच्या भूमिका. तोही रसिकांनी नाकारला अशी अपयशी सुरुवात होवूनदेखील "नवकेतन फिल्म" ची वाटचाल यशस्वी आहे.**

तो काळ चित्रपट निर्मिती संस्थांचा होता. 'प्रभात फिल्म कंपनी'तून वेगळे होत चित्रपती व्ही.शांताराम यांनी 'राजकमल कला मंदिर' स्थापन केले. हिमांशू रॉय व देविका राणी यांचे बॉम्बे टॉकीज, मेहबूब खान यांचे 'मेहबूब प्रॉडक्शन्स', के. असिफ यांची 'के. असिफ फिल्म', राज कपूरची 'आर. के. फिल्म', गुरुदत्त यांची 'गुरुदत्त फिल्म', बी. आर. चोप्रा यांची 'बी.आर. फिल्म', सोहराब मोदी यांचे 'मिनर्व्हा मुव्हीटोन', बिमल रॉय यांचे 'बिमल रॉय प्रॉडक्शन्स', ए. आर. कारदार यांची 'कारदार फिल्मस्' अशी अनेक चित्रपट निर्मिती संस्थेंची नावे घ्यायलाच हवीत! यातील काहींनी आपले मुंबईत भव्य दिमाखदार स्टुडिओही उभारले. 'नवकेतन फिल्म'ला आपले अस्तित्व निर्माण करुन ते टिकवण्यात मोठीच

स्पर्धा होती, नवकेतनचा गुरुदत्त दिग्दर्शित 'बाजी' यशस्वी ठरला व सकारात्मक वाटचाल सुरु झाली.



'हमसफर', 'टॅक्सी ड्रायव्हर', 'आँधिया', 'मकान नंबर ४४', 'फंटूश' यानंतर विजय आनंदने 'नौ दो ग्यारह'पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि 'नवकेतन फिल्म'चा स्वतःचा प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. चित्रपटाच्या जगात यश म्हणजे बरेच काही असतेच असते हा अलिखित नियम फळणे आवश्यक असते. 'नवकेतन फिल्म'ने आता चित्रपट निर्मितीत सातत्य ठेवले!

राज खोसला दिग्दर्शित 'काला पानी', विजय आनंद दिग्दर्शित 'कालाबाजार', 'तेरे घर के सामने', अमरजीत दिग्दर्शित 'हम दोनो' असे करत करत आर. के. नारायण यांच्या 'गाईड' कादंबरीवर आधारीत त्याच नावाचा चित्रपट आला. चेतन आनंदकडे असलेले दिग्दर्शन विजय आनंदकडे आले आणि एकाच वेळेस हिंदी व इंग्लिशमध्ये पडद्यावर आलेल्या या चित्रपटाने नवकेतन फिल्म, विजय आनंद, देव आनंद, वहिदा रहमान आणि मुंबईतील या चित्रपटाचे मुख्य चित्रपटगृह 'मराठा मंदिर' या सगळ्यांनाचा प्रतिष्ठा प्राप्त झाली! एक दर्जेदार कलाकृती बरेच काही देत असते. म्हणूनच दर्जा महत्वाचा! काळाच्या खूपच पुढे असे या चित्रपटाचे धाडसी कथानक हे उल्लेखनीय. 'नवकेतन' अतिशय उंचीवर होते!

दरम्यान चेतन आनंदनेही आपली 'हिमालय फिल्म' अशी चित्रपट निर्मिती संस्था स्थापन करुन आपली स्वतंत्र वाटचाल सुरु केली होतीच! अशातच देव आनंदही दिग्दर्शनाचा विचार करत होता. आपल्या पहिल्या चित्रपटाचे "अहिंसा" हे नावही त्याने चित्रपट निर्मिती संस्थेत नोंदवले (देव आनंदच्या व्यक्तीमत्वाला ते शोभले असते का हो?) नंतर ते बदलून "प्रेम पुजारी" केले. पडद्यावर प्रणय करताना पहावे तर ते देव आनंदला! त्यामुळे हे नाव उत्तम! दक्षिण मध्य मुंबईतील 'शालिमार' या नवीन चित्रपटगृहाचे 'प्रेम पुजारी'ने (१९७०) उदघाटन, तेथेच 'प्रीमियर' आणि हे सर्व 'बाळासाहेब ठाकरे' यांच्या शुभ हस्ते! देव आनंदचा उत्साह दुप्पट झाला नसता तरच नवल होते! पण नवकेतन फिल्मचे काय? जणू एक नवीन वा वेगळाच प्रवास

सुरु झाला. (पटकथाच भरकटली?) विजय आनंदने 'नासिर हुसेन' यांच्या बॅनरचा 'तिसरी मंझिल' स्वीकारताना 'नवकेतन'बाहेर एक प्रकारे पाऊल टाकले होतेच. त्यात देव आनंदच्या जागी शम्मी कपूर आला तेच योग्य हे देव आनंदभक्तही मान्य करतील. चित्रपट वितरक गुलशन रॉय यांनी 'त्रिमूर्ती फिल्म' अशी चित्रपट निर्मिती संस्था स्थापन करताच विजय आनंदने त्यासाठी 'जॉनी मेरा नाम' दिग्दर्शित केला. नवकेतनचा 'तेरे मेरे सपने' मात्र फसला. देव आनंदने 'हरे राम हरे कृष्ण'मध्ये दिग्दर्शन चमक दाखवली! विजय आनंदचा 'मॅकानॉज गोल्ड'वर आधारित 'छुपा रुस्तम' अगदीच भुसभुशीत असणे हा त्याच्या चाहत्यांना धक्काच! 'गाईड', 'जॉनी मेरा नाम', 'तेरे मेरे सपने'नंतर 'छुपा रुस्तम'साठीही मेन

थिएटर 'मराठा मंदिर' हा योग साधला खरा! (त्या काळात चित्रपट निर्मिती संस्था अथवा दिग्दर्शक व मेन थिएटर हेही एक खास समीकरण!) .

आता देव आनंद नवकेतनसाठी तर विजय आनंद अन्य निर्मात्यांसाठी चित्रपट दिग्दर्शित करु लागले आणि आता नवकेतन फिल्मचे जुने चित्रपट पहावेत ते रिपीट रन, मॅटीनी शो आणि गल्ली चित्रपटात असे झाले! त्यांना सतत 'हाऊसफुल्ल' गर्दी. त्या प्रत्येकातील गीत संगीत आजही लोकप्रिय. अनेक गाण्यात विजय आनंद टच!

अशाच या कौतुकास्पद वाटचालीत नवकेतन फिल्मला 'पंचवीस वर्षे' झाल्यानिमित्त १९७५ साली विजय आनंदने मनोहर नाथ रंगू दिग्दर्शित 'जान हाजीर है' या चित्रपटाची निर्मिती करताना देवबंधुंचा भाचा 'शेखर कपूर',

**प्रेमनाथचा मुलगा 'प्रेम किशन' आणि 'नताशा' या नवीन चेहऱ्यांना संधी दिली! जिनियस संगीत संयोजक व संगीतकार जयकुमार (जय) पार्टे यांच्या संगीतातील गाणी लोकप्रिय झाली! 'यू ट्यूब'वर "जान हाजिर है" आहे! त्याचे विशेष म्हणजे, चित्रपट सुरु होताच 'केतनव फिल्म' (नवकेतन फिल्म) असे वाचायला मिळते! या चित्रपटासाठी आपल्याच चित्रपट निर्मिती संस्थेच्या नावात बदल करण्यात आला. (खरं तर खार पाली हिलवर 'केतनव डबिंग थिएटर' होते! विजय आनंदचे कार्यालयही तेथेच होते आणि ऐंशीच्या दशकात तेथेच विजय आनंदच्या अविस्मरणीय अशा मुलाखतीचा योग मला आला.) 'जान हाजिर है'चा निर्माता म्हणून 'गोल्डी' असे म्हटलयं आणि कंसात 'विजय आनंद' म्हटलयं!**

चित्रपटाची कथा स्वरुपकुमारची आहे. तो 'छुपा रुस्तम', 'ब्लॅक मेल' वगैरे चित्रपटासाठी विजय आनंदचा सहाय्यक दिग्दर्शक होता! 'जान हाजिर है'ची पटकथा विजय आनंदची आहे. छायाचित्रण चमन के. जाजू यांचे आहे!

चित्रपटात तीन नवीन कलाकारांसोबत उर्मिला भट्ट, इफ्तेखार, मुराद, त्रिलोक कपूर, मोहन शेरी, रंजन, जानकीदास, कोमिला विर्क यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चित्रपटातील तरुण गीत संगीत बहारदार! 'ओ मेरी छम्मक छल्लो..' (अमितकुमार व उषा तिमोथी), 'सावन आया बादल आये..' (दिलराज कौर), 'भांडे फूट जाएंगे..' (अमितकुमार व मनहर), 'हम ना रहेंगे तुम ना रहोगे..' (अमितकुमार, मनहर व दिलराज कौर), 'यह शहरी मोर देखो..' (दिलराज कौर व

**अमितकुमार) ही सर्व गाणी लोकप्रिय झाली! 'सावन आया..' या गाण्यामुळे दिलराज कौर पार्श्वगायिका म्हणून नावारुपास आली! संगीतकार जय पार्टे यांनी काही मोजक्याच चित्रपटांना संगीत दिले. चित्रपट संगीत शौकीनांना जय पार्टे चांगल्या प्रकारे माहित आहेत! नवीन चेहऱ्यांना नवीन पार्श्वगायक हे या गीत संगीताचे वैशिष्ट्य! हे नियोजन नक्कीच गोल्डीचे असणार. त्या काळातील दिग्दर्शकांची चित्रपटातील गाण्या संदर्भातील कल्पकता कायमच कौतुकास्पद आणि म्हणूनच रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या ओलांडूनही जुन्या चित्रपटातील गाणी सर्वकालीन सुपरहिट!**

**...देव आनंदला थांबणे मंजूर नव्हते हा कौतुकाचा भाग. पण ते 'नवकेतन फिल्म'च्या**

पथ्यावर पडले का? 'जाना ना दिल से दूर' नावाच्या चित्रपटासाठी विजय आनंदच्या दिग्दर्शनात देव आनंद असा बऱ्याच वर्षांनी योग आला! उत्साहात मुहूर्त झाला. ('यू ट्यूब'वर तो आहे) चित्रपट पूर्णही झाला. 'केतनव डबिंग' थिएटरमधील 'ट्रायल' संपल्यानंतर बाहेर पडताच नेहमीप्रमाणेच देव आनंद आम्हा समिक्षकांचे चेहरे वाचत होता. पहिल्यांदाच तो काहीसा निराश वाटला!

नवकेतनची सुरुवात, 'तेरे मेरे सपने'पर्यंतचा चढता प्रवास आणि मग उतार हे सगळेच घडत असतानाच या 'बॅनरच्या' अनेक 'क्लासिक चित्रपटांचे' अस्तित्व, आकर्षण आणि महत्व कायम आहे हे महत्वाचे. "जान हाजिर है" हा त्यातील एक महत्वपूर्ण टप्पा!

१९७५ हे वर्षे चित्रपटसृष्टीसाठी बरेच काही घडवणारे. मे १९७५ मध्ये मुंबईत प्रदर्शित झालेल्या महत्वपूर्ण चित्रपटात 'पांडू हवालदार' व 'चोरी मेरा काम' (२ मे), 'धर्मात्मा', 'चंदनाची चोळी अंग अंग जाळी' (९ मे), 'खेल खेल मे' आणि 'तुफान और बिजली' (१६ मे), 'जान हाजिर है' (२३ मे) आणि 'जय संतोषी माँ', 'कैद', 'लफंगे' (३० मे) अशी ती वाटचाल आहे! त्यात 'जान हाजिर है' चे यशही उल्लेखनीय!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥



## लेख क्र. ३५

## राजा @ ३० वर्षे !
## सिनेमा पडद्यावर येताच माधुरी दीक्षितचा "रानी" म्हणून ओळखला गेला..!




तुम्हालाही कल्पना आहेच! "हिम्मतवाला" प्रदर्शित होईपर्यंत जितेंद्रच्या फिटनेस, नृत्य अदा, नवीन पिढीतील अभिनेत्रीचा नायक होण्यातील त्याची व्यावसायिकता याचं भारी कौतुक होत होते! पिक्चरचा 'फर्स्ट शो' पाहून बाहेर पडणारे पब्लिक म्हणाले, यह तो "हिम्मतवाली" की पिक्चर है!

**श्रीदेवीने आपलं सौंदर्य, बेभान नृत्य अदा, मोकळा ढाकळा स्क्रीन प्रेझेन्स यावर हा चित्रपट आपलासा करुन टाकला...!!**

**इंद्रकुमार दिग्दर्शित "राजा" च्या वेळीही हेच झाले! चित्रपटात संजय कपूर हा खरंतर "राजा" होता, मात्र पिक्चर सुरु असतानाच पब्लिकने माधुरी दीक्षितला या पिक्चरची "रानी" म्हणून मनसोक्त मनमुराद दाद दिली! "राजा" मुंबईत २ जून १९९५ रोजी प्रदर्शित झाला. तीस वर्षे पूर्ण झाली देखील!**

**"राजा" प्रदर्शित व्हायच्या वेळेस माधुरी दीक्षित 'सुपर-स्टार' झाली होती! मोहक चेहऱ्यावरील तिचं कायमस्वरुपी झक्कास हास्य, तिचं सौंदर्य, पडदा व्यापून टाकेल असा कॅमेऱ्यासमोरचा वावर! (कॅमेऱ्याचा अ‍ॅन्गल कसा**

आहे वगैरे तांत्रिक गोष्टीची तिला उत्तम जाणीव होती. "मै माधुरी दीक्षित बनना चाहती हू" असे स्वप्न वा इच्छा असणाऱ्यांनी माधुरीने चित्रपट माध्यम व व्यवसाय हे दोन्ही व्यवस्थित जाणून घेतले होते हे लक्षात घ्या! इच्छा आहे म्हणून माधुरी दीक्षित बनता येत नाही.), तिचं नृत्य चापल्य, तिची सर्वकालीन लोकप्रिय गाणी, तिची लोकप्रियता (माधुरीचा निस्सीम चाहता मग कोणाचाही चाहता होत नाही हे सर्वात मोठे विशेष!) या सगळ्यातून तिचं पारडं जड होते! बरं, इंद्रकुमार दिग्दर्शित "बेटा" (१९९२) मध्येही तीच अनिल कपूरपेक्षा भारी ठरली! ('धक धक करने लगा..') आणि त्या चित्रपटालाही "बेटी" म्हटले गेले. तिच्याभोवतीच तर गोष्ट होती! संजय कपूर हा अनिल कपूर व बोनी कपूरचा भाऊ या पुण्याईवर चित्रपटसृष्टीत आला!

त्याच पुण्याईवर त्याला मोठ्या वा आघाडीच्या अभिनेत्रींचा नायक बनण्याची संधी मिळाली. पण संधी म्हणजे हुकमी यश नव्हे! त्यात माधुरी दीक्षित नायिका असेल तर विचारुच नका. एन. चंद्रा दिग्दर्शित "तेजाब" (१९८८) मध्ये 'एक दो तीन चार..' गाण्यापासून तिने जो झपाटा लावला तो आजही कायम आहे! गुणवत्ता, मेहनत, आत्मविश्वास व फोकस्ड दृष्टिकोन! या गुणांवर माधुरी दीक्षित घडली! त्या काळात आम्हा मुंबईतील सिनेपत्रकारांना नवीन हिंदी चित्रपटांचे मुहूर्त व शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जायची सोनेरी/चंदेरी संधी मिळे. तेव्हा 'तेजाब', 'त्रिदेव', 'राजकुमार', 'प्रहार', 'याराना', 'फूल' या चित्रपटांच्या सेटवर माधुरी दीक्षित 'लाईव्ह' हा आम्ही अनुभव घेतलाय! त्यावर भरपूर लिहिलयं!

हैदराबाद येथील अन्नपूर्णा स्टुडिओत नृत्य दिग्दर्शिका 'सरोज खान' यांच्या नृत्य स्टेपनुसार माधुरी दिवसभर घाम गाळत होती हे पाहिलयं! त्या काळात आम्हा सिनेपत्रकारांचे असे दौरे होत असत. आणि बरीच वेगळी माहिती मिळत असे.

"राजा"त माधुरी दीक्षित 'छा' जाएगी हे सांगायला ज्योतिषाची गरजच नव्हती आणि ती 'छा गई' म्हणून चित्रपट सुपर हिट ठरायला वेळ लागलाच नाही! या चित्रपटात परेश रावलने साकारलेली भूमिका अगोदर नाना पाटेकर करणार होता. पण माधुरीनेच परेश रावलच्या नावाचा आग्रह धरला असे गॉसिप्स मॅगझिनमधून गाजले. माधुरीच्या शब्दाला वजन होते हेदेखील उल्लेखनीय!

माधुरीने नायकावर मात देणे हे अनेकदा

घडले. अयूब खान (मृत्यूदंड), राजन सिप्पी (आवारा बाप), आदित्य पांचोली (सैलाब) अशी आणखीन उदाहरणे आहेतच! अगदी गोविंदावरही "पाप का अंत", "इज्जतदार" यात तिने मात केली. गोविंदा व माधुरी जोडी शोभलीही नाही!

"राजा"तील गीत संगीत व नृत्यात माधुरी एके माधुरी असाच भन्नाट परफॉर्मन्स! संजय कपूर हरवल्यासारखा वाटला. 'अखियां मिलाऊ कही..' (उदीत नारायण व अलका याज्ञिक), 'किसी दिन बनूगी..' (उदीत नारायण व अलका याज्ञिक), 'फूल मांगू ना बहार मांगू..' (उदीत व अलका याज्ञिक) ही समीर लिखित गाण्याना नदीम श्रवणचे संगीत! 'नजरे मिली दिल धडका..' या गाण्याला पब्लिककडून टाळ्या नि भरपूर शिट्ट्या! 'सिंगल-स्क्रीन' थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहाची

ती खासियत! रॉक हडसनच्या "कम सप्टेंबर" (१९६१) चीच थेट चाल! माधुरी दीक्षितच्या रुपेरी पडद्यावरील 'टॉप टेन' नृत्यातील हे एक बरं!




इंद्रकुमार व अशोक ठाकरिया निर्मित "राजा"ची पटकथा राजीव कौल व प्रफुल्ल पारेख यांची होती! मारुती इंटरनॅशनल या बॅनरखालील हा चित्रपट "राजा" नावाने बनला! "रानी" म्हणून ओळखला जातो. ही सगळीच किमया फक्त आणि फक्त माधुरी दीक्षितची!!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

**लेख क्र : ३६**

## "एक गांव की कहानी" @५० वर्षे
## 'आपली माती, आपली माणसं!..'




"गावाकडच्या गोष्टी" असलेल्या चित्रपटांची आजही आपली यशस्वी घौडदौड सुरू आहे! गावातील हिरवेगार वातावरण, संथ आयुष्य, एकत्र कौटुंबिक जीवन, नातेसंबंध, माळरानावरचे प्रेमी युगुल, साधे लग्न सोहळे, समाजकारण, राजकारण, भुतपिशाच्च, अंधश्रध्दा, तलावातील मौज मस्ती अशा अनेक गोष्टींसह गीत संगीत व

नृत्य यांच्या सहभागातून अनेक चित्रपट रंगले. मराठीत लोकप्रिय ग्रामीण चित्रपट केवढे तरी! 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी'पासून 'पाटलीण'पर्यंत, 'पिंजरा'पासून 'सैराट'पर्यंत, 'शापित'पासून 'माहेरची साडी'पर्यंत केवढे तरी! आणि अनेक प्रकारचे! अगदी ग्रामीण भागातील राजकारणा पासून सोशिक नायिकेपर्यंत बरेच! हिंदीतही ग्रामीण भागातील गोष्टींचा भरपूर प्रभाव. 'नया दौर'पासून 'गंगा जमुना'पर्यंत, 'मदर इंडिया'पासून 'लगान'पर्यंत, 'नदिया के पार' पासून 'स्वदेश' पर्यंत व 'शोले' पासून 'विरासत' पर्यंत केवढे तरी चित्रपट गावात घडले! 'शोले' ही सूडकथा. 'रामगढ' या गावात घडलेली. ग्रामीण चित्रपट जास्त लोकप्रिय ठरल्याचेही दिसते!

असाच एक चित्रपट 'जेमिनी प्रॉडक्शन्स'

(चेन्नई!) निर्मित व एस. एस. बालन दिग्दर्शित "एक गाव की कहानी" हा चित्रपट! मुंबईत रिलीज १३ जून १९७५. मेन थिएटर 'नाझ'! चित्रपटाला पन्नास वर्षे केव्हाच पूर्ण झाली आहेत!

पन्नास वर्षापूर्वीच्या गावातील ही गोष्ट! चालीरिती, परंपरा, समज, गैरसमज, श्रध्दा, अंधश्रध्दा यांनी भरलेली! राकेश पांडेने साकारलेला ग्रामीण नायक 'मंगल' आणि नवतारका 'मंजुळा विजयकुमार'ने साकारलेली गावातील युवती 'बेला' ही प्रमुख जोडी. यासह जयश्री गडकर, जीवन, बिरबल, ब्रह्मचारी, मोहन चोटी, सी. एस. दुबे, व्ही. गोपाल, नासीर हुसेन, नवीन चेहरा 'लोकेश' इत्यादींच्या प्रमुख भूमिका! राकेश पांडे हा दिलीपकुमारची नक्कल करणारा कलाकार (कितवा बरे?) मंजुळा दक्षिणेकडील

प्रादेशिक भाषेतील चित्रपटातून हिंदीत आली आणि येथे काही जमले नाही म्हणून साऊथला परतली! या चित्रपटाच्या पोस्टरवर तिला भरपूर स्कोप मिळाला इतकेच. पण पिक्चर चालणे जास्त महत्वाचे. तर करियर घडते. या चित्रपटातील गाणी इंदिवर यांची असून संगीत रवींद्र जैन यांचे आहे.

'जेमिनी प्रॉडक्शन्स' हे दक्षिणेकडील तमिळनाडूच्या चित्रपटसृष्टीतील एक बडे प्रस्थ! एस. एम. वासन यांची ही निर्मिती संस्था व चेन्नईत (मद्रास) भव्य दिमाखदार स्टुडिओ! अनेक तमिळ व तेलगू भाषेतील चित्रपट निर्माण करणाऱ्या या बॅनरने हिंदीतही उल्लेखनीय चित्रपट निर्माण केले. 'इन्सानियत' (प्रमुख भूमिकेत दिलीपकुमार, देव आनंद, बीना रॉय, विजयलक्ष्मी), 'पैगाम' (दिलीप कुमार, राजकुमार, वैजयंतीमाला, बी. सरोजा देवी)

'जिंदगी' (राजेंद्र कुमार, राज कुमार वैजयंती माला), 'समाज को बदल डालो' (परिक्षित




साहनी, शारदा) हे त्यांनी निर्मिलेले काही हिंदी चित्रपट! 'एक गांव की कहानी' निर्मितीच्या काळात हिंदी चित्रपटसृष्टीत अनेक बदल झाले होते आणि दक्षिणेकडील चित्रपट निर्मिती संस्थांनी एकेक करत हिंदी चित्रपट निर्मितीतून माघार घ्यायला सुरुवात केली! 'एव्हीएम' या संस्थेनंतर जेमिनी प्रॉडक्शन्स, त्यानंतर काही वर्षांनंतर प्रसाद प्रॉडक्शन्स इत्यादी... ही काही ठळक नावे!

"एक गाव की कहानी" सांगणारे चित्रपट आजच्या मल्टीप्लेक्स/ ओटीटी युगातही नक्कीच लोकप्रिय होतील! आज ग्रामीण भागातही डिजिटल क्रांतीचे परिणाम/दुष्परिणाम दिसताहेत. पन्नास वर्षात तिकडची जीवनशैली, राहणीमान बदललयं. त्यावरच्या गोष्टी आजच्या ग्लोबल युगातील रसिक प्रेक्षकांना नक्कीच आवडतील. ग्रामीण जीवनावरील चित्रपट जास्त प्रमाणात लोकप्रिय झालेत हे एक समिकरण अशा चित्रपट निर्मितीत प्रोत्साहन देणारे आहे!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)
♥

## लेख क्र : ३७

## 'जोश' @२५ वर्षे... 'आपून बोला..!'




एसआरके अर्थात शाहरुख खान जे करतो ते त्याच्या चाहत्यांना "भारी" आवडतं, ही त्याची जणू मिळकतच. आपण स्टार आहोत याचं पुरेपूर भान तो इतरांनाही देतो हे त्याच्या चित्रपटाच्या पत्रकार परिषदेत कायमच मी अनुभवलय!

तो मन्सूर खान दिग्दर्शित "जोश" (मुंबईत प्रदर्शित ९ जून २०००) साठी हेमा सरदेसाईसोबत

"जोश" चित्रपटाच्या गाण्याची कॅसेट प्रकाशित होताच 'आपून बोला..!' हे गाणे सुपरहिट झाले देखील! नितीन रायकवार लिखित हे गाणे अन्नू मलिकने स्वरबद्ध केलेय! मात्र मित्रांनो.. "जोश" मधल्या "आपून बोला.." या गाण्याची कथा जरा वेगळीच आहे! ती थक्क करणारी आणि मनोरंजक असल्याने जरा विस्तारानेच सांगतोय!

"नितीन रायकवार" नावाचा तरुण मुलगा "अनिल कपूर" (जो श्री. चंपकजी जैन यांचा जिवलग मित्र होता!) यांच्या शिफारशीने "व्हीनस" च्या जुहू इथल्या "ब्ल्यू डायमंड स्टुडिओ" मध्ये आला होता! तिथे एकीकडे "मेला" या सिनेमाचे "फिल्म एडिटिंग" सुरू होते तर "रेकॉर्डिंग स्टुडिओ"मध्ये "जतिन ललित" यांचे "गुलाम" चित्रपटाच्या गाण्याचे "रेकॉर्डिंग" सुरू

**होते. तो आला! योगायोगाने "श्री. चंपकजी" तिथे उपस्थित होते! तो श्री. चंपकजी यांना भेटून म्हणाला.. त्याच्याकडे एक खास "टपोरी जॉनर" चे एक काव्य, अगदी चालीसकट तयार आहे! ते "जोश" सिनेमात "शाहरूख खान" यांच्या आवाजात आले, तर धमाल होईल! स्टुडिओ बाहेरच्या डायनिंग टेबलावर बसून त्याचे गाणे साहेबांनी आपलेपणाने व शांतपणे ऐकले! ते आवडल्याने त्यांनी त्याला मनोमन दाद सुध्दा दिली! इतक्यात तिथे "जोश" चे "दिग्दर्शक मन्सूर खान" रेकॉर्डिंगच्या डेट्स घ्यायला म्हणून तिथे आले होते! मग काय श्री. चंपकजी यांनी "मन्सूरभाईंना" जवळ बोलावले. आणि तुमच्याकडे पाचेक मिनिटे असतील तर एक "फडकती चीज" ऐकवतो म्हणून सांगितलं! त्यांनी**

**"नितीन रायकवार" याला इशारा करताच.. त्याने आपले "काव्य" अदबीने.. अगदी त्याच्या स्वत:च्या संकल्पनेतील चालीत ऐकवले! (गीतकार हा आपल्या संकल्पनेतील ते काव्य "सुरात" गातो असे नेहमीच असत नाही!) मात्र त्याने "पेशकश" केली! दिग्दर्शक "मन्सूर खान" हे क्षणभर स्तब्ध झाले! त्यांच्या मनात त्या क्षणी कोणते विचार होते, कुणास ठाऊक! ते मख्ख चेहऱ्याने "अच्छा है! बाद में देखते है!" असे म्हणत "बॉस चंपकजी यांची "हाय हॅलो" टाईप विचारपूस करत निरोप घेत, निघून गेला! यामुळे तो तरुण उदयोन्मुख गीतकार "नितीन रायकवार" मात्र मनोमन ढेपाळलेला, हे नक्कीच! इतक्यात.. "चाय का टाईम" म्हणून संगीतकार "जतिन-ललित" योगायोगाने बाहेर आले होते.. आणि त्याच वेळी**

"फिल्म एडिट" मध्ये व्यस्त असलेला "आमिर खान" सुद्धा थकल्या-भागल्या अवस्थेत बाहेर आला! त्या सर्वांनी "व्हीनस" कंपनीचे मालक "चंपकजी" चहाच्या टेबलावर पाहताच जतिन-ललित यांसह सगळेच त्या टेबलावर बसले! ("नितीन रायकवार" याचे हे "सुदैव" होते बरं!) मग चंपकजी यांनी त्यांच्या त्या भेटीचे प्रयोजन सांगताच सर्व सरसावून बसले! "नितीन रायकवार" आनंदला! त्याने आपले "काव्य" अगदी त्याच्या रफ चालीसकट धमक्यात ऐकवले! "ललित" म्हणाला... "अरे यार.. मुझे ऐसाही कुछ धमाकेदार चाहिए था! "चंपकजी, मैं ये ले लू ना? चलेगा??" श्री. चंपकजी म्हणाले.. "ले लो यार! ये मेरा थोडी है? ये 'होनहार' लडका जो लिखा है.. उसे चान्स मिले यही बहोत है! लेकीन ये गाना यहाँ

नहीं.. किसी और स्टुडिओ में रेकॉर्ड करना! बस!" ते गाणे होते.. "ऐ क्या बोलती तू??" हे गाणे "सनी स्टुडिओ" मध्ये आमिर व अलका याज्ञिक यांच्या आवाजात साग्रसंगीत रेकॉर्ड झाले! नवा "गीतकार" असल्याने.. फक्त रू. दहा हजार मानधन देऊन ते गाणे एकदाचे "रेकॉर्ड" झाले! ती "कॅसेट" रिलीज झाली. ते गाणे लगेचच "क्लिक" झाले! गाणे चक्क सुपरहिट झाले! (एकेका गाण्याचं नशीब असतं ना ते असं!) ते गाणे "हिट" झाल्याने इकडे.. "आती क्या खंडाला.." या गाण्याची जबरदस्त लोकप्रियता पाहून "मन्सूर खान" मात्र मनोमन अस्वस्थ झाला होता! खूप खूप परेशान! "सहन होईना.. सांगताही येईना अशी त्याची भयंकर मानसिकता झालेली होती म्हणाना!" त्या क्षणी तो जणू स्वतःवरच अतिशय

चिडला होता! काही काळानंतर भानावर येत त्याने संगीतकार "अनू मलिक" याला.. आपल्या "जोश" साठी असेच एखादे फडकते गाणे.. त्याच "गीतकाराकडून" करून घे असे फर्मावले! आता "अनू मलिक" अगदी परेशान! ते व त्या प्रकारचे "टपोरी जॉनर" त्याने कधी-कधीच हाताळले नव्हते! मग काय! त्याने आपलेपणाने "चंपकजी" यांच्याशी संवाद साधला. अगदी सहजपणे! कारण तो श्री. चंपकजी राहत असलेल्या याच "व्हेलॅन्सिया" या इमारतीत राहत होता! श्री. चंपकजी यांनी त्यांच्या संपर्कात असलेल्या "गीतकार नितीन रायकवार" याला तातडीने बोलावून घेतले! "नितीन रायकवार" आपलेपणाने आला... "बॉस" तर आलेच..! "दिग्दर्शक मन्सूर खान" सुद्धा आले! त्याच "चहाच्या टेबलावर"..

"बॉस चंपकजी, मन्सूर खान, संगीतकार अनू मलिक अशी बैठक जमली! दिग्दर्शक मन्सूर खान याने आपल्या संकल्पनेतील "अमुक" सिच्युएशन सांगितली. (जणू पोचलेला गीतकार असल्यागत) "नितीन रायकवार" याने क्षणार्धात त्याचे एक "काव्य" ऐकवले, अगदी चालीसकट! दिग्दर्शक मन्सूर खान.. आधीच परेशान असल्याने.. ("कोन नाय कोनचा!.. वरण भात लोणचा!" या चालीत) ते (झक मारत.. म्हणाना!..) स्वीकारले! मग काय! "गीतकार नितीन रायकवार" याने त्या गाण्याचे आपले "मानधन" हे "रू.२५,०००/" असेल असे.. मन्सूर खान यांना (त्यांच्या "तोंडावर") सांगितले! घ्यायचे तर घ्या! नाहीतर...! ते गाणे केले! जणू करावेच लागले! "शाहरुख खान" याच्याकडून "सुरात" गाणे गाऊन घेणे.. हा भयंकर अनुभव

होता! त्यासाठी "गायिका" कोण हा तर आणखी "जबरदस्त" अनुभव! "व्हीनस"कडे अल्बम्स करणारी "हेमा सरदेसाई" घेऊया हे चंपकजी यांनी सुचवले. ती मूळची "गोव्याची"ची असल्याने गाण्यात सूट होईल. झाले! गाणे रेकॉर्ड झाले.. "आपुन बोला तू मेरी लैला.."! मस्तच जमून आले! हे गाणे शाहरुख खान गायला, याला पंचवीस वर्षे पूर्ण झाली देखील म्हणायचे! "जोश" या चित्रपटाला पंचवीस वर्षे झालीच!

शाहरुख खान अन्नू मलिक शैलीत गायलाय असं कोणी तिरकसपणे म्हणालेही तर कोणी म्हटले, विक्रम भट्ट दिग्दर्शित "गुलाम" मधील आमिर खानने गायलेले "आती क्या खंडाला.." जास्त लोकप्रिय ठरले. अशी तुलना होणारच म्हणा! खरं तर या चित्रपटात शाहरुख खान व

आमिर खान एकत्र दिसले असते तर आश्चर्य नव्हते. पिक्चरचा दिग्दर्शक मन्सूर खान हा आमिर खानचा चुलत भाऊ! इतकेच नव्हे तर मन्सूर खान दिग्दर्शित 'कयामत से कयामत तक', 'जो जिता वोही सिकंदर', 'अकेले हम अकेले तुम' आमिरच नायक होता. घरातलाच माणूस, म्हणजेच एकमेकांच्या कामाची पद्धत, सवय, स्वभाव सगळेच माहित असतेच. तीन चित्रपट एकत्र केल्यावर तर आणखीन सोपे असते! पण आमिरला शाहरुखने साकारलेली भूमिका हवी होती, मन्सूर खानला नीरज वोरासोबत पटकथेवर काम करताना नायक म्हणून शाहरुखच फिट्ट वाटत होता! आमिरला वाटत होते, "जोश" मुळे आपली प्रतिमा बदलण्यास सुरुवात होईल (जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित "सरफरोश" पासून ती

झाली. तो चित्रपट एप्रिल १९९९ ला म्हणजेच "जोश"च्या अगोदर प्रदर्शित झाला. आणि मनोरंजनाची चौकट सांभाळून वेगळ्या प्रवाहातील चित्रपट ठरला.) आमिर खानने नाही म्हटल्यावर सैफ अली खानला विचारले. तो फार बिझी असल्याने चंद्रचूड सिंगची निवड झाली! (त्या काळात 'फिल्मफेअर' या मासिकाच्या मुखपृष्ठासाठी शाहरुख, आमिरने एकत्र केलेले फोटो सेशन गाजले. दिग्दर्शक राजकुमार संतोषी त्या दोघांना घेऊन चित्रपट करणार अशीही एक ब्रेकिंग न्यूज होती. मात्र पुढे काहीच घडले नाही.)

चित्रपटातील शाहरुखच्या बहिणीच्या भूमिकेसाठी मन्सूर खानने 'काजोल'ला विचारले तेव्हा बहुतेक त्याला शाहरुख काजोल ही रोमॅन्टीक जोडी म्हणून जास्त लोकप्रिय आहे याचा

विसर पडला असावा! काजोलने तेच लक्षात आणून दिले! आता कोणाची निवड करायची? 'ऐश्वर्या राय' आता मॉडेलिंगपेक्षा चित्रपटात भूमिका साकारण्यात जास्त रस घेत होती! तिने शाहरुख खानच्या बहिणीची भूमिका स्वीकारल्याची बातमी आली रे आली एक 'फ्लॅशबॅक' समोर आला! देव आनंद दिग्दर्शित व अभिनित "हरे राम हरे कृष्ण" (१९७२) या चित्रपटात देव आनंद व झीनत अमान यांनी अशीच भावा बहिणीची भूमिका साकारली आणि त्यानंतर ते 'हीरा पन्ना', 'वॉरंट', 'प्रेमशास्त्र' इत्यादी चित्रपटात नायक नयिका म्हणून सामोरे आले. शाहरुख खान व ऐश्वर्या रायदेखील आदित्य चोप्रा दिग्दर्शित "मोहब्बते" इत्यादी चित्रपटात एकत्र आलेच! "जोश" मधील शरद कपूरने साकारलेल्या

भूमिकेसाठी अगोदर 'पुरु राजकुमार'ला विचारले पण त्याचं कशावरुन तरी 'मन्सूर खान'शी पटले नाही. (पुरु राजकुमारची एवीतेवी कारकिर्द झालीच नाही.)

"जोश" गोव्यात घडतो. त्या काळातील गोव्यातील युवकांच्या टोळीतील 'वैर' हे मध्यवर्ती सूत्र! गोव्याचे समुद्र किनाऱ्यावरील वातावरण, गावे हे सगळेच "जोश" ची रंगत वाढवते. आणि गोव्यात गोष्ट घडत असल्यानेच हिंदीसह कोंकणी भाषेचाही वापर! छायाचित्रणकार के. व्ही. आनंद यांनी गोव्याचे सौंदर्य खुलवलयं! संकलन दिलीप कोटल्गी व जाफर सुलतान यांचे आहे. चित्रपटाची कथा कल्पना जेरोमी रॉबिन्स यांच्या "वेस्ट साईट स्टोरी" (१९८०) वर आधारित आहे.. ची असल्याने चित्रपटात गीत संगीत नृत्याची रंगत स्वाभाविक

होतीच! 'हाय रे मेरा दिल..', 'हारे हारे हारे हम तो..', 'मेरे खयालों की मलिका..' वगैरे गाणी लोकप्रिय ठरलीच! जास्त गाजले, 'आपून बोला तू मेरी लैला..' नायकाला (अर्थात शाहरुख) त्याची प्रेयसी (प्रिया गिल) चपराक लावते तेव्हा त्याची बहीण (ऐश्वर्या) आपल्या टपोरी मित्रांसोबत भावाला साथ देते. आपण ऐश्वर्याचा भाऊ म्हणून शोभावे यासाठी शाहरुखने ब्ल्यू कॉन्टॅक्ट्स लेन्स वापरली होती हे विशेष!

चित्रपट बनता बनता चक्क चार वर्षे लागली. दिग्दर्शक मन्सूर खान हैराण झाला. त्याचे पिता नासिर हुसेन हे साठ व सत्तरच्या दशकातील यशस्वी निर्माते व दिग्दर्शक. ('जब प्यार किसीसे होता है', 'प्यार का मौसम', 'बहारों के सपने', 'कारवाँ', 'यादों की बारात', 'हम किसीसे कम

नही' वगैरे चित्रपट त्यांनी दिले!) मन्सूर खानने "जोश" नंतर चित्रपटसृष्टीसह मुंबईच सोडण्याचा निर्णय घेतला! मोजक्याच चार चित्रपटात त्याने थांबणे पसंत केले. चित्रपट दिग्दर्शक म्हणून काम करताना टेंपरामेंट फार वेगळे लागते. अनेक गोष्टींचे भान असावे लागते. ते ठेवूनही कधी कधी नकोसे होवून जाते.

एक चित्रपट काय काय घडवत असतो ना? 'आपून बोला...' शाहरुख गायला, हे मात्र विशेष!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

## लेख क्र : ३८

## 'खुशबू' @५० वर्षे..! 'बेचारा दिल क्या करे...'!




गुलजार यांची दिग्दर्शनात तरी राजेश खन्ना व अमिताभ बच्चन यांच्यापेक्षा विनोद खन्ना व जीतेंद्र यांच्यावर विशेष मर्जी होती असे दिसते. तसे का? हे मात्र त्यांनी कधीच सांगितलेले नाही!

त्यांनी आपल्या दिग्दर्शनातील 'मेरे अपने', 'अचानक', 'मीरा', 'लेकिन' या चित्रपटात विनोद खन्नाला तर 'परिचय', 'किनारा', 'खुशबू' या

चित्रपटात जितेंद्रला संधी दिली. 'परिचय'मध्ये विनोद खन्ना पाहुणा कलाकार होताच!

राजेश खन्नाची भूमिका असलेल्या असित सेन दिग्दर्शित 'खामोशी'मधील गाणी गुलजार यांची, राजेश खन्ना व अमिताभ बच्चन यांची भूमिका असलेल्या ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "आनंद" चित्रपटातील 'मैने तेरे लिए ही सात रंग के..' हे गाणे व संवाद गुलजार यांचे! 'नमक हराम' या चित्रपटातील संवादही गुलजार यांचेच. पण त्यांनी आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात राजेश खन्ना व अमिताभ बच्चन यांना संधी देणे कधीच पसंत केले नाही (अथवा तसा योगच आला नाही. का बरे?), धर्मेंद्रला घेऊन त्यांनी "देवदास" या चित्रपटाचा मुहूर्त व पहिले चित्रीकरण सत्रही पार पाडले! शर्मिला टागोर व हेमा मालिनी यांच्या त्यात

प्रमुख भूमिका होत्या. पण तो चित्रपट बंद पडला. त्यांच्या दिग्दर्शनातील 'किनारा' चित्रपटात धर्मेंद्र सुद्धा होता!

बहुतेक त्या काळातील राजेश खन्नाचे मानधन व अतिशय बिझी शेड्युल व अमिताभचेही अन्य दिग्दर्शनातील चित्रपटात गुंतून जाणे यामुळेच गुलजार दिग्दर्शित चित्रपटांतून राजेश खन्ना व अमिताभ कधीच दिसले नसावेत हा तर्क! 'संजीवकुमार' गुलजार त्यांचा हुकमी कलाकार होता यात आश्चर्य नाही. तो वयाची अट न ठेवता व्यक्तिरेखा साकारायचा. ते त्याचे वैशिष्ट्य!

जितेंद्रला गुलजार दिग्दर्शित चित्रपटांतून संधी मिळाली याची काही कारणे आहेत. एक म्हणजे, 'परिचय' व 'खुशबू' या चित्रपटांची निर्मिती त्याचा भाऊ प्रसन्नकुमार याने 'तिरुपती पिक्चर्स'

या बॅनरखाली केली आणि हे चित्रपट त्याचा मेव्हणा 'रमेश सिप्पी' याने 'बी. आर. ए. एन्टरप्रायझेस' रिलीज या वितरण संस्थेच्या वतीने चित्रपटगृहात प्रदर्शित झाले. ("शोले"चा दिग्दर्शक रमेश सिप्पी याच्याशी केवळ नामसाम्य!) तात्पर्य, घरचीच निर्मिती असल्यानेच त्यात जितेंद्र! ('किनारा' चित्रपट प्राणलाल मेहता यांनी निर्माण केला.) आणखीन एक महत्वाचे, जितेंद्रला आपल्या 'जम्पिंग-जॅक' या इमेजबाहेर पडायचे होते, एक कसदार अभिनेता म्हणून ओळख हवी होती. (ती तीन चार चित्रपटातून काम केल्यावर येते? खरंच की काय? पण हेदेखील करावे लागते. एकाद्या कलाकाराच्या प्रगती पुस्तकात असे अनेक गुण असतात!

याच जितेंद्रचा गुलजार दिग्दर्शित "खुशबू" मुंबईत २० जून १९७५ रोजी प्रदर्शित झाला. मुंबईत मेन थिएटर 'अप्सरा'! या चित्रपटाला पन्नास वर्षे पूर्ण झालीदेखील!

"खुशबू" चित्रपट बंगाली चित्रपट "पंडित मसाई" (१९५१ ) या बंगाली चित्रपटावर आधारित! मूळ कथा बंगाली साहित्यकार शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबरीवर आधारित होती! 'खुशबू'ची पटकथा गुलजार, भूषण वनमाळी व डी. एन. मुखर्जी यांची. छायाचित्रणकार के. वैकुंठ यांचे. चित्रपटाचे कथानक डॉ. वृंदावन (जितेंद्र), कुसुम (हेमा मालिनी) व लाखी (शर्मिला टागोर) या तीन प्रमुख व्यक्तीरेखांभोवती घडते. एका गावात ही गोष्ट आकार घेते. चित्रपटात असरानी, ओम शिवपुरी, फरिदा जलाल, देव किशन, दुर्गा खोटे,

लीला मिश्रा, मा. राजू यांच्याही प्रमुख भूमिका. चित्रपटाची अतिशय उत्तम बाजू म्हणजे गुलजार यांच्या गीतांना राहुल देव बर्मन यांचे श्रवणीय संगीत! 'ओ मांझी रे..' (किशोरकुमार), 'दो नैनो में आंसू भरे है..' (लता मंगेशकर), 'घर जाएगी तर जाएगी..' (आशा भोसले), 'बेचारा दिल क्या करे..' (आशा भोसले) ही चारही गाणी आजही लोकप्रिय! 'बेचारा दिल क्या करे..' एकदम फर्मास व भन्नाट! गुलजार, आर. डी. बर्मन व आशा भोसले यांच्यातील केमिस्ट्रीची उत्तम मेजवानीच जणू! नुसते ऐकले तरी भारी वाटतेय. पडद्यावर फरिदा जलालने ते खुलवलयं!

१९७५ हे वर्षे चित्रपटसृष्टीसाठी विशेष उल्लेखनीय! यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" (२४ जानेवारी) पासून ते गाजू लागले. ते आजही

गाजतेय. त्यानंतर गुलजार दिग्दर्शित "आंधी" (१४ फेब्रुवारी), राज खोसला दिग्दर्शित "प्रेम कहानी" (७ मार्च), रवि चोप्रा दिग्दर्शित "जमीर"( २१ मार्च), ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "चुपके चुपके" (११ एप्रिल), रवि टंडन दिग्दर्शित "अपने रंग हजार"




(२५ एप्रिल), फिरोज खान दिग्दर्शित "धर्मात्मा" (९ मे), रवि टंडन दिग्दर्शित "खेल खेल में" (१६ मे) , "जय संतोषी माँ" (३० मे), ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "मिली" (२० जून), रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१५ ऑगस्ट), सोहनलाल कंवर

दिग्दर्शित "संन्यासी" (५ डिसेंबर), रणधीर कपूर दिग्दर्शित "धरम करम" (१२ डिसेंबर), दुलाल गुहा दिग्दर्शित "प्रतिज्ञा" (१९ डिसेंबर), गुलजार यांचा "मौसम" (२६ डिसेंबर) असे अनेक!

म्हणजेच एकाच वर्षात गुलजार दिग्दर्शित चक्क तीन चित्रपट प्रदर्शित! त्यातील "आँधी" आणीबाणीत बंदी आल्याने गाजला. "मौसम" संजीवकुमार व शर्मिला टागोर यांचा अभिनय व मदन मोहन यांच्या संगीताने गाजला ("छडी रे छडी कैसे गले मे पडी.."), आणि खुशबू वेगळाच ठरला. जितेंद्रसाठी व त्याच्या चाहत्यांसाठी....!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

♥

विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर,
(संरचना/मुखपृष्ठ/ले-आऊट)

♥




♥

## "सुपर डुपर हिट्स" (भाग ३)
## लवकरच तुमच्या भेटीला.

♥

"सुपर डुपर हिट्स" (भाग २) © दिलीप ठाकूर